## प्रकरण १ ले

# महाराष्ट्रातील धार्मिक सांप्रदायांची सामाजिक पार्श्वभूमी

सतराव्या शतकात छत्रपति श्री शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात जी स्वराज्य स्थापना केली तिचे मुख्य ध्येय महाराष्ट्रधर्माची स्थापना करणे हे होते व त्यांच्या पश्चात याच ध्येयाच्या सिद्धीस्तव स्वराज्याचा विस्तार मराठ्यांनी सर्व भरतखंडभर केला. हा सिद्धांत मराठ्यांच्या इतिहास संशोधकास व अभ्यासकास चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी मान्य झाला. तथापि महाराष्ट्रधर्म या संज्ञेचा निश्चित अर्थ काय समजावयाचा या विषयी मात्र कित्येक वर्षेपावेतो निरनिराळ्या विद्वानांकडून भिन्न मते प्रदर्शित करण्यात येत होती. प्रस्तुतही तो प्रकार सुरू आहे. या भिन्न मतात सत्याचा अंश कितपत आहे व महाराष्ट्रधर्म संज्ञेचा अर्थ कोणता आहे याचे साधार व सप्रमाण विवेचन महाराष्ट्रधर्म अर्थात मराठ्यांच्या इतिहासाचे आत्मिक स्वरूप या ग्रंथात तिसऱ्या भागात आम्ही केले असून श्रुतिस्मृतीप्रणीत धर्म म्हणजेच महाराष्ट्रधर्म हा सिद्धांत आम्ही स्थापित केला आहे. याप्रमाणे हा सिद्धांत स्थापित केल्यावर श्रुतिस्मृतीप्रणीत धर्मात कोणकोणत्या विषयांचा अंतर्भाव होतो या विषयी महाराष्ट्रातील सुशिक्षित व अशिक्षित लोकात दिसून येणारे अज्ञान लक्षात घेऊन या धर्मात अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या विधिनिषेधरूपी धर्माचे मनु, याज्ञवल्क्य इत्यादी स्मृतीचे आधारे आम्ही दिग्दर्शन केले आहे.

महाराष्ट्रधर्म या संज्ञेच्या खऱ्या अर्थाविषयी वाद महाराष्ट्रातील काही विद्वानांमध्ये सुरू असता भागवत-धर्म ऊर्फ वारकरी सांप्रदाय (पंढरपूरच्या श्री विठ्ठलाचा भक्तिपंथ) म्हणजेच महाराष्ट्रधर्म असा अभिप्राय कित्येकांकडून व्यक्त केला गेला. काही विद्वान समर्थ ऊर्फ रामदासी सांप्रदाय म्हणजेच महाराष्ट्रधर्म असे समजतात. या मतांचे पुराव्यासह विवेचन महाराष्ट्रधर्म या ग्रंथात करण्याचा मानस विस्तार भयास्तव सोडून द्यावा लागला. त्या ग्रंथात संकल्प करून न विवेचिलेल्या विषयाचे विवेचन या ग्रंथात करण्याचा आम्ही संकल्प केला आहे.

टीप : (वारकरी सांप्रदायांसच भागवतधर्म ही दुसरी संज्ञा आहे. त्याचप्रमाणे रामदासी सांप्रदायास समर्थ सांप्रदाय ही संज्ञा आहे. प्रस्तुत ग्रंथात ठिकठिकाणी या दोन्ही संज्ञा नमूद केल्याने होणारी द्विरुक्ति टाळण्याकरिता आम्ही या ग्रंथात वारकरी व रामदासी सांप्रदाय या दोनच संज्ञा वापरल्या आहेत.)

श्रुतिस्मृतीप्रणीत धर्मात प्रवृत्तीपर आणि निवृत्तीपर असे दोन प्रकारचे धर्म कथन केले आहेत. प्रवृत्तीपर धर्माचे दिग्दर्शन 'महाराष्ट्रधर्माच्या' चौथ्या प्रकरणात आम्ही केले आहे. परंतु निवृत्तीपर मोक्षसांधनभूत धर्माच्या स्वरूपाचे दिग्दर्शन त्या ग्रंथात करण्याचे राहून गेले आहे. या निवृत्तीपर धर्माचे स्वरूप मनुस्मृतीच्या खालील वचनात वर्णन केलेले आढळते -

एष सर्व: समुद्दिष्टा कर्मणां व: फलोदय: ।।
नैश्रेयसकरं कर्म विप्रस्येदं निबोधत ।।८२ ।।

वेदाभ्यासस्तपोज्ञानंमिद्रियाणां च संयम: ।।
अहिंसा गुरुसेवा च नि:श्रेयसकरं परम् ।।८३ ।।

सर्वेषामपि चैतेषां शुभानामिह कर्मणाम् ।।
किंचिच्छ्रेयस्करतरं कर्मोत्कं पुरुषं प्रति ।।८४ ।।

सर्वेषामपि चैतेष:मात्मज्ञानं परं स्मृतम् ।।
तद्ध्यभ्यं सर्व विद्यानां प्राप्यते ह्यमृतं तत: ।।८५ ।।

षण्णामेषां तु सर्वेषां कर्मणां प्रेत्य चेह च ।।
श्रेयस्करतरं ज्ञेयं सर्वदा कर्म वैदिकम् ।।८६ ।।

वैदिके कर्मयोगे तु सर्वाण्येतान्यशेषत: ।।
अंतर्भवन्ति क्रमशस्तस्मिंस्तस्मिन्क्रियाविधौ ।।८७ ।।

सुखाभ्युदयिकं चैव नै:न्नेयसिकमेवच ।।
प्रवृत्तं च निवृत्तं च द्विविधं कर्म वैदिकम् ।।८८ ।।

इहचामुत्र वा काम्यं प्रवृत्तं कर्म कौर्स्यते ।।
निष्कामं ज्ञानपूर्व तु निवृत्तमुपदिश्यते ।।८९ ।।

प्रवृत्तं कर्म सैसेव्य देवानामेति साम्यताम् ।।
निवृत्तं सेवामानस्तु भूतान्यत्येति पंच वै ।।९० ।।

सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।।
समै पश्यन्नात्मयाजौ स्वाराज्यमधिगच्छति ।।९१ ।।

यथोत्कान्यपि कर्माणि परिहाय द्विजोत्तमः ।।
आत्मज्ञाने शमे च स्याद्वेदाभ्यासे च यत्नवान् ।।९२ ।।

एतद्धि जन्म साफल्यं ब्राह्मणस्य विशेषतः ।।
प्राप्यैतत्कृतकृत्यो हि द्विजो भवति नान्यथा ।।९३ ।।

मनुस्मृति अध्याय १२-१८ ते ९३

अर्थ - विहित प्रतिषिद्धकर्माचा हा सर्व फलोदय मी तुम्हास सांगितला, आता ब्राह्मणाचे हे मोक्षसाधनभूत कर्म ऐका (८२) उपनिषदांसह वेदांचा ग्रंथतः व अर्थतः अभ्यास कृच्छ्रादि तप, ब्रह्मज्ञान, इंद्रिय निग्रह, हिंसावर्जन व गुरुशुश्रूषा हे मोक्षाचे परम साधन आहे. (८३) वेदाभ्यासादि ही जी शुभकर्मे सांगितली आहेत त्यातील एखादेच कर्म पुरुषाच्या मोक्षाचे सर्वोत्तम साधन असेल ते कोणते? (८४) (अशी जिज्ञासा झाली असता) वेदाभ्यासादि या सर्व साधनातील आत्मज्ञान हेच मुख्य साधन मानलेले आहे. कारण सर्व विद्यातील हेच सर्वश्रेष्ठ असून त्याच्या योगानेच मोक्ष मिळत असतो. (८५) पण या पूर्वोक्त सहा कर्मातील वैदिक कर्म हेच ऐहिक व पारलौकिक श्रेयाचे मुख्य साधन आहे असे सर्वदा समजावे (८६) कारण या उपासनारूप वैदिक कर्मयोगामध्ये ही सर्व वेदाभ्यासादि कर्मे क्रमाने त्या ह्या उपासनेच्या द्वारा अंतर्भूत होतात. (८७) ज्योतिष्टीमादि व प्रतीकोपासनादि वैदिक कर्म अनुक्रमे स्वर्णादि सुखप्राप्ती करून देणाऱ्या संसाराच्या प्रवृत्तीस कारण होणारे असल्यामुळे प्रवृत्त संज्ञक व संसाराच्या निवृत्तीस कारण होणारे असल्यामुळे निवृत्तीसांक असे दोन प्रकारचे आहे. (८८) ऐहिक कामनेचे साधन व पारलौकिक फलाचे साधन असे जे यज्ञयागादि कर्म ते प्रवृत्तकर्म होय व जे कोणत्याही प्रकारची कामना न ठेविता ज्ञानपूर्वक संसाराच्या निवृत्तीस कारण होणारे असेच कर्म केले जाते ते निवृत्तकर्म होय. (८९) प्रवृत्त कर्माचे सेवन केल्याने पुरुष देवाशी साम्य पावतो व जो निवृत्त कर्माचा अभ्यास करतो तो शरीरास कारण होणाऱ्या पंचभूतांचे उल्लंघन करतो. (अर्थात मोक्ष पावतो). (९०) स्थावरजंगमरूप सर्व भूतांमध्ये मीच आत्मरूपाने आहे व सर्वभूते मज परमात्म्यामध्ये आहेत असे जो समभावनेने पाहतो व जो यावज्जीव ब्रह्मार्पण न्यायाने ज्योतिष्टोमादि करतो तो ब्रह्मत्वास प्राप्त होतो. (९१) यास्तव शास्त्रोक्त अशी ही अग्निहोत्रादी कर्मे सोडून, ब्रह्माचे ध्यान, इंद्रियांचा जय, प्रणव, उपनिषदे इत्यादिकांचा अभ्यास या साधनाविषयी ब्राह्मणाने

यत्न करावा. (९१) आत्मज्ञान, वेदाभ्यास इत्यादिकांच्या योगाने द्विजांच्या जन्माचे साफल्य होत असल्यामुळे विशेषत: ब्राह्मणाचे तरी हे च जन्म साफल्य होय. कारण याची प्राप्ती झाली असता द्विज कृतकृत्य होत असतो ।।९३।।

तपो विद्या च विप्रस्य नि:श्रेयसकरं परम् ।।
तपसा किल्विषं हन्ति विद्ययामृतमश्नुते ।।१०४।।

मनुस्मृति अ. १२ श्लोक १०४.

अर्थ - आश्रमविहितकर्म (तप) व आत्मज्ञान हे ब्राह्मणाचे मोक्षसाधन आहे. विहित कर्मरूप तपाच्या योगाने तो आपल्या पापाचा नाश करतो व ब्रह्मज्ञानाने मुक्त होतो. १०४

मनूच्या वरील ९२ व ९३ या श्लोकांत ब्राह्मणाने आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा मुख्यत्वेकरून प्रयत्न केला पाहिजे व त्यातच जन्माचे साफल्य असल्याचे सांगितले आहे. मनूने ब्राह्मणवर्गाच्या बाबतीत जो मार्ग सांगितला आहे. तशा प्रकारचा मार्ग अन्य वर्णाचे बाबतीत सांगितलेला नाही. ब्राह्मणाशिवाय क्षत्रिय, वैश्य, शूद्र या तीन वर्णांचे लोक व त्यांच्यात अंतर्भूत होणाऱ्या शेकडो जातींचे लोक यांच्या मोक्षसाधनभूत धर्माचा मनूने उल्लेख केलेला नाही. तथापि महाभारत काळापासून ब्राह्मणाशिवाय अन्य वर्णाच्या लोकांनी मोक्षसाधनार्थ कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याचे दिग्दर्शन व्यासांनी रचलेल्या महाभारतात त्याचप्रमाणे भागवतग्रंथात केलेले आहे. या ग्रंथात या विषयासंबंधी जे विवेचन केलेले आढळते त्यास अनुसरुन मोक्षसाधना करणारे कित्येक लोक भरतखंडात उत्पन्न होऊन गेले व आज ही विद्यमान आहेत. निवृत्तीपर धर्मांची तत्त्वे पाळणाऱ्या अनेक व्यक्ती मिळून बनलेले सांप्रदाय वेळोवेळी भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात उदयास आलेले आढळतात. अशा या सांप्रदायांपैकी भक्तिमार्गी सांप्रदायाचा प्रामुख्याने उल्लेख करणे अगत्याचे आहे. भरतखंडातील शक एक हजार पासूनच्या पुढील काळातील धार्मिक स्थित्यंतराच्या इतिहासाचे निरीक्षण केले असता या काळापासून भक्तिमार्गी सांप्रदाय भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात उदयास आल्याचे दिसते. विष्णुस्वामी १०००, रामानुज १०४९, निंबादित्य ११५० व मध्वाचार्य ११६५ या धर्मकारणी पुढाऱ्यांनी उत्तर हिंदुस्थानात भक्तिप्रधान सांप्रदायाची स्थापना केली. याच सुमारास महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण व दक्षिणेकडील रामेश्वरापावेतोच्या प्रदेशात भागवतधर्म, दासकूट

इत्यादि भक्तिमार्गी सांप्रदाय उदयास आले. या सर्व सांप्रदायांचा एक विशेष असा आहे की, त्यांनी आत्मसात केलेली संस्कृत ग्रंथातील तत्त्वे देशी भाषात प्रथित करून त्यांचा प्रसार समाजाच्या अगदी खालच्या थरात या सांप्रदायांनी केला. या विषयीचे विवेचन यथास्थळी पुढे येणारच आहे. भक्तिसांप्रदायाच्या या लाटेचे महाराष्ट्रातील दृश्य स्वरूप, भागवतधर्म ऊर्फ वारकरी सांप्रदाय हे होय. हा सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी नाथ सांप्रदाय उत्तर हिंदुस्थानात उदयास येऊन त्याचा प्रवेश महाराष्ट्रात झाला होता. महाराष्ट्रातील कित्येक लोक या सांप्रदायाचे अनुयायी झाले होते. परंतु या सांप्रदायाची छाप वारकरी सांप्रदायाइतकी महाराष्ट्रावर कधीच बसली नाही. विठ्ठलभक्त वारकरी सांप्रदायाशिवाय दत्त, नरसिंह, गणेश, देवी, मल्हारी ऊर्फ खंडोबा इत्यादी देवतांच्या भक्तांचे सांप्रदाय महाराष्ट्रात उदयास येऊन आजही ते विद्यमान आहेत. या सर्व सांप्रदायात वारकरी सांप्रदायाइतका लोकप्रिय सांप्रदाय दुसरा कोणताही नसून या सांप्रदायाचे अनुयायी संख्येने इतर सांप्रदायाच्या अनुयायापेक्षा फार अधिक आहेत. वारकरी सांप्रदायाचा परमोत्कर्ष तुकारामबुवांचे हयातीत झाला. त्याच सुमारास रामभक्तिप्रधान असा रामदासी सांप्रदाय महाराष्ट्रात समर्थ रामदास स्वामी यांनी सुरू केला व सध्या महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे खालोखाल या संप्रदायाचे अनुयायी आहेत.

अशा प्रकारच्या या सांप्रदायांच्या उदयांची कारणे, ध्येये व यात अंतर्भूत होणारी तत्त्वे इत्यादी विषयी आजच्या महाराष्ट्रातील लोकांच्या कल्पना बव्हंशी अस्पष्ट, अवास्तव व निराधार आहेत. या कल्पनांचे निराकरण करून या सांप्रदायांचे सत्य स्वरूप दर्शविण्याकरिता हे सांप्रदाय ज्या महाराष्ट्रीय समाजात उदयास आले; त्या समाजाची विशिष्ट प्रकारे बनत आलेली परंपरागत रचना, त्या रचनेच्या योगाने त्या समाजाच्या निरनिराळ्या घटकावयवरूपी प्रमुख वर्णाच्या व पोटजातींच्या लोकात उदयास आलेली ध्येये, त्या समाजात उदयास येऊन अस्तंगत पावलेले अगर हीनबल झालेले धार्मिक पंथ व तत्त्वज्ञानात्मक संप्रदाय, त्या समाजात घडत आलेल्या राजकीय उलाढाली व त्यायोगाने त्या समाजातील लोकांच्या बनलेल्या मनोरचनेचे स्वरूप इत्यादी मुद्द्यांचे विवेचन प्रस्तुत ग्रंथाच्या या भागात आम्ही करणार आहोत.

इतिहास संशोधनाचे नवीन मन्वंतर सुमारे चाळीस-पन्नास वर्षापूर्वी सुरू झाल्यापासून महाराष्ट्रीय समाजाच्या इतिहास धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण वाङ्मय,

कला इत्यादी नानाविध अंगांसंबंधी नवीन ग्रंथ, टिपणे, पत्रे, बखरी, राजकारणी पुरुष व साधुसंत यांची चरित्रे व इतर कित्येक प्रकारचे लेख उपलब्ध होऊन त्यापैकी कित्येक छापून प्रसिद्ध झाले आहेत व कित्येकांचे प्रकाशनाचे कार्य सुरू आहे. या नवीन प्रकाशित झालेल्या इतिहास साधनसामग्रीचा अभ्यास करणाऱ्यांचा एक वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला असून या वर्गाकडून होणाऱ्या या साधनसामग्रीच्या अभ्यासाच्या योगाने वरील बाबी संबंधी महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या मतांच्या सत्यासत्यतेबद्दल नूतन चर्चा सुरू झाल्या आहेत. अशा प्रकारे सुरू झालेल्या नूतन चर्चा विषयांपैकी वारकरी सांप्रदाय त्याचप्रमाणे रामदासी सांप्रदाय महाराष्ट्रीय समाजात कोणत्या कारणांमुळे उदयास आले, त्याची ध्येये कोणती होती आणि या सांप्रदायांच्या शिकवणीचा महाराष्ट्रीय समाजावर कोणत्या प्रकारचा परिणाम झाला हा एक महत्त्वाचा चर्चा विषय होऊन बसला आहे. सुमारे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील विद्वत्मंडळात वरील मुद्द्यांसंबंधी दोन निरनिराळ्या प्रकारची मते प्रतिपादन करणारे वर्ग अस्तित्त्वात आले. वारकरी सांप्रदाय व रामदासी सांप्रदाय हे एकच असून 'महाराष्ट्रधर्म' ही या पंथाची द्योतक अशी एक दुसरी संज्ञा आहे व भागवतधर्म ऊर्फ महाराष्ट्रधर्म हाच सतराव्या शतकातील मराठ्यांच्या उत्कर्षास व स्वराज्य स्थापनेस कारणीभूत झाला अशा प्रकारचे मत कै. न्यायमूर्ती रानडे व राजाराम शास्त्री भागवत यांनी प्रस्थापित करण्याचा उपक्रम सुरू केला. या मताहून भिन्न स्वरूपाची मते पुरातत्त्वभूषण कै. वि.का.राजवाडे यांचेकडून प्रतिपादण्यात येऊ लागली. वारकरी सांप्रदाय व रामदासी सांप्रदाय यांची ध्येये भिन्न स्वरूपाची असून या दोन्ही सांप्रदायांच्या शिकवणीचे परिणाम महाराष्ट्रीय समाजावर भिन्न प्रकारचे झाले आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्रधर्म हा वारकरी व रामदासी सांप्रदायाहून निराळा असून सतराव्या शतकातील मराठ्यांचा उत्कर्ष व स्वराज्य स्थापना या बाबी वारकरी सांप्रदायाच्या शिकवणीमुळे सिद्ध झाल्या, अशी विचारसरणी कै. राजवाड्यांनी व्यक्त केली. आजही या वादग्रस्त मुद्द्याचा कायमचा निकाल लागला नसून वरील दोन्ही मतांचे अभिमानी व अनुयायी आपल्या मतांच्या पुरस्कारार्थ अधूनमधून या विषयासंबंधी लेख प्रसिद्ध करीत असल्याचे आढळून येते.

आता भागवतधर्म ऊर्फ वारकरी आणि रामदासी हे जे दोन नूतन सांप्रदाय शके १२०० ते शके १७०० चे दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात उदयास आले ते कोणत्या कारणामुळे, त्यांची ध्येये कोणत्या स्वरूपाची घडवून आणले व शिवकालीन स्वराज्य

स्थापनेशी या दोन्ही सांप्रदायांचा कार्यकारणभावदृष्ट्या कितपत संबंध होता इत्यादी मुद्द्याची सांगोपांग चर्चा करून या संबंधाच्या महाराष्ट्रीय विद्वानांच्या वर दर्शविलेल्या नानाविधमतात सत्याचा अंश कितपत आहे याचा निश्चय करण्याचे या ग्रंथात आम्ही योजिले आहे. या चर्चेस सुरुवात करण्यापूर्वी वारकरी सांप्रदाय, रामदासी सांप्रदाय व महाराष्ट्रधर्म याविषयी महाराष्ट्रीय विद्वानांनी आपली मते ज्या पद्धतीने बनविली आहेत, त्या पद्धतीतील काही दोषांचे अविष्करण सुरुवातीसच करणे अत्यंत जरुरीचे असल्याकारणाने हे कार्य आम्ही प्रथम करीतो. कै. न्यायमूर्ती रानडे व राजाराम शास्त्री भागवत यांनी वरील सांप्रदायासंबंधी आपली मते ज्या काळी बनविली त्या काळी उपलब्ध नसलेली अशी पुष्कळ महत्त्वाची अशी नूतन माहिती या सांप्रदायाविषयी अलीकडे उपलब्ध होऊन प्रसिद्ध झाली आहे. पूर्ण माहितीच्या अभावी त्यांनी बनविलेली मते बरोबर असणे शक्य नाही हे उघड आहे. अपुऱ्या माहितीच्या आधारे बनविलेली मते कशी दोषी असतात हे स्पष्ट करण्याकरिता समर्थ रामदास स्वामी संबंधाच्या एका विधानाचा आम्ही येथे उल्लेख करून आमचे म्हणणे स्पष्ट करून दाखवितो. समर्थकाली त्यांच्या शिष्याने लिहिलेल्या एका चरित्रात समर्थांची महती वर्णन करताना, 'एकंकार गजावरी पंचानन' असे समर्थांविषयी उद्‌गार काढले आहेत. समर्थांच्या शिष्यांनी केलेल्या या वर्णनांची सार्थकता त्या काळच्या महाराष्ट्रीय समाजाच्या धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा शोध करून त्याबद्दलची साधकबाधक चर्चा केल्याखेरीज कोणासही पटणार नाही व वरील वर्णनाचे महत्त्वही कोणाच्या लक्षात येणार नाही हे उघड आहे. परंतु अशी कल्पना करा की, एखाद्या अत्यंत विद्वान गृहस्थास समर्थांच्या चरित्रांपैकी वरील बाब ज्ञात नसली, तर त्याचे लक्षही तिजकडे जाणार नाही व तिचा उलगडा करण्याचे भानगडीतही तो कधी पडणार नाही. परंतु या एका क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे रामदासी सांप्रदायाविषयी या विद्वानाने बनविलेली मते दोषी ठरल्यावाचून राहणार नाहीत हे उघड आहे. आता दर्शविलेल्या स्वरूपाचे काही दोष वरील सांप्रदायासंबंधी मते बनविणाऱ्या महाराष्ट्रीय लेखकाचे हातून पूर्ण माहितीचे अभावी घडलेले आहेत. या शिवाय दुसरा एक मोठा दोष वरील सांप्रदायांविषयी चर्चा करताना महाराष्ट्रीय लेखकाच्या हातून घडलेला दिसतो. वारकरी व रामदासी सांप्रदाय महाराष्ट्रीय समाजात शके १२०० ते १७०० चे दरम्यानच्या काळात अस्तित्त्वात येऊन काही काळ पावेतो जोमदार स्थितीत नांदत होते. हे सांप्रदाय

महाराष्ट्रीय समाजात अस्तित्त्वात येण्यापूर्वी या समाजाच्या पूर्वापार रचनेचा त्याचप्रमाणे याच समाजात उदयास येऊन अस्तित्त्वात राहिलेल्या अन्य धार्मिक अगर तत्त्वज्ञानात्मक सांप्रदायांचा वरील सांप्रदायांच्या उदयाशी कितपत संबंध होता या मुद्द्याकडे वरील सांप्रदायाविषयी आपली मते बनविताना महाराष्ट्रीय लेखकांनी यत्किंचितही लक्ष दिल्याचे दिसत नाही. इतिहासकथन व विवेचन पद्धतीविषयी नूतन विकासवादाच्या दृष्टीने विचार करावयाचा, म्हणजे वारकरी सांप्रदाय व रामदासी सांप्रदाय हे महाराष्ट्रीय समाजात अचानक उदयास आले नसून त्या समाजात पूर्वकाळी विद्यमान असलेल्या बीजरूपी कारणापासून ते उदयास आले असले पाहिजेत हे कबूल करणे भाग आहे. वारकरी व रामदासी सांप्रदायांविषयीची मते महाराष्ट्रीय लेखकांनी वरील तत्त्व लक्षात बाळगून बनविलेली नाहीत असे या सांप्रदांविषयींच्या त्यांनी केलेल्या विवेचनावरून कोणच्याही लक्षात आल्याखेरीज राहणार नाही. महाराष्ट्रातील समाज हा भरतखंडातील एक मोठ्या भारतीय समाजाचा भाग आहे. भारतीय समाजाची घटना एका विशिष्ट पद्धतीने बनली गेली आहे. भिन्न मानव वंशाच्या व भिन्न संस्कृतीच्या अनेक गटाच्या निकट साहचर्याने परिणत झालेल्या समाजघटनेमुळे या निरनिराळ्या गटांच्या विविध ध्येयांच्या परस्परविरोधामुळे या समाजात नवे सांप्रदाय वेळोवेळी उत्पन्न होत आले आहेत. ध्येयाच्या विविधतेमुळे समाजातील निरनिराळ्या गटातल्या लोकांच्या मनात वैचारिक खळबळ सुरू होते व ही खळबळ सुरू झाली म्हणजे त्या समाजातील बुद्धिवंत असे नेते समाजास पूर्व परंपरा व नूतन परिस्थिती ध्यानात घेऊन त्याच्या हिताच्या दृष्टीने एक विशिष्ट प्रकारचे वळण लावण्यास प्रवृत्त होतात व सर्व जनतेस परिस्थित्युनुरूप नवीन तत्त्वांचा उपदेश करू लागतात. कालांतराने अशा प्रकारे उपदेशिल्या जाणाऱ्या तत्त्वास नवीन सांप्रदायाचे स्वरूप प्राप्त होते. आम्ही दर्शविलेल्या नवीन सांप्रदायाच्या निर्मितीच्या या कारणमीमांसाकडे महाराष्ट्रीय विद्वानांनी वारकरी व रामदासी सांप्रदायासंबंधी आपली मते बनवितांना दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. वारकरी आणि रामदासी सांप्रदायाविषयी विवेचन करताना आम्ही हे दोष आमचे हातून घडू न देण्याची शक्य तितकी खबरदारी घेण्याचा प्रयत्न करणार आहोत इतका खुलासा करून वरील सांप्रदायांच्या ध्येयनिश्चितीचे विवेचन करतो.

कोणत्याही सांप्रदायांचे व त्यांच्या ध्येयांचे स्वरूप निश्चित करण्याच्या

पद्धतीसंबंधी काही सामान्य तत्त्वांचे स्पष्टीकरण प्रथम करणे अवश्य आहे. महाराष्ट्रातच काय परंतु सर्व भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासून आजपावेतो अनेक धार्मिक, राजकीय व सामाजिक नवे पंथ अस्तित्त्वात आले आहेत. आधुनिक पद्धतीप्रमाणे हे पंथ स्थापन करण्याची कारणे, त्यांचे उद्देश, त्यांच्या कार्याचे स्वरूप, त्यांचे उद्देशसिद्धीचे मार्ग इत्यादी गोष्टी प्रथम नक्की करण्यात येऊन त्या लेखनिविष्ट करण्यात येतात व त्यास अनुसरून त्या पंथांच्या कार्यास आरंभ होतो. बंगाल प्रातांत अस्तित्त्वात असलेला ब्राम्हो समाज, मुंबईतील प्रार्थना समाज, पुण्यातील भारतसेवा मंडळ, कर्व्यांचे अनाथ बालिकाश्रम इत्यादी संस्था कोणत्या ध्येयास्तव स्थापन करण्यात आल्या व त्यांनी कोणती विशिष्ट कार्ये घडवून आणली याचा इतिहास लिहिण्याचा प्रसंग शे-दोनशे वर्षांनंतर आल्यास या संस्थांच्या छापील उद्देशपत्रिका त्याकाळी उपलब्ध झाल्या, तर यासंबंधी तपशीलवार माहिती या संस्थांच्या इतिहास लेखकास देण्यास कसलीही अडचण पडणार नाही. परंतु वारकरी अगर रामदासी सांप्रदायांची ध्येये व उद्दिष्टे लेखनिविष्ट स्वरूपात आजपावेतो उपलब्ध झालेली नाहीत व यापुढेही तशी उपलब्ध होतील होतीलसे वाटत नाही. ही गोष्ट लक्षात घेता हे सांप्रदाय महाराष्ट्रीय समाजात का व कसे उदयास आले व त्याच्या ध्येयाचे स्वरूप याविषयी तपशीलवार माहिती देण्यास तत्कालीन समाजजीवनाचे अभ्यासावर आधारलेल्या अनुमानाशिवाय अन्य मार्ग नाही.

वारकरी व रामदासी सांप्रदाय शके १२०० ते १७०० चे दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात उदयास आले ही बाब सर्वत्रास ज्ञात आहे. त्या काळात महाराष्ट्राची सामाजिक स्थिती पुढे वर्णन केल्याप्रकारची होती व ती हे सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी सुमारे अडीच-तीन हजार वर्षांपासून काही विशिष्ट पद्धतीने बनत आली होती. त्याबाबत सूक्ष्म विचार करणे आवश्यक आहे. ह्यावरून वरील सांप्रदाय ज्या काळी महाराष्ट्रीय समाजात अस्तित्त्वात आले त्या पूर्वी या समाजाचे अंत:स्वरूप कशा प्रकारचे बनले गेले होते याविषयीची बरोबर कल्पना आपणास येईल. पूर्वधर्म अगर सांप्रदाय त्याचप्रमाणे पूर्व तत्त्वज्ञान पद्धती यांचा त्या समाजात उत्पन्न होणाऱ्या नूतन सांप्रदायाशी अत्यंत निकट संबंध असतो. कोणत्याही समाजात निर्माण होणाऱ्या नूतन पंथाचे यथायोग्यज्ञान वरील विषयांची पूर्ण माहिती असल्याखेरीज होणे शक्य नाही. वारकरी व रामदासी सांप्रदाय ज्या काळी उदयास आले त्या सुमारास महाराष्ट्रीय समाजावर परकीय समाजाचे काही आघात झाले होते की काय व अशा प्रकारचे आघात झाले

असल्यास ते कोणत्या स्वरूपाचे होते याही गोष्टीचा तत्कालीन महाराष्ट्रीय समाजाच्या अंत:स्थितीत समावेश होतो.

वर दर्शविलेल्या मुख्य विषयांपैकी वरील संप्रदाय ज्या महाराष्ट्रीय समाजात उदयास आले त्या समाजाची पूर्व परंपरागत रचना कोणत्या विशिष्ट पद्धतीने बनली गेली होती या महत्त्वाच्या विषयाच्या विवेचनास आम्ही आता सुरुवात करीतो. महाराष्ट्र ही संज्ञा आजच्या घटकेस भरतखंडाच्या ज्या भागात आहे त्या भागात पूर्वी एके काळी मोठे अरण्य होते व त्यास दंडकारण्य असे म्हणत. भरतखंडाच्या वायव्य सरहद्दी नजिकच्या पंजाब व त्याच्या आसपासच्या प्रदेशात आर्य लोकांच्या वसाहती स्थिर होऊन संस्कृतीदृष्ट्या त्यांची बरीच प्रगती झाल्यानंतर या लोकांपैकी कित्येकांनी दक्षिणेकडील प्रदेशात स्थलांतर करण्यास सुरुवात केली. अशा रीतीने उत्तरेकडून बऱ्याच लोकांनी या प्रदेशात येऊन वसाहत केल्यानंतर या अरण्यमय प्रदेशातील झाडी तुटली जाऊन कृषिव्यवसाय करणाऱ्या लोकांची हजारो खेडी या प्रदेशात उदयास आली व या खेड्यातून आर्यवर्णीय लोक व मूळचे अनार्य जातीचे लोक परस्परांच्या सान्निध्यात राहून नांदू लागले. अशा रीतीने महाराष्ट्रीय समाज बनला. आता दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रीय समाज उदयास येण्यापूर्वी पंजाबात वसाहत करणाऱ्या आर्य लोकांच्या समाजातून दंडकारण्यात वसाहत करण्याकरता जे आर्य लोक आले त्यांच्या समाजाची रचना एका विशिष्ट पद्धतीने बनली गेली होती व हे लोक त्या विशिष्ट वळणासह महाराष्ट्रात वसाहत करण्याकरिता आले होते. फार पुरातन काळापासून प्रामुख्याने भरतखंडाच्या वायव्य व उत्तर दिशांच्या बाजूंनी निरनिराळ्या मानव वंशाचे लोक वसाहत करण्याकरिता भरतखंडात प्रवेश करीत आले आहेत. या अनेक लोकांपैकी संस्कृती व संख्या या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे आर्यवंशीय लोक हे होत. भरतखंडात आर्यवंशीय लोक सर्वच एकेकाळी आले असे झाले नाही. निरनिराळ्या काळी आर्यवंशीय लोकांच्या टोळ्या भरतखंडात प्रवेश करत्या झाल्या. आर्यांच्या प्रथम वसाहती पंजाबात झाल्या व कालांतराने भरतखंडाच्या निरनिराळ्या दिशांकडील प्रांतात आर्यांचा प्रसार होत गेला. महाराष्ट्रात आर्य लोकांच्या वसाहती दाशरथी रामाने लंकेवर स्वारी करून रावणाचा पराभव करण्यापूर्वी काही काळ झाल्या होत्या असे रामायणातील अगस्त्य ऋषींच्या आश्रमाच्या उल्लेखावरून दिसते. पंजाबात प्रथम ज्या आर्यांच्या वसाहती झाल्या व तेथून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशात ज्या आर्यांच्या प्रसार झाला ते आर्य त्या

काळच्या हिंदुस्थानातील आर्येतर वंशीय लोकांपेक्षा संस्कृतीने श्रेष्ठ प्रकारचे होते व त्यांच्या श्रेष्ठत्वावरच भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशातील लोकांवर त्यांनी आपले वर्चस्व स्थापन केले. असे वर्चस्व स्थापन करणारे हे आर्य गौरवर्ण विशालभाल, सरळनाक, पाणीदार नेत्र, बारीक ओठ इत्यादी शारीरिक सौंदर्य लक्षणांनी युक्त होते. भरतखंडातील आर्येतर वंशीय देशी लोकांनी शारीरिक लक्षणे आर्यांच्या शारीरिक लक्षणाहून अगदी भिन्न प्रकारची होती. बहुतेक आर्येतर वंशीय लोकांचा वर्ण कोळशासारखा काळा असून चपटी नाके, बोजड ओठ, अरुंद कपाळे, बटबटीत डोळे* या शारीरिक लक्षणांनी ते युक्त असत. बाह्य स्वरूपामध्ये आर्य व आर्येतर वंशीय देशौलोक यांच्यामध्ये जितके अंतर होते तितकेच अंतर त्यांच्या मानसिक प्रगल्भतेत व संस्कृतीत होते. आर्यलोक आर्येतरांपेक्षा बुद्धीने श्रेष्ठ होते. त्याचप्रमाणे आर्यांची संस्कृती आर्येतरांच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची होती. आर्यवंशी व आर्येतरवंशीय लोकांमधील या फरकाचे स्वरूप जरा जास्त स्पष्टपणे लक्षात यावे यास्तव संस्कृती या शब्दात आम्ही कोणत्या बाबींचा समावेश करीतो याचे थोडक्यात दिग्दर्शन करीतो.

संस्कृतीत खालील बाबींचा समावेश होतो.

१) बुद्धिमत्ता

२) विद्येची लालसा व विद्याव्यासंग

३) नीतिमत्ता

४) मानसिक व शारीरिक शुचिर्भूतपणा व शौचधर्म परिपालन वृत्ती

५) कर्तृत्त्वशक्ती

या प्रत्येक बाबींच्या दृष्टीने विचार केला असता आर्यलोक आर्येतर देशी

* सिंध प्रांतातील मोहेंजो दारो या गावी भूमीत अंतर्धान पावलेले पुरातन नगर नुकतेच खोदून मोकळे करण्यात आले आहे. हे खोदकाम सुरू असता ज्या अनेक अपूर्व वस्तू या ठिकाणी सापडल्या आहेत त्यात एका माणसाच्या चेहऱ्याची मातीची प्रतिमा सापडली आहे. या प्रतिमेच्या छायाचित्रावरून त्या काळच्या मानवी प्राण्यांचे नाक-डोळे, ओठ इत्यादी अवयव वर दर्शविलेल्या स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. ही बाब आम्ही केलेल्या वरील विधानास पुष्टी देणारी आहे.

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

लोकांपेक्षा फारच श्रेष्ठ दर्जाचे होते. आर्येतर जातीपैकी काही जातींचे संस्कृतीदृष्ट्या हौनत्व इतके गाढ व दृढ अशा प्रकारचे होते व आर्याचा ज्या काळी भरतखंडात प्रवेश झाला त्या काळी आर्येतर जातीपैंकी काही जातींची संस्कृती जितकी हौन संस्कृती दोन-अडीच हजार वर्षे आर्यांच्या सान्निध्यात राहूनही आज मितीस कायम राहिली आहे. दाशरथीरामास भक्तियुक्त अंत:करणाने उष्टी बोरे अर्पण करणाऱ्या शबरीचे बांधव रामकाळी ज्या वन्यअवस्थेत होते त्याच स्थितीत ते आजही असल्याचे दृष्टीस पडतात. संस्कृतीदृष्ट्या आर्य व आर्येतर यांच्यामध्ये वर दर्शविलेल्या फरकाखेरीज आणिक एक दुसरा मोठा फरक होता. या फरकाचा आर्य व आर्येतर लोकांच्या पुढील विकासाशी मोठा निकट संबंध आहे. आर्य लोकांची वन्यावस्था संपून त्यांनी कृषिव्यवसायाचा अंगीकार केलेला होता, तर आर्येतर जातींपैकी काही जातींच्या लोकांची वन्यावस्था सुटली नव्हती. कृषिव्यवसायाचा अंगीकार केला म्हणजे घरे बांधणे, गावे वसविणे वगैरे बाबी अवश्य होऊन ही कार्ये करीत असता अनेक कलांचा प्रादुर्भाव कृषिव्यवसाय करणाऱ्या लोकांमध्ये व्हावयास लागतो व त्यांची संस्कृती प्रगत होत जाते. आर्यवंशीय लोकांनी कृषिव्यवसायाचा अंगीकार केल्यामुळे ते श्रेष्ठ प्रकारची संस्कृती संपादन करण्याचे मार्गावर लागले, आर्येतर वंशीय लोकांपैकी बरेच लोक वन्यअवस्थेत चिकटून राहिल्यामुळे त्यांच्यामध्ये संस्कृतीचा विकास म्हणण्यासारखा न होता ते ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत कायम राहिले. संस्कृतीदृष्ट्या आर्यवंशीय व आर्येतरवंशीय लोकांमध्ये वरील स्वरूपाचा फरक असल्याकारणाने भरतखंडात आर्याचा प्रवेश झाल्यानंतर सुरुवातीस आर्य व आर्येतरवंशीय लोक यांच्यामध्ये काही काळपावेतो युद्धे होत राहिली. या युद्धात आर्यवंशीय  लोकांचा श्रेष्ठ संस्कृतीमुळे विजय होऊन आर्येतरवंशीय देशी लोकांचा मोड होत गेला. याप्रमाणे काही काळ युद्धे झाल्यानंतर आर्येतरवंशीय लोक आर्यांचे वर्चस्वाखाली व त्यांचे सान्निध्यात समाधानाने नांदू लागले.

मानवी प्राणी मग तो कोणत्याही वर्णाचा अगर संस्कृतीचा असो, कामक्रोधादि विकारांनी कमी-अधिक प्रमाणानी व्याप्त असावयाचाच या सिद्धांतास आर्यवंशीय लोक अपवाद नव्हते. याशिवाय परदेशांतून वसाहत करण्याकरिता आलेल्या आर्यवंशीय लोकांमध्ये स्त्रीयांचे प्रमाण कमी असल्यामुळे आर्य व आर्येतरवंशीय लोक वर दर्शविल्याप्रमाणे परस्परांचे सान्निध्यात राहू लागल्या. नंतर त्यांच्यापैकी

आर्य व आर्येतर स्त्री-पुरुषांचे शरीरसंबंध राजरोसपणे अगर लपूनछपून होणे अपरिहार्य झाले. वर्णाने व स्वरूपाने साधारणपणे आर्यांशी थोडीबहुत बरोबरी करण्यालायक आर्येतर वंशीय लोकांच्या स्त्रियांशी आर्यवंशीय लोकांचे शरीरसंबंध जुळण्यास प्रथम सुरुवात झाली. याप्रमाणे या दोन निरनिराळ्या वंशाच्या स्त्रीपुरुषांचे शरीरसंबंध जुळण्यास एकदा सुरुवात झाल्यावर शरीरसंबंधास उपकारक असे रूप व वर्णसादृश्य यांचा निर्बंध ढासळून जाऊन कालांतराने दोन्ही वंशातील स्त्री-पुरुषांचे शरीरसंबंध जुळणे हा सामान्य प्रकार होऊन बसला. प्रस्तुत काळी पृथ्वीचे पाठीवरील निरनिराळ्या मानव वंशाचे लोक ज्या देशात नांदत आहेत तेथे घडत असलेल्या प्रकारावरून आम्ही केलेल्या वरील विधानाशी सत्यता कोणासही सहज पटण्यासारखी आहे. आफ्रिका खंडाचे पूर्व किनाऱ्यावर व्यापारांकरिता भरतखंडाच्या गुजरातप्रांतातील वैश्य वर्णाचे लोक गेल्या पाच-सहाशे वर्षांपासून वास्तव्य करीत आले आहेत. त्यापैकी कित्येक पुरुषांनी आफ्रिकेतील निग्रो स्त्रियांशी शरीरसंबंध केले असून या शरीर संबंधापासून हिंदी व निग्रो वंशाची मिश्र प्रजा निर्माण झाली आहे. दक्षिण आफ्रिकेत युरोपियन गोऱ्या लोकांनी वसाहत करण्यास सुरुवात केल्यानंतर कित्येक गोऱ्या लोकांचे शरीरसंबंध आफ्रिकन निग्रो स्त्रीयांशी जुळून या संबंधापासून युरोपियन-निग्रो वंशीय मिश्र प्रजा त्या देशात निर्माण झाल्याचे प्रसिद्ध आहे. प्रस्तुत काळी वरील प्रकारचे शरीरसंबंध घडत असल्याचा जो प्रकार आपल्या प्रत्यक्ष आढळत येतो तोच त्या काळी भरतखंडात घडून आला. आतापावेतो केलेल्या विवेचनावरून फार पुरातन काळापासून भरतखंडात अस्तित्त्वात असलेला मानव समाज आर्य व आर्येतर वंशीय लोकांच्या मिश्रणाने उत्पन्न झालेल्या प्रजांचा बनला आहे, हा महत्त्वाचा मुद्दा लक्षात बाळगणे अत्यंत जरुरीचे आहे. भरतखंडात आर्यवंशीय लोकांनी वसाहत करण्याकरता प्रवेश केल्यानंतर काही काळपावेतो समाजरचनेच्या दृष्टीने काय प्रकार घडला, याचे आम्ही दिग्दर्शन केले.

आता खुद्द जे आर्यवंशीय लोक भरतखंडात वसाहत करण्याकरिता परदेशातून आले त्याच्या समाजाचे मूळस्वरूप कोणत्या प्रकारचे होते व त्या स्वरूपाचा पुढे कसा विकास होत गेला याचे आम्ही थोडक्यात दिग्दर्शन करितो. आर्यवंशीय मानव भरतखंडांत वसाहत करण्याकरिता ज्याकाळी आले त्या काळी त्यांच्यामध्ये निरनिराळ्या वर्णांचा प्रादुर्भाव झालेला नव्हता. त्यांचेपैकी काही लोक युद्धकर्म करीत व काही अग्निउपासना करीत. भरतखंडाकडे या आर्यवंशीयांचे जसजसे

स्थलांतर होऊ लागले तसतसे त्यांच्या स्थलांतरास त्यांच्या मार्गातील निरनिराळ्या समाजाकडून विरोध होऊ लागला व विरोध करणाऱ्या समाजाबरोबर युद्धकरून आपली प्रगती करण्याचे प्रसंग आर्यलोकांवर वारंवार येऊ लागले. यामुळे निव्वळ युद्ध करणारा एक स्वतंत्र वर्ग व यजनयाजनादि कर्मे करणारा एक स्वतंत्र वर्ग असे दोन वर्ग आर्यवंशीय समाजात निर्माण झाले. युद्ध करणाऱ्या वर्गास क्षत्रिय व यजनयाजनादि कर्मे करणाऱ्या वर्गास ब्राह्मण या संज्ञा प्राप्त झाल्या. काही कालानंतर हा भेद दृढावून याच दोन वर्गाचे क्षत्रिय व ब्राह्मण असे दोन वर्ण मानण्यात येऊ लागले. अशा रीतीने भरतखंडांत वसाहत करण्याकरिता येणाऱ्या आर्यवंशीय लोकात जरी दोन स्वतंत्र वर्ण उदयास आले तथापि त्या दोन वर्णातील स्त्री-पुरुषांचे विवाहसंबंध होण्यास आर्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय त्याकाळी मानण्यात येत नसे. आर्यवंशीय लोकांचा भरतखंडांत प्रवेश होऊन ते तेथे स्थिर झाल्यावर या समाजात आणिक एक स्थित्यंतर घडून आले. हे स्थित्यंतर म्हणजे आर्यवंशीय लोकांपैकी कित्येक लोक कृषिकर्म करू लागले हे होय. कृषिकर्म करणाऱ्या या लोकांचा काही काळानंतर एक स्वतंत्र वर्ग बनला जाऊन त्या वर्गास वैश्य संज्ञा प्राप्त झाली व क्षत्रिय आणि ब्राह्मण वर्णाप्रमाणे कृषी करणाऱ्या लोकांचा एक निराळा वर्ण मानण्यात आला. आर्यवंशीय लोकात वर्णविकास याप्रमाणे होत असता त्यांच्या सान्निध्यात राहणारे आर्येतर वंशीय देशी लोक त्यांच्या ऐपतीस अनुरूप असे या त्रैवर्णी समाजातील लोकांच्या सेवेचे काम करू लागले. कालांतराने सेवा धर्म करणाऱ्या या आर्येतर वंशीय लोकास शूद्र ही संज्ञा होऊन तो एक स्वतंत्र वर्ण मानण्यात आला व त्रैवर्णिकांची सेवा करणे हा शूद्रवर्णी लोकांचा धर्म बनला. आर्यवंशीय लोकांचा भरतखंडात प्रवेश होऊन ते या खंडाच्या उत्तर प्रदेशात स्थिर झाल्यानंतर या समाजाची स्थित्यंतरे येथवर दर्शविल्याप्रमाणे होत गेली. व्यवसाय भिन्नत्वामुळे आतापावेतो वर्णन केल्याप्रमाणे भारतीय समाजाची रचना होऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण अस्तित्वात आले.

१२. चार वर्णांच्या लोकांचे विशिष्ट प्रकारचे धर्म ठरल्यामुळे त्याचे योगाने निरनिराळ्या वर्णांच्या लोकात उत्पन्न झालेला संस्कृती भेद.

या चारी वर्णाच्या लोकांचे भिन्नभिन्न व्यवसाय हेच त्यांचे धर्म मानण्यात आले. वेदाध्ययन, वेदाध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह हे ब्राह्मण वर्णीयांचे वेदाध्ययन, युद्ध करणे, प्रजापालन हे क्षत्रिय वर्णीयांचे

वेदाध्ययन, कृषी, वाणिज्य, गोरक्षण हे वैश्य वर्णीयांचे व त्रैवर्णिकांची सेवा करणे हे शूद्रवर्णाच्या लोकांचे धर्म ठरले गेले. अनेक शतके या धर्माचे आचरण भारतीय समाजातील प्रत्येक वर्णाच्या लोकांकडून होत असल्याकारणाने प्रत्येक वर्णाच्या मनुष्याच्या ठायी वर्ण विशिष्ट व्यवसाय करण्याची विशिष्ट प्रकारची पात्रता निर्माण झाली आहे. या कारणामुळे ज्या मानाने वर्णविशिष्ट व्यवसाय करण्याची पात्रता प्रत्येक वर्णाच्या लोकांच्या ठायी ज्या प्रमाणात सिद्ध झाली त्याचमानाने इतर वर्णाच्या विशिष्ट व्यवसायाकडे दुर्लक्ष व ते करण्याची अपात्रता प्रत्येक वर्णाच्या ठायी उत्पन्न झाली. प्रस्तुत काळीही वाणिज्य व्यवसाय करून अपार संपत्ती कमवणाऱ्या व्यक्ती वैश्य ज्ञातीत जितक्या प्रमाणात सापडतील तितक्या प्रमाणात अशा व्यक्ती ब्राह्मण अगर क्षत्रिय वर्णाच्या लोकात कधीही सापडावयाच्या नाहीत. त्याचप्रमाणे शौर्य साहस, युद्धनैपुण्य इत्यादि गुणांनी युक्त व्यक्ती ज्या प्रमाणात क्षत्रिय वर्णाच्या लोकात सापडतील त्या प्रमाणात ब्राह्मण अगर वैश्य वर्णाच्या लोकात या गुणांनी युक्त अशा व्यक्ती सापडणार नाहीत. बुद्धिवचर्स्व, विद्याभिरुची, इत्यादी गुणांनी युक्त व्यक्ती ब्राह्मण वर्णाच्या लोकांत ज्या प्रमाणात सापडतील तितक्या प्रमाणात अशा प्रकारच्या व्यक्ती क्षत्रिय अगर वैश्य वर्णाच्या लोकांत आढळणार नाहीत. चातुर्वर्ण्य व्यवस्था उदयास आल्यानंतर आजपावेतो वेळोवेळी जे सामाजिक वाद भरतखंडात उदयास आले त्यांचे खरे रहस्य आता दर्शविलेल्या समाज रचनेकडे दुर्लक्ष केले असता कधीही लक्षात येणे शक्य नाही यास्तव यास्थळी या बाबी आम्ही मुद्दाम स्पष्ट करून दाखविल्या आहेत.

१३. भारतीय सामाजात निरनिराळ्या जाती उदयास येण्यास कारणीभूत झालेल्या बाबींच्या स्वरूपाचे दिग्दर्शन निरनिराळ्या जातींच्या लोकांचे संस्कृती भिन्नत्त्व.

मनुस्मृती कालापूर्वी बरीच वर्षे अगोदर भारतीय समाजाची रचना वर दर्शविल्याप्रमाणे बनून गेली होती. याप्रमाणे भारतीय समाजाची घटना बनल्यानंतर त्या काळच्या धर्मान्वये (ज्याचा उल्लेख मनुस्मृतीतही स्पष्टपणे करण्यात आला आहे.) या चातुर्वर्णीय समाजापैकी ब्राह्मण वर्णाच्या पुरुषास स्ववर्णाची एक व इतर वर्णांपैकी प्रत्येक वर्णाची एक या प्रमाणे चार, क्षत्रिय वर्णाच्या पुरुषास स्ववर्णाची एक व वैश्य, शूद्र वर्णाची प्रत्येकी एक या प्रमाणे तीन, वैश्य वर्णाच्या पुरुषास स्ववर्णाची एक व शूद्र वर्णाची एक याप्रमाणे दोन व शुद्र वर्णाच्या पुरुषास स्ववर्णाची

एका, या प्रमाणे स्त्रियांबरोबर विवाह करण्याची मुभा असे. या पद्धतीस अनुसरून त्याकाळी भारतीय समाजात विवाहसंबंध घडत असत. श्रेष्ठ वर्णाच्या पुरुषांना स्ववर्णाच्या व कनिष्ठ वर्णाच्या स्त्रियांशी विवाह करण्याची ज्या प्रमाणे मुभा स्मृतिधर्मान्वये देण्यात आली होती. त्याप्रमाणे कनिष्ट वर्णाच्या पुरुषांना श्रेष्ठ वर्णाच्या स्त्रियांशी विवाह करण्याची मुभा मात्र देण्यात आली नव्हती. असल्या प्रकारचे शरीरसंबंध अत्यंत निंद्य मानले जात व या प्रकारच्या शरीरसंबंधापासून झालेली प्रजा ही नीच समजण्यात येत असे. स्मृतिग्रंथात असल्या प्रकारच्या संबंधाचा तीव्र निषेध केलेला आहे. तथापि मानवाच्या कामविकाराचे खेळ लक्षात घेता अशा प्रकारचे संबंध घडणे अपरिहार्य होते व हे असले संबंध त्या काळी घडतही असत. वर वर्णन केलेल्या दोन प्रकारच्या शरीर संबंधास अनुक्रमे अनुलोम व प्रतिलोम अशा संज्ञा आहेत. अनुलोम शरीर संबंधापासून झालेल्या प्रजांचे काही पिढ्या विशिष्ट पद्धतीने लग्नसंबंध करण्याचे नियम पाळल्यास त्या प्रजेचा समावेश पित्याच्या वर्णात होत असे. परंतु काही काळानंतर हा प्रघात बंद पडल्यामुळे अशा प्रकारच्या शरीरसंबंधापासून झालेल्या प्रजांच्या स्वतंत्र जाती बनू लागल्या व वरील चार प्रमुख वर्णाखेरीज भारतीय समाजात अनेक जाती उदयास आल्या. भारतीय सामाजात निरनिराळ्या जाती कशा उदयास आल्या याचे शुकनीतिच्या एका श्लोकात उत्तम दिग्दर्शन केले आहे. या जातींची प्रजा ब्राह्मण क्षत्रियादि जातीपेक्षा कनिष्ट दर्जाची समजली जात असे. प्रतिलोमसंबंधापासून निर्माण झालेल्या जाती अत्यंत नीच व अस्पृश्य समजत. मनुस्मृतीच्या रचना काळापूर्वी काही शतके वरील प्रकारच्या शरीर संबंधापासून झालेल्या प्रजास निश्चित व पृथक जातींचे स्वरूप प्राप्त झाले होते, असे मनुस्मृतीतील उल्लेखावरून सिद्ध होत आहे. निरनिराळ्या वर्णाच्या स्त्रियांबरोबर विवाह करण्याची जी मुभा ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वर्णांच्या लोकास मनुस्मृति कालापूर्वीपासून होती ती मनुस्मृती कालानंतर संकुचित होत जाऊन याज्ञवल्क्यस्मृतीचे काळी वरिष्ठ वर्णाचे पुरुषाने कनिष्ठ वर्णाच्या स्त्रीबरोबर विवाह करणे निषिद्ध मानण्यात येऊ लागले व काही कालानंतर हा प्रघात अजिबात बंद पडला. तेव्हापासून भरतखंडातील निरनिराळे वर्ण व जाती ज्या स्वरूपात आज दृग्गोचर होत आहेत त्या स्वरूपात स्थिर झाल्या. म्हणजेच प्रामुख्याने आर्यवंशीय ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णाचे लोक, त्यांच्या अनुलोम व प्रतिलोम शरीरसंबंधापासून झालेल्या जाती व निव्वळ आर्येतर वंशज जाती अशांनी बनलेला

समाज भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात नांदत आहे. अशा रीतीने बनलेल्या समाजातील निरनिराळ्या वर्णाच्या व जातीच्या लोकांचे संस्कृतीदृष्ट्या वर्गीकरण स्थूलपणे खाली दर्शविल्याप्रमाणे झाले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे भारतीय समाजातील तीन वर्णाचे लोक प्रामुख्याने आर्यवंशीय असल्याकारणाने ते श्रेष्ठ पदावर आरूढ झाले. त्यातल्या त्यात या तीन वर्णांपैकी ब्राह्मण सर्वात श्रेष्ठ मानण्यात येऊ लागले. मनुस्मृतीत ब्राह्मण वर्णासंबंधी जे उल्लेख आढळतात त्यावरून ब्राह्मणांचे त्याकाळी मान्य करण्यात आलेले श्रेष्ठत्व सिद्ध होत आहे. श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने ब्राह्मणाच्या खालील पद क्षत्रिय वर्णाच्या लोकास व त्याचे खालील पद अनुक्रमे वैश्य व शूद्र वर्णाच्या लोकास प्राप्त झाले. वर दर्शविल्याप्रमाणे ब्राह्मणास जे श्रेष्ठत्व प्राप्त झाले ते त्या वर्णांतील बहुसंख्याक लोकांच्या ठायी असलेल्या विद्या, शौचधर्मपरिपालन वृत्ती व सात्त्विकपणा इत्यादी गुण उत्कटत्वाने बसत असल्याकारणाने प्राप्त झाले हे उघड आहे. या तीन वर्णांच्या खालची पायरी अनुक्रमे अनुलोम व प्रतिलोम शरीरसंबंधापासून झालेल्या जातीस प्राप्त झाली व अगदी सर्वांच्या खालची पायरी आर्येतर जातींना प्राप्त झाली. भारतीय समाज ज्या विशिष्ट पद्धतीने बनला गेला आहे त्याचे दिग्दर्शन येथपावेतो आम्ही केले आहे.

१४. भारतीय समाजाच्या विशिष्ट प्रकाराच्या रचनेमुळे निरनिराळ्या जातीच्या लोकांचे ठायी उदयास आलेल्या आकांक्षांच्या स्वरूपाचे दिग्दर्शन.

भारतीय समाजाच्या या विशिष्ट प्रकारच्या बनावटीमुळे त्या समाजातील निरनिराळ्या वर्णांच्या व जातींच्या लोकांच्या ठायी कोणत्या आकांक्षा उदयास आल्या याचे थोडक्यात दिग्दर्शन करतो. कोणत्याही कारणामुळे एकाच प्रदेशात श्रेष्ठ व कनिष्ठ संस्कृतीचे मानव समाज परस्परांच्या सान्निध्यात राहात असता श्रेष्ठ संस्कृतीच्या समाजातील पुरुषांचा कनिष्ठ संस्कृतीच्या समाजातील स्त्रियांशी शरीरसंबंध झाल्यास या संबंधापासून झालेली प्रजा श्रेष्ठ दर्जाची न होता हीन संस्कृतीची होते ही गोष्ट जगातील निरनिराळ्या प्रदेशांत एकत्र राहणाऱ्या विषम मानव समाज्याची पहाणी केली असता दिसून येते. या अनुभवास अनुसरून भरतखंडातील निरनिराळ्या वर्णाच्या व जातीच्या लोकांचा सांस्कृतिक दर्जा ठरला गेला. स्मृतिधर्मानुसार अनेक शतकापूर्वीपासून आजमितीपावेतो भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतातील भिन्न वर्णाच्या व जातीच्या

लोकांच्या उच्चनीचपणाबद्दल, स्पृश्यास्पृश्यतेबद्दलच्या कल्पना अस्तित्त्वात असल्याचे आढळून येते. या शिवाय निरनिराळ्या वर्णाच्या व जातीच्या लोकांची राहणी फार पुरातन काळापासून श्रुतिस्मृतीप्रणीत धर्माने विशिष्ट प्रकारची ठरली गेली आहे हे विचारात घेतले पाहिजे. स्मृतिग्रंथ वरवर पाहणाऱ्यासही असे आढळून येईल की, अत्यंत श्रेष्ठ प्रकारच्या मानसिक व शारीरिक शुचिर्भूतपणाचे परंतु प्रत्येकाच्या व्यवसायानुरूप आचारधर्म धर्मशास्त्राने घालून दिले आहेत. त्यातल्या त्यात ब्राह्मण वर्णीय व्यक्तीच्या आचारासंबंधी धर्मशास्त्राचा फारच मोठा कटाक्ष दिसून येतो. ब्राह्मण म्हणजे शारीरिक व मानसिक शुचिर्भूततेचा पुतळा असावा अशी स्मृतिग्रंथाची अपेक्षा असल्याचे दिसून येते. वरील प्रकारची शुचिर्भूतता सिद्ध करण्याकरिता धर्मशास्त्राने घालून दिलेल्या आचारांचे पालन करणे हे ब्राह्मणवर्णीय लोकांचे कर्तव्य झाले. ब्राह्मणवर्णीय लोकांच्या या कर्तव्यास अनुसरून सतत वागण्याच्या सवयीमुळे प्रामुख्याने ब्राह्मणवर्णीय लोकांचे ठायी इतर वर्णाचे लोकपेक्षा शुचिर्भूतपणा पुष्कळच जास्त प्रमाणात सिद्ध झाला. शुचिर्भूतपणा ब्राह्मणपेक्षा क्षत्रियात कमी, क्षत्रियापेक्षा वैश्यात कमी व वैश्यांपेक्षा शूद्रात कमी, अशा रीतीने आर्येतर वंशीय जातींच्या लोकात तर तो पूर्णपणे अंतर्धान पावला. आजमितीस कोणत्याही प्रांतातील रहिवाशांच्या जीवनाचे निरीक्षण केले, तर जशी ज्या व्यक्तीची जात श्रेष्ठ अगर कनिष्ठ तसा त्या व्यक्तीचा शुचिर्भूतपणा श्रेष्ठ अगर कनिष्ठ असल्याचे साधारणपणे आढळून येते. भारतीय समाजातील श्रेष्ठ- कनिष्ठत्वाच्या व स्पृश्यास्पृश्यतेसंबंधाच्या कल्पनांची उपपत्ती या प्रकारची आहे. भारतीय समाजसंबंधाने सोडविण्यास दुर्घट असे जे काही प्रश्न आहेत त्यापैकी हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे व कोणत्याही काळच्या भारतीय समाजातील पुढाऱ्यास या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या बाबतीत काही ना काही तरी योजना करणे प्राप्त होते.

१५. भारतीय समाज विकास स्वरूप दर्शन, ब्राह्मणत्व संपादन करण्याची इतर वर्णीयांची आकांक्षा, हीन संस्कृतीच्या लोकांच्या सांस्कृतिक उद्धाराची गरज.

मनुस्मृतीत वर्णिलेली समाजरचना भरतखंडास अस्तित्त्वात येण्याच्या काळापासून महाराष्ट्रात वारकरी व रामदासी सांप्रदायांच्या उदयांच्या काळापावेतो भारतीय समाजाचा मानसिक विकास कसकसा होत गेला हे आम्ही आता दर्शवितो. भारतीय समाजाच्या मानसिक प्रगल्भतेचा आणि त्या समाजात वेळोवेळी

उदयास येणाऱ्या सांप्रदायांच्या ध्येयांच्या निकट संबंध असल्याकारणाने भारतीयांची मानसिक प्रगल्भता कोणत्या प्रकारची होती याचे निरीक्षण करणे जरूर आहे. भारतीय समाजातील निरनिराळ्या जातीच्या लोकांचे वर्गीकरण संस्कृतीदृष्ट्या कसे होत गेले याचे दिग्दर्शन आम्ही आताच केले आहे. बुद्धिसंपन्नतेच्या अगर मानसिक प्रगल्भतेच्या दृष्टीने भारतीय समाजाचे निरीक्षण केले असता वरील वर्गीकरणच बरोबर असल्याचे दिसून येते. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य जातीतील बहुसंख्याक व्यक्ती साधारणत: बुद्धिमान असल्याचे आढळून येते. त्यातल्या त्यात या तीन वर्णांच्या लोकांपैकी ब्राह्मण, वर्णांच्या लोकांच्या ठायी बुद्धिमत्ता विद्याव्यासंग व विद्येची लालसा हे गुण उत्कटत्वाने फार पुरातन काळापासून वसत आले असून आज मितीसही हे गुण या वर्णाच्या लोकांत उत्कटत्वाने वसत असल्याचे दिसते. या तीन वर्णाच्या खालोखाल हे गुण मिश्र शरीरसंबंधापासून निर्माण झालेल्या प्रजांच्या जातीत आढळून येतात. आर्येतर जातीतील प्रजेमध्ये मात्र हे गुण फार अल्प प्रमाणात असल्याचे आढळते. प्रस्तुत काळीही बुद्धिसंपन्नतेच्या अगर मानसिक प्रगल्भतेच्या बाबतीत भरतखंडातील निरनिराळ्या वर्णाच्या व जातींच्या लोकांत पुरातन काळापेक्षा म्हणण्या सारखा फरक पडलेला नाही. भारतीय समाज कमी-अधिक दर्जाच्या संस्कृतीने युक्त असलेल्या निरनिराळ्या वंशाच्या लोकसमूहाच्या एकत्र येण्याने बनला असल्याकारणाने ब्राह्मणांची श्रेष्ठ प्रकारची जी आर्यसंस्कृती तिच्याशी तादाम्य पावून तिने विभूषित होणे हे ध्येय जातिसंस्था दृढ झाल्यापासून शूद्रासह इतर सर्व वर्णांच्या लोकांचे ठरले गेले. अनुकरण प्रवृत्ती ही मनुष्यात मग तो सुसंस्कृत असो वा असंस्कृत असो कमी-अधिक पणाने दृष्टोत्पत्तीस येते. या प्रवृत्तीचे दृष्टीने शूद्र वर्णातील लोकांचे ध्येय ब्राह्मण वर्णाच्या लोकांची श्रेष्ठ संस्कृती साध्य करावी अशा प्रकारचे असणे यात काही नवल नाही. आता श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकांच्या दृष्टीने विचार केला असता कनिष्ठ लोकांच्या ठायी श्रेष्ठ संस्कृती निर्माण करणे हे त्यांचे ध्येय बनणे अपरिहार्य झाले. श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकांचा संपर्क हीन संस्कृतीच्या लोकांशी घडू लागला म्हणजे श्रेष्ठ संस्कृतीच्या समाजाचे व्यवहार बरोबर रीतीने चालवण्यास व ते त्यास सुखप्रद होण्यास हीन संस्कृतीच्या लोकांचा सांस्कतिक विकास करणे श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकास भाग पडते ही बाब नेहेमीच्या व्यवहारातील अनुभवावरून कोणाही सहज पटण्यासारखी आहे. धन्याचे कार्य करण्यास बुद्धिमान नोकर जितका उपयोगी पडतो तितका अल्पबुद्धी व अडाणी नोकर उपयोगी पडत

नाही याचा सर्वत्रास अनुभव आहे. जगाचे पाठीवरील साउथ आफ्रिका, अमेरिका, फिलिपाईन बेटे वगैरेसारख्या ज्या प्रदेशात श्रेष्ठ व हीन संस्कृतीचे मानव समाज एकत्र वसत आहेत तेथील अनुभवावरून ही हीन संस्कृतीच्या लोकांच्या ध्येयाच्या बाबतीत जो सिद्धांत आम्ही वर दर्शविला आहे त्याची सत्यता पटण्यासारखी आहे.

**१६. सांस्कृतिक विकास घडविण्याची पद्धत. संस्कृत भाषेचा संकोच आणि प्राकृत भाषांचा उदय.**

श्रेष्ठ व हीन संस्कृतीचे समाज एकत्र राहू लागल्यावर श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकांनी हीन संस्कृतीच्या लोकांच्या सांस्कृतिक विकासाचे सुरू केलेले कार्य शतकेच्या शतके चालू असते. हे कार्य श्रेष्ठ संस्कृतीचे लोक मुख्यत्वेकरून स्वत:च्या धार्मिक आचारांचा, तत्त्वज्ञानाचा, नीतितत्त्वांचा व श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांचा ज्या वाङ्मयात संग्रह केलेला असतो. अशा वाङ्मयाचा हीन संस्कृतीच्या लोकात प्रसार करून सुरू ठेवितात. हीन संस्कृतीचे लोक निरक्षर असल्यास हे वाङ्गमय प्रसाराचे कार्य कथन व श्रवणद्वारा श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकांना करावे लागते. श्रेष्ठ संस्कृतीच्या लोकांपैकी काही लोक, वक्त्यांचा, व्याख्यानांचा, पुराणिकांचा पेशा पत्करून हीन संस्कृतीचे लोकांमध्ये श्रेष्ठ संस्कृतीचा वरील वाङ्मयाद्वारा प्रसार करतात. आधुनिक काळी श्रेष्ठ संस्कृतीचे लोक संस्कृती प्रसारार्थ निराळ्या मार्गांचा अवलंब करतात. हीन संस्कृतीचे लोकास साक्षर करण्याकरिता प्रथम शाळा स्थापन करून त्यांच्या भाषेत नवे वाङ्मय निर्माण करून त्या द्वारा श्रेष्ठ संस्कृतीचे लोक आपल्या संस्कृतीचा हीन संस्कृतीच्या लोकांस परिचय करून देतात. हीन संस्कृतीच्या लोकांचे संख्याबल अधिक असल्यास श्रेष्ठ संस्कृतीचे लोकास हीन संस्कृतीचे लोक जी भाषा वापरतात त्या भाषेचा आश्रय करणे भाग पडते. ब्राह्मण क्षत्रियादि आर्यवंशीय वर्णाच्या लोकांची भाषा संस्कृत ही होय. परंतु आजमितीस ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादी निव्वळ आर्यवंशीय वर्णाच्या लोकांच्या प्रस्तुतच्या वंशजात संस्कृतभाषा समजणाऱ्यांचे व बोलणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे आढळते. बहुसंख्य आर्येतर वंशीय लोकांच्या निकट सहवासामुळे व शुद्रवर्णी स्त्रियांशी लग्नसंबंध करण्याची मुभा ब्राह्मणादि द्विजवर्णाचे लोकास एकेकाळी असल्याकारणाने संस्कृत भाषेचा त्याग करून बहुसंख्य आर्येतर वंशीय लोकांस गम्य अशा भाषांचा ब्राह्मणादि आर्यवंशीय लोकांना आश्रय करणे भाग पडले. आता दर्शविलेल्या कारणांमुळे आर्येतर वंशीय लोकास समजण्यासारख्या संस्कृतजन्य पाली, मागधी, शौरसेनी पैशाची, महाराष्ट्री, इत्यादी

प्राकृतभाषा उदयास आल्या व या भाषा आर्य व आर्येतर वंशीय वर्णाचे लोक सर्वसाधारण पण उपयोगू लागले. भारतीय समाजातील लोक या भाषांचा जितक्या जास्त प्रमाणाने उपयोग करू लागले तितका संस्कृत भाषेचा संकोच होत चालला. काही काळानंतर या भाषाही लयास जाऊन त्यांच्या ठिकाणी मराठी, हिंदी, गुजराथी, बंगाली, पंजाबी इत्यादि भाषा अस्तित्त्वात येऊन भारतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतातील आर्य व आर्येतर वंशीय लोक या भाषांचा सर्रास उपयोग करू लागले. या भाषा अस्तित्त्वात आल्यांनतर संस्कृत भाषा समजणाऱ्या व बोलणाऱ्या लोकांची संख्या पूर्वीपेक्षाही अकुंचित झाली. शके ११०० ते १७०० च्या दरम्यानचे काळात ब्राह्मण विद्वानांनी मराठी व संस्कृत अशा दोन भाषांत ग्रंथरचना केल्याची काही उदाहरणे अलीकडे उपलब्ध झाली आहेत. श्रेष्ठ संस्कृतीच्या आर्यवंशीय ब्राह्मणांची संस्कृत ही मातृभाषा असल्याकारणाने त्या भाषेत ग्रंथरचना करणे त्या काळी शिष्टपणाचे समजत. परंतु सामाजिक परिस्थितीचा जोर उलट दिशेचा असल्याकारणाने हीन संस्कृतीच्या लोकांच्या उन्नतीस्तव बहुसंख्याक जनतेस समजेल अशा मराठी भाषेत ग्रंथरचना करणे त्यांना अपरिहार्य झाले व या कारणामुळे मराठी भाषेत ग्रंथरचना करण्याचा प्रघात दिवसेंदिवस दृढावत गेला. वरील काळातील मराठी भाषेत ग्रंथरचना करणारा कोणताही ग्रंथकार घ्या त्याने मराठी भाषेत ग्रंथरचना करणे कोणत्याही प्रकारे निंद्य नाही अशा प्रकारचे उद्‌गार अनेक वेळा काढल्याचे आढळतात. हे उद्‌गार ज्या काळातील आहेत त्याकाळी मराठी भाषेत ग्रंथरचना करणे हे कमीपणाचे समजण्याची विद्वान व शिष्टमंडळीत प्रवृत्ती असल्याशिवाय वरील प्रकारचे उद्‌गार बाहेर पडणे शक्य नाही. हीन संस्कृतीच्या लोकांची सांस्कृतिक उन्नती करण्याचे कार्य समाजात कशा रीतीने सिद्ध होत असते याचे स्थूल दिग्दर्शन आम्ही येथेपावेतो केले आहे.

**१७. भारतीय आर्यवंशीय समाजात, देव-देवता, त्यांची उपासना इत्यादी विषयक कल्पना, वजावज्ञानाचा विकास.**

भारतखंडातील समाजरचना, समाज घटकांची भिन्न भिन्न सामाजिक ध्येये, इत्यादी बाबींचे विवेचन आतापावेतो आम्ही यथामती केले आहे. आता भारतीय समाजाच्या अत:स्वरूपांच्या विकासाच्या व त्या विकासामुळे त्या समाजात उत्पन्न झालेल्या स्थित्यंतराच्या दिग्दर्शनाकडे आम्ही वळतो. भारतखंडांतील मानव समाजाच्या अंत:स्वरूपात कोणकोणत्या बाबींचा अंतर्भाव

होतो हे आम्ही प्रथम स्पष्ट करतो. फार प्राचीन काळापासून शके ११०० ते १२०० पावेतो या समाजात वेळोवेळी उदयास आलेले धर्म त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्रकारच्या तत्त्वज्ञान पद्धती, व या उभयंतांचे योगाने भारतीय समाजातील लोकांच्या मनावर व आचारविचारावर झालेले संस्कार इत्यादिकांचा भारतीय समाजाच्या अंत:स्वरूपात समावेश होतो. आता या प्रत्येक बाबींच्या स्वरूपाचे आम्ही स्थूल दिग्दर्शन करितो. भरतखंडात फार प्राचीनकाळी ज्या आर्यवंशीय लोकांनी प्रवेश केला त्या लोकांच्या धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक कल्पना विषयी भरपूर माहिती वेद, ब्राह्मण, उपनिषदे इत्यादी प्राचीन ग्रंथ व महाभारत, रामायण व पुराणे इत्यादी वेदांहून अर्वाचीन ग्रंथावरून उपलब्ध झाली आहे. वेदमंत्राचे द्रष्टे आर्यऋषी व त्यांचे ब्राह्मण, क्षत्रिय वैश्यादि आर्यवंशीय अनुयायी मुख्यत्वेकरून अग्नि व सूर्य यांची उपासना करणारे होते. या शिवाय इंद्र, वरुण, भग, मित्र, सोम, घाता, शंभु, विष्णू इत्यादि देवतांचीही ते उपासना करीत असत. विश्वात दग्गोचर होणाऱ्या अनेक सृष्टी चमत्कारांचा निरनिराळ्या देवतांपासून प्रादुर्भाव होतो असा त्यांचा समज होता. सृष्टिचमत्कार करणाऱ्या देवतांच्या स्तुतीवर अनेक ऋचा आर्य ऋषींनी रचल्या, अशा प्रकारच्या ऋचांच्या संग्रहास वेद हे नाव प्राप्त झाले. या वेदग्रंथाचे अध्ययन करणे हा ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य वर्णाच्या लोकांचा धर्म समजत. शूद्रवर्णाच्या लोकास वेदाध्ययनाची मोकळीक देण्यात आली नव्हती. वैदिक आर्यऋषी सर्व देवतांचा अग्नि हा प्रतिनिधी समजत व अग्नीत हवन केलेली द्रव्ये सर्व देवास प्राप्त होऊन देव संतुष्ट होतात अशी आर्यऋषींची समजूत होती. या कारणास्तव वैदिक आर्यऋषी अग्नी उपासनेस फार महत्त्व देत असत. महाभारतकाळी यज्ञयागादि कर्मास जे एवढे महत्त्व भारतीय समाजात प्राप्त झाले होते, त्याचे मूळ बीज वैदिककालीन अग्निउपासनेत आहे. वरील देवतांची उपासना करून भारतीय आर्य कोणत्या फलाची अपेक्षा बाळगीत याची कल्पना येण्याकरिता वेदातील काही ऋचा आम्ही इथे देतो.

हरि:ॐ आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मार्चसी जायतामा राष्ट्रे राजन्य शूर इषव्यो: तिव्याधी महारथी जायतां दोग्ध्रो घेनुर्वोढानव्डानाशु: सप्ति: पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठा: समेयो युवात्य यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे न: पर्जन्या वर्षतु फलवत्यो न ओषघय: पच्यंतां योगक्षेमो न: कल्पताम् (कृ.यजु.तैत्ति.सं.स.पं.प्र.१८) अनुवाक: आब्रह्मन् - जायता आमच्या राष्ट्रामध्ये ब्राह्मणवर्ण ब्रह्मवर्चसी असा उत्पन्न व्हावा. अस्पिन्राष्ट्र - महारथो जायता या राष्ट्रांमध्ये क्षत्रिय समुदाय धनुष्य बाण धारण

करणारा शूर आणि महारथी असा उत्पन्न होवो.

दोग्ध्री धेनु :- गोसमुदाय पुष्कळ दूध देणारा असा होवो. वोढानव्ढानू पुष्कळ काम करण्यास समर्थ असे निर्माण होवोत. अश्रु: सप्ति:.- घोडे अतिशय वेगवान असे निपजोत. पुरंधिर्योषा.- स्त्रीजाती अत्यंत रूपवान व पातित शील इत्यादिक गुणाने युक्त अशी होवो. जिष्णू रथेष्ठा: रथौ जयशाली असे होवो सुभेयोयुवा.- तरुण असे सभासद असोत. यजमास्यवीरो.- या यजमानाला वीर असे पुत्र होवोत. निकामे वर्षतु.- आमच्या इच्छेप्रमाणेच पर्जन्यवृष्टी करो. फलिन्यौ. पच्यंतां औषधि.- आम्हाला इष्ट फल देणाऱ्या व परिपक्क अशा होवोत. योगक्षेमो न कल्पतां.-योग्यक्षेम चांगल्या तऱ्हेने होवो. म्हणजे ज्या वस्तू आम्हाला पाहिजे असतील त्यांची प्राप्ती आणि रक्षण होवो.

वरील ऋचांवरून भारतीय आर्यांच्या आकांक्षा कोणत्याही मनुष्य समाजाच्या तारुण्यवस्थेत जशा प्रकारच्या आढळून येतात तशा प्रकारच्या होत्या असे दिसून येते. देहास आनंद देणारे सुखोपभोग क्षणभंगूर असून ते नाश पावणारे आहेत यास्तव त्यांच्या नादी न लागता मोक्षरूपी अक्षयसुख प्राप्त करून घेणे हेच मानवी जीविताचे खरे ध्येय आहे. या कल्पनेचा प्रादुर्भाव भारतीय समाजात अद्याप पावेतो झालेला नव्हता. वेदकालीन आर्यांमध्ये अग्नी, सूर्य इत्यादी देवतांची उपासना सुरू असता उपनिषद ग्रंथांत ग्रथित करण्यात आलेल्या तत्त्वज्ञानात्मक कल्पनांचाही प्रादुर्भाव भारतीय समाजात होण्यास हळूहळू सुरुवात झाली होती. विश्वात दृग्गोचर होणारे अनेक सृष्टिचमत्कार निर्माण करणाऱ्या अनेक देवता आहेत ही जी कल्पना प्रथम आर्य लोकात निर्माण झाली त्या कल्पनेची हळूहळू पीछेहाट होऊन सर्व सृष्टिचमत्कारांच्या बुडाशी एकच शक्ती आहे ही कल्पना जोराने पुढे येऊन ती सर्वसंमत झाली. 'एकं सत् विप्रा बहुदा वदंती' सत् वस्तू एकच आहे परंतु विद्वान त्यास अनेक नावे देतात, हे तत्त्व वेदात ग्रथित केलेले आपणास आढळते. अग्नी, वरुण, मित्र, इंद्र आर्यमन् या शक्ती जरी भिन्न भासल्या तथापि एकाच शक्तीची ती निरनिराळी रूपे आहेत अशा प्रकारची आर्यतत्त्ववेत्यांची खात्री झाली. एकच शक्ती अनेक रूपे धारण करते हे अवतार कल्पनेच्या बुडाशी असलेले तत्त्व भारतीय आर्यास या प्रकारे मान्य होऊन कालांतराने अवताराच्या कल्पनेचा प्रादुर्भाव भारतीय समाजात यापासून झाला. दृश्य विश्वाच्या बुडाशी असलेल्या या शक्तीसच ब्रह्म,

परब्रह्म, परमात्मा इत्यादी संज्ञा प्रचारात आल्या. दृश्य विश्वात प्रतीत होणाऱ्या सृष्टिचमत्कारासंबंधी आर्यलोकांचे तत्त्वाज्ञानात्मक विचारवरील प्रमाणे बनत असतो मनुष्यप्राणी हा काय पदार्थ आहे याकडे त्यांचे लक्ष वेधले जाऊन दृश्य मानव देहात देहाव्यतिरिक्त शाश्वत व अविनाशी असे काही एक तत्त्व आहे असा आर्यतत्त्ववेत्यांनी सिद्धांत ठरविला. या तत्त्वासच आत्मा ही संज्ञा त्यांनी दिली. पाण्याने भरलेल्या निरनिराळ्या घटांत आकाशाच्या पडलेल्या प्रतिबिंबाचा आणि सर्वत्र पसरलेल्या आकाशाचा ज्या स्वरूपाचा संबंध आहे त्याच स्वरूपाचा संबंध, मनुष्य देहाच्या ठायी वास करणाऱ्या आत्मारूपी अदृश्य तत्त्वाचा आणि दृश्य विश्वाच्या अंतर्गत असणाऱ्या परब्रह्माचा अथवा परमात्म्याचा संबंध आहे, असा सिद्धांत आर्यतत्त्ववेत्यांनी स्थापित केला. मनुष्याने विशिष्ट प्रकारचे आचरण केल्यास तो आत्मस्वरूप जाणण्यास समर्थ होतो व मरणानंतर त्याचा आत्मा परब्रह्मात लीन होतो असाही सिद्धांत आर्यतत्त्ववेत्यांनी प्रस्थापित केला. मनुष्यप्राणी जन्मास काय कारणाने येतो व मरणोत्तर त्याची काय गती होते या प्रश्नाची चर्चा करून मनुष्य जी बरी-वाईट कर्मे करतो त्याच्या योगाने त्याच्या आत्म्यास उच्च अगर नीच योनीत पुनर्जन्म प्राप्त होतो व त्याच्या बऱ्या-वाईट कर्माचा परिणाम त्यास त्या जन्मात भोगावा लागतो असे मत आर्यतत्त्ववेत्यांनी प्रस्थापित केले. मनुष्याच्या आत्म्याची सुटका या भवचक्राच्या फेऱ्यातून सत्कर्मे केल्याने होणे शक्य असल्याकारणाने त्याने सत्कर्मे करावी हे तत्त्व ओघानेच प्रस्थापित झाले. आतापावेतो दर्शविलेल्या तत्त्वज्ञानात्मक विचारांचा विकास सुरू असता या विश्वातील सर्व वस्तूच्या व ऐहिक सुखोपभोगांच्या क्षणभंगूरत्वाकडे विचारी लोकांचे लक्ष वेधले गेले. दृश्य वस्तू व ऐहिक सुखोपभोग जर क्षणभंगूर आहेत व माणसाच्या शाश्वत कल्याणास त्यापासून काही एक उपयोग जर व्हावयाचा नाही, हे ठरलेले आहे, तर मनुष्याने, या क्षणभंगूर सुखोपभोगाचे नादी तरी का लागावे या प्रश्नाकडे आर्यतत्त्ववेत्यांची मने वेधली गेली. या प्रश्नाचा विचार होऊन भवचक्राच्या फेऱ्यातून मानवास जर आपली सुटका करून घ्यावयाची असेल, तर त्याने क्षणभंगूर असे ऐहिक सुखोपभाग प्राप्त करून देणाऱ्या संसाराच्या नादी न लागता संन्यास घेऊन पारलौकिक शाश्वत सुख ऊर्फ 'मोक्ष' प्राप्त करून घेणे हेच त्यांचे श्रेयस्कर व श्रेष्ठ कर्तव्य आहे असा सिद्धांत आर्यतत्त्वज्ञान्यांनी स्थापित केला. श्रुतीस्मृतीधर्माच्या आश्रम व्यवस्थेत संन्यास आश्रमाचा अंतर्भाव व विचारसरणीचे योगाने केला गेला. संन्यासाश्रमाचा

अश्रय करणे मनुष्याचे वयात विहित असल्याचे स्मृत्यादी ग्रंथात सांगितले आहे. परंतु तारुण्यातही आश्रमाचा स्वीकार करणारे कित्येक लोक भारतीय समाजात निघू लागले. वर दर्शविल्याप्रमाणे दृश्य वस्तूंच्या व ऐहिक सुखोपभोगाच्या क्षणभंगूरत्वाच्या प्रत्यय योगाने उदयास आलेल्या तत्त्वज्ञानात्मक विचारसरणीचा परिणाम संन्यासाश्रमाच्या निर्मितीत झाला एवढेच नाही परंतु भारतीय समाजातील लोकांच्या सर्वसाधारण मनोरचनेवरही या विचारसरणीचा कायम टिकणारा असा अनिष्ट परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. कोणत्याही समाजाच्या तारुण्यावस्थेत ज्या स्वरूपाच्या आकांक्षा उदयास येतात व ज्या आकांक्षांचे स्वरूप आम्ही मागे दिलेल्या उताऱ्यात प्रतिबिंबित झाले आहे. त्या आकांक्षांची आता दर्शविलेल्या विचारसरणीचे योगाने पीछेहाट होऊन संसाराविषयी एक प्रकारची उदासीन वृत्ती सर्वसाधारणपणे भारतीय समाजात उदयास आली. संसारात राहून संसाराबद्दल उदासीनता धारण करणारे कित्येक बुद्धिमान लोक समाजात निर्माण होऊन भारतीय समाजाच्या राजकारणाकडे या लोकांचे दुर्लक्ष होऊ लागले. मागे दिलेल्या ऋगवेदातील ऋचात प्रतिबिंबित झालेले ध्येय प्रवृत्तीपर आहे. संन्यासाश्रमाचे अंतर्भूत असलेली संसाराविषयी उदासीनता ही निवृत्तीपर आहे. अशा रितीने या दोन निरनिराळ्या ध्येयांचे अनुयायी भारतीय समाजात अस्तित्वात येऊन कालांतराने निवृत्तीपर अशा लोकांचे भारतीय समाजात बरेच आधिक्य झाले. जगाच्या निरनिराळ्या राष्ट्रातील लोकांवर निवृत्तीपर ध्येय संमत झाल्यास त्याचे योगाने कदाचित अखिल मानव जातीचे कल्याण होण्याचा संभव आहे. परंतु जर एखाद्या राष्ट्रांतील लोकांवर निवृत्तीपर ध्येयाचा पगडा अधिक बसून त्याच्या आसपासच्या राष्ट्रातील लोक प्रवृत्तीपर राहिले तर बरीक निवृत्तीपर राष्ट्राची दुर्दशा झाल्यावाचून राहात नाही. भरतखंडातील लोकसमाज कोणत्या विशिष्ट पद्धतीने घडला गेला याचे जे आम्ही मागे विवेचन केले आहे त्यावरून समाजाच्या हिताहिताचा विचार करून समाजास योग्य प्रकारचे वळण लावण्याची व बाह्य आणि अंत:शत्रूपासून समाजाचे रक्षण करण्याचा धर्म प्रामुखयाने क्षत्रिय व ब्राह्मण वर्णाच्या लोकांचा ठरला गेला आहे. वैश्य व शूद्र वर्णाच्या लोकांची या बाबतीत कोणत्याही प्रकारची जबाबदारी असल्याची भावनाच अशा वर्णातील लोकांचे ठायी अस्तित्त्वात नसल्यामुळे भारतीय समाजाच्या राजकारणाचा सर्व बोजा क्षत्रिय व ब्राह्मणवर्णाच्या लोकांवर येऊन पडला. अशा परिस्थितीत क्षत्रिय व ब्राह्मण वर्णाच्या लोकात

निवृत्तीपर ध्येयाचा प्रसार होणे हे राष्ट्रास अपायकारक झाल्यावाचून राहिले नाही. मध्ययुगात मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतांवर होऊ लागल्या तेव्हा त्या प्रांतातील लोकांची दुर्दशा कोणत्या प्रकारची झाली याची कल्पना त्या काळाच्या इतिहासावरून आपणास होते. मुसलमानांची ज्या प्रांतावर स्वारी होई त्या प्रांतांतील क्षत्रिय वर्णी लोकांचे व मुसलमानांचे युद्ध झाले व त्यात क्षत्रिय वर्णाचे लोक नामोहरम झाले की, सर्व प्रांत मुसलमानाचे सत्तेखाली नांदू लागे. त्या प्रांतातील ब्राह्मण, वैश्य, शूद्र इत्यादी वर्णाचे लोकांच्या ठिकाणी क्षात्रवृत्तीच्या असलेल्या अभावामुळे मुसलमानांचा अन्वनित जाच निमूटपणे सोसण्यापलीकडे ते काहीच करीत नसत. भारतीय समाजातील लोकांच्या या निमूटपणे जुलूम सोसण्याचे प्रवृत्तीस त्यांचे मध्ये अस्तित्त्वात असलेली कलियुगविषयक कल्पना पोषक होत असे. अनंत काळाच्या एका विशिष्ट भागात धर्म, नीती न्याय यांचा ऱ्हास होऊन समाजात लोक अन्वनित आचरण करू लागतील, म्लेंछ राजे होतील, अशा प्रकारची कलियुगविषयक कल्पना पुराणात नमूद असल्याकारणाने ज्याअर्थी सर्व प्रकार व्हावयाचे असा ईश्वरी संकेत ठरलेला आहे, त्या अर्थी मुसलमानांच्याकडून होत असलेला जुलूम निमूटपणे सहन करणे या वाचून दुसरे गत्यंतर नाही अशा प्रकारची सर्वसाधारण अगतिकतेची भावना भारतीय समाजातील लोकांची झाली. वर दर्शविलेल्या प्रवृत्तीवर आणि निवृत्तीपर ध्येयांचा उदय फार पुरातन काळापासून भारतीय समाजात झाल्यानंतर या दोन्ही ध्येयांचा पुरस्कार व प्रसार करणारे ज्ञानी लोक वेळोवेळी समाजात उत्पन्न होत आले आहेत. महाराष्ट्रीय समाजात घडलेल्या धार्मिक घडामोडींशी या ध्येयांचा निकट संबंध असल्याकारणाने वर दर्शविलेल्या ध्येयांच्या निर्मितीविषयीचा स्थूल उल्लेख प्रस्तुत स्थळी करणे आम्हास प्राप्त झाले.

१८. भारतीय आर्येतर वंशाच्या लोकांच्या धार्मिक कल्पना व आकांक्षा व त्याचा आर्यवंशीय लोकांच्या धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक कल्पनावर परिणाम.

आता, भारतीय समाजातील आर्यवंशीय लोकांच्या धर्माच्या बाह्य व अंत:स्वरूपाचा विकास चालू असल्याने आर्येतर वंशीय लोकांच्या धर्मविषयक कल्पना कोणत्या स्वरूपाच्या होत्या व त्यांचा आर्यवंशीय लोकांच्या धर्मविषयक कल्पनावर कोणत्या

प्रकारचा परिणाम झाला याचा विचार करणे जरूर आहे. आर्यांचा भरतखंडात प्रवेश झाला त्यावेळी आर्येतरवंशीय देशांत लोकांच्या धर्मविषयक कल्पना कोणत्या स्वरूपाच्या होत्या हे समजण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. अशा स्थितीत आजमितीस भरतखंडातील संस्कृतीहीन अशा ज्या आर्येतरवंशीय जाती आहेत त्या जातीच्या लोकांच्या धर्मविषयक कल्पनावरून त्या काळच्या या लोकांच्या धर्मविषयक कल्पनांविषयी अनुमान करण्यास हरकत नाही. प्रस्तुतकाळी आर्येतरवंशीय जातीचे लोक सर्प, वृक्ष, व्याघ्रादि हिंस्र प्राणी, भुते-खेते, नदी नाल्याच्या समीप राहाणाऱ्या आसरादि जलदेवता, साथींच्या रोगांच्या देवता इत्यादिकांची पूजा करतात व त्यास संतुष्ट करण्याकरता द्विपाद, चतुष्पाद प्राण्यांचे बळी देतात. या व्यतिरिक्त धर्मविषयक कल्पनांचा या जातीच्या लोकांच्या ठायी अभाव आहे. पुरातनकाळी आर्येतरवंशीय लोकांच्या कल्पना याच स्वरूपाच्या असल्या पाहिजेत असे या लोकांच्या अप्रगमनशील स्थितीवरून अनुमान करण्यास हरकत नाही. आता आर्येतरवंशीय जातींच्या लोकांच्या या धर्मविषयक कल्पनांचा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादी लोकांच्या धर्मविषयक समुजतीवर काय परिणाम घडला ते आम्ही विशद करतो. प्रस्तुतकाळी हिंदूधर्म या संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या धर्मात आर्येतरवंशीय जातींच्या वरील धर्मसमजुतींचा समावेश झाला आहे हे वर वर विचार करणाऱ्यासही दिसून आल्याखेरीज राहणार नाही. आर्य व आर्येतर वंशीयांच्या निकट सहवासापासून व त्यांच्यात झालेल्या परस्परांच्या शरीरसंबंधामुळे उत्पन्न झालेल्या प्रजांच्या जातींपासून हिंदू या संज्ञेने ओळखला जाणारा प्रस्तुतचा भारतीय समाज जसा अस्तित्त्वात आला त्याचप्रमाणे आर्येतरवंशीय लोकांच्या धर्मविषयक समजुती व त्यास पूज्य असलेल्या देवता यांचा समन्वय होऊन आज हिंदू या संज्ञेने ओळखला जाणारा धर्म बनला आहे. सर्व दृश्य जग हे ब्रह्मस्वरूपी आहे या आर्यवंशीय लोकांच्या मुख्य तत्त्वज्ञानात्मक सिद्धांतामुळे आर्येतरवंशीय धर्मकल्पनांचे या धर्मात सहज रीतीने समावेशन झाले. याच सिद्धांताच्या योगाने आर्येतरवंशीय लोकांच्या देवतांचा आर्यांच्या देवता संघात प्रवेश होऊन त्यांना त्यांच्यात कायमचे स्थान मिळाले. आर्येतरवंशीय लोकांना पूज्य असलेल्या देवता व परब्रह्माची रूपे अजून त्यांचा त्यात अंतर्भाव होत असल्याकारणाने सामान्य बुद्धीच्या आर्यवंशीय माणसास आर्येतरवंशीय लोकांच्या देवतांची पूजा करण्यात कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध वाटेनासा झाला व अशा रीतीने भारतीय समाजातील

आर्यवंशीय ब्राह्मणादि द्विज आर्येतर वंशीय लोकांच्या देवतांस पूज्य मानूं लागले.

इंद्र, सोम, वरुण इत्यादी देवतांची उपासना करणें हे जें आर्यवंशीय लोकांच्या धर्माचे मागें दर्शविलेले साधें स्वरूप तें फार काळापावेतों कायम टिकले नाहीं. या देवतांपैकी अग्निदेवतेच्या उपासनेचा विकास होऊं लागला. अग्नीची उपासना करण्याच्या नाना प्रकारच्या यज्ञपद्धती अस्तित्त्वात आल्या. 'ब्राह्मण' या नावांचे विशिष्ट प्रकारचे वाङ्मयग्रंथ यज्ञपद्धती संबंधी निर्माण होऊन आर्यलोकांमध्ये यज्ञ करण्याचा प्रघात जोराने सुरू झाला. मनुष्याच्या मरणानंतर नाना प्रकारचे सर्वोत्कृष्ट शारीरिक भोग यज्ञाचे योगानें प्राप्त होतात अशी त्या काळच्या भारतीय समाजांतील लोकांची भावना श्रुतिस्मृतीप्रणीत धर्मवचनाचे योगानें बनून ती दृढावल्या कारणानें यज्ञ करणें हेच भारतीय समाजातील व्यक्तींचे सर्वोत्कृष्ट ध्येय होऊन बसले. महाभारतांत वर्णन केलेल्या राजसूय यज्ञासारख्या निरनिराळ्या प्रकारच्या यज्ञाप्रीत्यर्थ भारतीय समाजातील राजपुरुष व संपत्तिमान लोक अपार द्रव्य खर्च करूं लागले. चातुर्वर्णातील वेदपारंगत ब्राह्मणांच्या करवी यज्ञासंबंधी सर्व कामे व्हावयाची असल्याकारणानें यज्ञापासून द्रव्याचा लाभ ब्राह्मण वर्णाच्या लोकांसच होऊं लागला. यामुळे ब्राह्मणाखेरीज इतर वर्णांच्या लोकांत ब्राह्मणाविषयी हेवा व मत्सर उत्पन्न झाला. या शिवाय यज्ञांत होणाऱ्या हजारो पशुंच्या वधामुळे यज्ञकर्माविषयीं ब्राह्मणाखेरीज इतर वर्णाच्या लोकांत तिटकारा उत्पन्न होऊन ते ब्राह्मणाचा द्वेष करू लागले. मनुष्याच्या पारलौकिक कल्याणाच्या सिद्धिस्तव ज्या प्रकारच्या चित्तशुद्धीची जरुरी आहे तशा प्रकारच्या चित्तशुद्धी निर्माण होण्यास यज्ञकर्मांत वाव नव्हता. हेंही यज्ञकर्माचे ठिकाण एक मोठें वैगुण्य होते. या सर्व कारणामुळें भारतीय समाजांत यज्ञकर्माविषयी प्रतिकूल मत निर्माण झाले. या सुमारास वर्णाश्रम धर्मापासून च्युत झालेल्या व्रात्य संज्ञक भारतीय समाजातील लोकांनी यज्ञकर्माविरुद्ध लोकांची मनें बनविण्यासाठी कामी पुढाकार घेतला. चातुर्वर्णीय लोक व्रात्यास हीन समजत, यामुळे ब्राह्मण क्षत्रियादि श्रेष्ठ वर्णांच्या लोकांचे ते द्वेष करीत.

**१९. बौद्ध व जैन मतांच्या उदयास्ताची पार्श्वभूमी.**

यामुळे श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या ब्राह्मणादी लोकांच्या ठायीं आढळणाऱ्या एकाद्या न्यूनाचा उपयोग करून त्यांचा पाडाव करण्याची प्रवृत्ती

व्रात्यांत स्वाभाविकपणें उदयास आली. यज्ञकर्मात होणारी पशुहत्या व त्याविषयी समाजांत उत्पन्न झालेला तिटकारा या दोन बाबी चातुर्वर्णीय समाजातील ब्राह्मणादि श्रेष्ठ वर्णाच्या लोकांस कमीपणा आणणाऱ्या असून त्यांचा पाडाव करण्यास उपयुक्त अशा प्रकारच्या होत्या. या बाबींचा उपयोग ब्राह्मणादी द्विजांस प्रिय असलेल्या यज्ञप्रधान उपासना पद्धतीचा पाडाव करण्याकडे भारतीय समाजांत उदयास आलेले नूतन तत्त्वज्ञानात्मक मतें प्रतिपादन करणारे विद्वान लोक करू लागले. गौतम बुद्ध व महावीर यांनी स्थापिलेल्या बौद्ध व जैन धर्माचा प्रसार होण्यास यज्ञकर्माविषयी भारतीय समाजात उत्पन्न झालेला होम बऱ्याच अंशाने कारणीभूत झाला. गौतमबुद्ध हा व्रात्य क्षत्रियांपैकी व महावीर हा व्रात्य क्षत्रियांच्या नटव्रात्य या संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या एका पोटजातीपैकी होता. यज्ञकर्माविषयी भारतीय समाजात अत्यंत तीव्र असे प्रतिकूल मत निर्माण झाल्यावर वरील दोन व्यक्तींनी आपल्या नूतन धर्मतत्त्वांचे प्रतिपादन व प्रसार करण्यात सुरुवात केली. या दोन्ही धर्मांच्या तत्त्वांचा अत्यंत स्थूल परिचय प्रस्तुत स्थळीं करून देणें जरूर आहे. अहिंसा परमोधर्मः हे या दोन्ही धर्मांचे आद्य तत्त्व आहे. चातुर्वर्ण व्यवस्था  ही दोन्ही धर्मास अमान्य असून वाटेल त्या वर्णाच्या व्यक्तीस संन्यास देण्याची या धर्माने मुभा दिली आहे. ईश्वरांचे अस्तित्त्व दोन्ही धर्मास मान्य नाही. कडकडीत नैतिक आचरणानें व आत्मसंयमन केल्यानें मनुष्यास निर्वाण प्राप्त होते व त्याची संस्कृतीच्या फेऱ्यांतून सुटका होते असा या धर्मात सिद्धांत आहे. बौद्ध व जैन धर्मांच्या संस्थापकांनी प्रतिपादिलेल्या या नवीन मतांच्या योगाने यज्ञयागादि कर्माचे महत्त्व पार नष्ट झाले. त्याचप्रमाणे मोक्ष प्राप्तीप्रीत्यर्थ संन्यास ग्रहणाची आवश्यकता वैदिक धर्माप्रमाणे मानण्यात आली होती, परंतु हा आश्रम स्वीकारण्याची फक्त ब्राह्मण धर्माच्या लोकांसच दिलेली मुभा बौद्ध व जैन धर्मसंस्थापकांनी सर्वत्रास दिल्याकारणाने या आश्रमाचीही काही महती राहिली नाही. या दोन्ही कारणांमुळे भारतीय समाजांत या दोन्ही धर्मांचा प्रसार फार झपाट्याने होऊन वैदिक धर्मानुयायी लोकांच्या संख्येचा अत्यंत संकोच झाला. अशोकासारख्या सम्राटाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे त्या धर्मास राजाश्रय मिळून त्याची महती फारच वाढली. भरतखंडात हजारो विहार अस्तित्त्वात येऊन बौद्ध भिक्षु व जोगिणींचे मोठमोठे संघ सर्व भरतखंडभर संचार करू लागले. गौतम बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच्या मूर्तीची पूजा करण्याची प्रघात बौद्ध धर्मी लोकांत उत्पन्न होऊ न बुद्धाची हजारों

देवळे भरतखंडभर संचार करू लागले. गौतम बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच्या मूर्तीची पूजा करण्याचा प्रघात बौद्ध धर्मी लोकाचे उत्पन्न होऊन बुद्धांची हजारो देवळे भरतखंडात दृग्गोचार होऊ लागली. अशा रीतीने भरतखंडात बौद्धधर्माचा प्रसार झाल्याकारणानें एकेकोळी यज्ञयागादि खटाटोपाची कर्मे करणारा ब्राह्मण व क्षत्रियवर्ण प्रधान देश आळशी, सुखोपभोगी होऊन बुद्धभिक्षु व जोगिणी यांनी गजबजू लागला. वैदिक धर्माची अशा रीतीने पीछेहाट होऊन त्या धर्मास पराभूत स्थितीत चार-पाच शतके काढावी लागली. यज्ञयागादि हिंसाप्रधान कर्माच्या अतिरेकानें विटलेल्या भारतीय समाजातील लोकांच्या मनास केवळ सदाचार व नीतिप्रधान असे बौद्धधर्माचे जे अत्यंत उज्ज्वल स्वरूप खुद्द गौतम बुद्धाच्या काळात आदरणीय भासले ते स्वरूप गौतमबुद्धाचे मरणानंतर हळूहळू विकृत होत जाऊन भारतीय समाजातील लोकांचे मनात बौद्ध धर्माविषयी प्रतिकूल मत बनवण्यास सुरुवात झाली. बौद्ध सांप्रदायात वाटेल त्या वर्णाच्या व संस्कृतीच्या माणसास भिक्षु होण्याची जी मुभा होती ती त्या सांप्रदायाच्या नाशास प्रामुख्याने कारणीभूत झाली. बौद्धधर्माचें ध्येय व ते साध्य करण्याचे मार्ग सर्वोत्कृष्ट आहेत ही बाब कोणासही पटण्यासारखी आहे. श्रेष्ठ संस्कृतीच्या व्यक्तीकडूनही गौतम बुद्धाने घालून दिलेल्या नैतिक नियमांचे परिपालन होणे महाकठीण कर्म आहे. अशा स्थितीत आर्य अगर आर्येतर वंशीय सुसंस्कृत-असंस्कृत असा कोणताही भेदभाव लक्षात न घेता सर्व प्रकारच्या लोकांस संन्यासाश्रम खुला ठेवल्याकारणानें त्याची उच्चतत्त्वें पेलण्यास व आचरणास असमर्थ असे हजारो हीन संस्कृतीचे आर्य व आर्येतर लोक बौद्ध धर्माचे अनुयायी बनले. याचा परिणाम असा झाला की, वेश भिक्षूचा परंतु पेशा खिसेकापूचा शेकडो बुद्ध भिक्षु देशांत वावरू लागले व बुद्धाच्या सोन्यासारख्या तत्त्वास त्यांनी आपल्या कृतीने काळिमा आणला. अशा प्रकारें बौद्ध धर्माच्या नाशाचे बीज सुरुवातीपासूनच त्या धर्मात अस्तित्त्वात असल्याचे दिसून येते. जैन धर्माची मुख्य तत्त्वे स्थूलपणाने बौद्ध धर्मासारखीच असल्याकारणाने त्यांचा परिणाम जैन धर्मावरही प्रतिकूल असा झाला. यज्ञप्रधान वैदिक धर्माविरुद्ध भारतीय समाजात बौद्ध व जैन धर्मानी अशा रीतीने बंड उभारून त्या धर्मास कांही काळ पराभूत केले. कालांतराने या दोन धर्माची पीछेहाट होऊन भरतखंडात नवे धार्मिक स्थित्यंतर कोणत्या प्रकारचे घडून आले हे पाहणे क्रमप्राप्त आहे.

२०. नव्या धर्ममतांतील तत्त्वांचा वैदिक धर्मतत्त्वांशी समन्वय व नारायणीय संप्रदाय

बौद्ध व जैन धर्मांची ज्या तत्त्वावर उभारणी करण्यात आली ती तत्त्वे भारतीय समाजात त्याकाळी प्रतिपादण्यात येऊ लागली असता त्याच काळी वैदिक धर्माचा त्याग न करता यज्ञकर्माविरुद्ध बनलेले लोकमत विचारात घेऊन जी नवीन मते भारतीय समाजात प्रतिपादण्यात येऊ लागली होती त्यांचे स्वरूप विशद करणे या ठिकाणी जरूर आहे. भारतीय समाजाच्या धार्मिक स्थित्यंतरेतिहासाच्या निरीक्षणावरून एक असा सिद्धांत निष्पन्न होतो की, वैदिक धर्माविरूद्ध वेळोवेळी बंड उभारणारे नवें धर्म अगर पंथ ज्या तत्त्वांचा पुरस्कार करतात व ज्यांच्या जोरावर वैदिक धर्मास हाणुन पाडण्याची आकांक्षा बाळगतात त्याच तत्त्वांचा पुरस्कार करून वैदिक धर्माचा त्याग न करतां ती तत्त्वें वैदिक धर्मात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणारे धर्मतत्त्ववेत्ते भारतीय समाजात निर्माण होतात. अशा प्रकारे वैदिक धर्माविरुद्ध बंड करणाऱ्या धर्माच्या अथवा पंथाच्या तत्त्वांची कांही कालानंतर वैदिक धर्माच्या तत्त्वांत या वैदिक धर्मतत्त्ववेत्त्याकडून बेमालूम मिलाफ करण्यात येतो व वैदिक धर्माविरुद्ध बंड उभारणारे धर्म अगर पंथ नष्टप्राय होतात. अगर निर्बल स्थितीत राहतात. वैदिकधर्मांचे प्रधान अंग जें यज्ञकर्म त्या विषयी भारतीय समाजात प्रतिकूल लोकमत बनून वृद्धिंगत होत असता, उपरिनिर्दिष्ट सिद्धांतास अनुसरून बौद्ध व जैन धर्मांच्या मुख्य तत्त्वांचा पुरस्कार करून ती तत्त्वे वैदिक धर्मानुयायी लोकांत रूढ करण्याचा प्रयत्न या काळी सुरू झाला होता. हा प्रयत्न 'सातवत' ऊर्फ 'नारायणीय' ऊर्फ भागवत या प्रसिद्ध असलेल्या सांप्रदायाच्या प्रवर्तकांनी केला. महाभारतांतर्गत शांतिपर्वात नारायणींय सांप्रदायासंबंधी साम्र व तपशीलवार माहिती दिली आहे. ती सर्व माहिती येथे न देता नारायणीय पंथाची उत्पत्ती व तत्त्वे या विषयांची काही महत्त्वाची माहिती आम्ही येथे देतो. नारायणीय धर्मास पंचरात्र, भागवत, एकांतिक अथवा एकांतधर्म अशीही दुसरी नावे आहेत. भारतीय युद्ध होण्यापूर्वी कृष्णांने अर्जुनास जो धर्म सांगितला तो हाच धर्म होय असे महाभारतात सांगितले आहे. या धर्माचें प्रमुख तत्त्व अहिंसा असून याचे योग्य प्रकारे आचरण केल्यास श्री हरी प्रसन्न होतो असे वैशंपायन ऋषीचे वचन आहे. या पंथाची तत्त्वे खाली दर्शविल्या प्रकारची आहेत. वासुदेव हा परमात्मा अथवा सर्व आत्म्यांचा आत्मा आहे. त्याने सर्व जग निर्माण केले आहे. वासुदेवरूपी संकर्षण

म्हणजे जीव कोटी संकर्षणापासून प्रद्युम्न म्हणजे मन व प्रद्युम्नापासून अनिरूद्ध अथवा जाणीवशक्ती निर्माण झाली. जे वासुदेवाची एकांतिक भक्ती करतात ते त्याजप्रत पावतात व त्यांची संसृतीपासून मुक्तता होते. सर्व देव वासुदेव निर्माण करितो व त्यांचा त्यांच्यातच लय होतो. वासुदेव हा नारायणाचा किंवा विष्णुचा अवतार असल्याचे व वराह, नारसिंह, तसेच क्षत्रियांचा संहार करणारा भृगुकुलोत्पन्न राम व दाशरथी राम हेही त्याचेच अवतार आहेत असे या धर्मांचे मत आहे. मथुरेच्या कंसाचा नाश करण्याकरिता वासुदेवाचा द्वारकेत अवतार होणार आहे असेही नारायणीय संहितेत नमूद आहे. नारायणींय धर्माच्या तत्त्वांचे स्थूल स्वरूप या प्रकारचे आहे. महाभारतात या धर्मासंबंधी केलेल्या विवेचनावरून खालील गोष्टी समजून येतात. वसुउपरीचरांने केलेल्या यज्ञात पशूची हत्या करण्यात आली नव्हती, परंतु अरण्यकात सांगितल्याप्रमाणे हवी देण्यात आले होते. मुख्य देवता सर्व देवांचा देव जो हरी ती होती. या हरीचे दर्शन बृहस्पतीसारख्या यज्ञ करणाऱ्यास एकता अगर द्विपा अगर त्रेता यांच्याप्रमाणे हजारों वर्षे तप करणाऱ्यास सुद्धा होत नाही, परंतु वसुउपरीचराप्रमाणे त्याची निःसीम भक्ती करणाऱ्यासच त्याचे दर्शन होते, असा या पंथाविषयी महाभारतात दिलेल्या वर्णनाचा निष्कर्ष आहे. या धर्मांप्रमाणे आचरण करून वसुराजास काय फलप्राप्ति झाली हे दर्शविणारी गोष्ट महाभारतात दिली आहे आम्ही इथे थोडक्यात देतो.

एकेकाळी यज्ञामध्ये पशूचा बळी द्यावा की, धान्याचा बळी द्यावा याविषयी ऋषी आणि देव यांच्यामध्ये वाद उपस्थित झाला. देवाचे म्हणणे पशुचा बळी द्यावा. ऋषीचे म्हणणे धान्याचा बळी द्यावा. हा वाद चालला असता अंतरिक्ष मार्गाने वसुउपरीचर चालला होता. तेव्हा ऋषी देवांना म्हणाले, 'दानशूर व यज्ञकर्मे करणाऱ्या वसुराजाचा या प्रश्नाबद्दल अभिप्राय विचारू या - तो खोटे बोलणार नाही. तो जो अभिप्राय देईल तो खरा समजावा. देवांनी ती गोष्ट कबूल केली व पुढे वसुराजास हा प्रश्न विचारता त्याने छागबलीन यज्ञ करावा असे उत्तर दिले. तेव्हा देवांचा पक्षपात करून तू खोटे उत्तर दिलेस असे ऋषी त्यास म्हणाले व 'अंतरिक्षातून जाण्याचे तुझे सामर्थ्य आजपासून नष्ट होऊन तुला पृथ्वीच्या विवरात रहावे लागेल.' असा त्यांनी त्यास शाप दिला. त्यावर वसुराजाचे अधोमुख होऊन जो पृथ्वीच्या विवरात शिरला. त्यानंतर 'ब्रह्मदेव जो नारायण त्याचा तू परमभक्त आहेत तो तुझ्या निःसीम भक्तीनें तुष्ट होऊन ऋषींच्या शापापासून तुझी निःसंशय मुक्तता

करील' असा देवांनी वसुराजास उन्शाप दिला. या नंतर वसुराजाने नारायणाची भक्ती करून त्यास संतुष्ट केले. त्यावर नारायणाने गरुडास पृथ्वीच्या विवरात शिरून वसुराजांचा शोध करण्याची व त्याला बाहेर काढण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे गरुडाने त्यास बाहेर काढले व त्याच्यासह अंतरिक्षात उड्डाण करून त्यास सोडून दिले. त्या नंतर वसुराजा ब्रह्मलोकांप्रत गेला. नारायणाच्या एकांतिक भक्तीची महती वसुराजाच्या गोष्टींत याप्रमाणे वर्णन केली आहे.

नारायणीय पंथाचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला असता त्यावरून प्रतीत होणाऱ्या बाबी आम्ही इथे विशद करतो. यज्ञकर्मात पशूचा बळी न देता धान्याचा बळी देणे विहित आहे हे तत्त्व वैदिक धर्मानुयायी लोकांपैकी पुष्कळास मान्य होऊन वैदिक धर्मांतर्गत नारायणीय पंथात या तत्त्वास प्रमुख त्याना देण्यात आले. म्हणजे वैदिक धर्माविरुद्ध बंड करताना बौद्ध व जैन धर्मप्रवर्तकांनी जी पुरस्कारिली त्याच तत्त्वांना प्राधान्य नारायणीय पंथासारखा एक नवीन पंथ त्याच्याद्वारा वैदिक धर्मानुयायी लोकांनी दिले. मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने यज्ञकर्म उपयोगी आहे, हा बौद्ध आणि जैन धर्माचा जो दुसरा प्रमुख आक्षेप त्यासही तृतीयपंथात प्रमुख स्थान पर्यायाने देण्यात आले. आरण्यकात सांगितल्याप्रमाणे परमेश्वर प्राप्ती त्याची निस्सीम भक्ती केल्याने होते हे नारायणीय धर्माची तत्त्व असल्याकारणाने मोक्ष अथवा परेश्वर प्राप्ताच्या दृष्टीने धर्माची काडीचीही किमत राहिली नाही. बौद्ध अगर जैन धर्मात नसलेला हा मार्ग हाच नारायणीय धर्माचा विशेष आहे. बौद्ध व जैन धर्माची स्थापना होण्यापूर्वी परमेश्वरांच्या अस्तित्त्वाविषयी भारतीय समाजातील विचारी लोकांचे मनात साशंक वृत्ती उत्पन्न झाली होती. सर्वोत्कृष्ट नैतिक आचरण हेच मोक्ष प्राप्तीचे साधन आहे या मताकडे भारतीय समाजातील विचारी लोकांची मने झुकली होती. अशा प्रकारच्या परिस्थितीत परमेश्वराच्या अस्तित्त्वाविषयी अस्तित्त्व बुद्धि विचारी लोकांचे मनात उत्पन्न करून परमेश्वर भक्तीच्या द्वारा मोक्षप्राप्ती होते हे मत प्रसृत करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. यास्तवच त्या काळी भगवत् गीतेसारख्या ग्रंथाची रचना करण्यात येऊन या धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न झाला असला पाहिजे. वैदिक धर्माच्या यज्ञप्रधान स्वरूपाशी नारायणीय ऊर्फ भागवत धर्माचा विरोध नव्हता. यज्ञापासून प्राप्त होणारे फल नाशवंत असल्याकारणाने फलाची अपेक्षा न धरता परमेश्वराची निष्काम भक्ती करावी अशी या धर्माची शिकवण होती. बुद्ध धर्मसंस्थापक गौतमबुद्ध याचा अवतार होण्यापूर्वी नारायणीय ऊर्फ वासुदेव

ऊर्फ एकांतिक ऊर्फ भागवत धर्माचा विकास होऊन या धर्माच्या तत्त्वांचा संग्रह भगवदगीतेत करण्यांत आला होता. याप्रमाणे या धर्माच्या तत्त्वांचा प्रसार भारतीय समाजात जरी झाला होता तथापि त्याची यज्ञकर्माविषयीची आसक्ती पूर्णपणे सुटली नव्हती. यामुळे गौतमबुद्ध व महावीर या दोघांनी स्थापन केलेल्या बौद्ध व जैन धर्माचा भारतीय समाजांत प्रसार होण्यास यत्किंचितही अडथळा न होता ते दोन्ही धर्म मागे दर्शविल्याप्रमाणे उत्तरोत्तर फोफावत जाऊन गौतमबुद्धाचे निर्वाणानंतर त्यास उतरती कळा लागली. बुद्धाच्या उदयापूर्वी भारतीय समाजातील लोक विष्णू व शिव या दोन देवतांस भजत असत. गौतमबुद्धाचे हयातीत भारतीय समाजापैकी बऱ्याच लोकांनी त्याच्या धर्माचा, स्वीकार केल्यानंतर या देवतांच्या उपासनेचा प्रचार बंद पडला. गौतमबुद्ध निर्वाणानंतर त्याचे अनुयायी त्याच्या मूर्तीची देवालयांत स्थापना करून पूजा करू लागले. भरतखंडात ठिकठिकाणी ... शेकडो देवालये निर्माण झाली. बौद्ध धर्मानुयायी लोकांचे अनुकरण करून वैदिक धर्मानुयायी लोक ही शिव, विष्णू, ब्रह्मा, लक्ष्मी, काली, गणपती, नारायणी, राम, कृष्ण इत्यादी देवतांच्या मूर्ती करून त्यांची देवळे बांधू लागले. या निरनिराळ्या देवतांची देवालये बांधून त्यांची उपासना करण्याचा प्रघात भारतीय समाजात सुरू झाल्यावर देवतापरत्वे उपासकांचे निरनिराळे सांप्रदाय भारतीय समाजात अस्तित्त्वात आले. प्रत्येक सांप्रदाय आपल्या इष्ट देवतेच्या अभिमानाने भरून गेला. याप्रमाणे इष्ट देवता अभिमानाचा जसजसा विकास भारतीय समाजात होत चालला तसा, वैदिक धर्मातील तत्त्वज्ञानात्मक भागाचा भारतीय समाजातील लोकास विसर पडत जाऊन निरनिराळ्या देवतांच्या उपासकात द्वेष व वैर उत्पन्न झाले. निरनिराळ्या देवतांच्या उपासनेचा विकास भारतीय समाजांत होत असतो वैदिक कर्मकांडाचा पुरस्कार करणारा एक विद्वानांचा वर्ग कुमारिल भट्टांचे नेतृत्वाखाली उदयास येऊन बौद्ध धर्माचा पाडाव करण्याचा प्रयत्न या वर्गाने जारीने सुरू केला. निरनिराळ्या तत्त्वज्ञान पद्धतीने अभिमानी या समाजांत अस्तित्त्वात होते. या तत्त्वज्ञान पद्धतीच्या अभिमानी लोकांतही परस्परांविषयी द्वेषभाव वसत असून परंपराचा पाडाव करण्यात त्या काळचे तत्त्वज्ञ चूर असत.

आतापावेतो विस्ताराने वर्णिलेल्या भारतीय समाजाचे चित्र थोडक्यात खालीलप्रमाणे दर्शविता येईल. भारतीय समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार प्रमुख वर्ण व या भिन्न वर्णीय स्त्री-पुरुषांच्या शरीरसंबंधांपासून निर्माण झालेल्या

जाती यांचा बनला होता. या समाजातील लोक वैदिक, बौद्ध, जैन धर्मानुयायी होते. परंतु यी तीन धर्मापैकी बौद्ध व जैन धर्माचे प्राबल्य विशेष होते. तत्त्वज्ञानात्मकदृष्ट्या या समाजांत बौद्ध, जैन, सांख्य, नैय्यायिक, मीमांसक इत्यादी परस्परविरोधी पंथ अस्तित्त्वात होते. देवता उपासना दृष्ट्या विष्णू, शिव, गणपती, देवी, यांची उपासना करणारे लोक या समाजात असून ते आपआपल्या देवतांचे श्रेष्ठत्व स्थापन करून बाकीच्या देवता उपासकांचा पाडाव करण्यात गुंतले होते.

२१ आद्य शंकराचार्य द्वारा अद्वैत सिद्धांत स्थापना, बौद्धादि मतांचे खंडण व वैदिक धर्माचे पुनरुत्थान,

अशा प्रकारे भिन्न भिन्न देवतोपासकांमधील आणि भिन्न भिन्न तत्त्व प्रणालीच्या अनुयायांतीलही मतामतांचा गलबला मिटवून भरतखंडात अद्वैत तत्त्वज्ञानाची श्रेष्ठ पदावर स्थापना करणारी एक अद्वितीय व्यक्ती भरतखंडांत शके ६०० ते ८०० चे दरम्यानच्या कालात धर्मिक व तत्त्वज्ञानात्मक क्षितिजावर उदयास आली. ही व्यक्ती म्हणजे श्रीमत् आध शंकराचार्य ही होय. भारतीय समाजाच्या धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक प्रदेशांत श्रीमत् शंकराचार्यांनी जे कार्य घडवून आणले त्याच्या स्वरूपाचे स्थूल समलोचन येथे करणे अवश्य आहे. ब्रह्मा, विष्णू, शिव, गणपती, काली, नरसिंह इत्यादी अनेक देवता निर्गुण, निराकार, अशा एका परब्रह्माची रूपे असून विशिष्ट देवतांच्या उपासना पद्धती म्हणजे एकाच परब्रह्मस्वरूपी तत्त्वाकडे जाणारेच निरनिराळे मार्ग आहेत, हा सिद्धांत शंकराचार्यांनी प्रस्थापित केला. या तत्त्वास अनुसरून पंचायतन पूजेचा प्रघात शंकरराचार्यांनी प्रथम सुरू केला. निरनिराळ्या देवता उपासकांमध्ये अस्तित्त्वात असलेल्या द्वेषाचा आणि मत्सराचा बीमोड करून अंतिम ध्येयाचे एक स्वरूप भारतीय जनतेच्या मनावर ज्या प्रमाणे आचार्यांनी ठसविले, त्याचप्रमाणे बौद्ध, जैन, नास्तिक, द्वैत, विशिष्टा द्वैत, मीमांसक, सांख्य, नैय्ययिक इत्यादी तत्त्वज्ञान पद्धतीचे परीक्षण करून अद्वैत सिद्धांताची त्यानी भारतीय समाजात स्थापना केली. दृश्य विश्व हें मायारून असून सच्चितानंदस्वरूपी एक परब्रह्मत्त्व अस्तित्त्वात आहे, असा सिद्धांत आचार्यांनी स्थापित केला. त्याचप्रमाणे मानवाचे अंतिम ध्येय म्हणून 'तत्त्वमसि' 'अहं ब्रह्मऽस्मि' हे सिद्धांत आचार्यांनी समाजापुढे मांडले. श्रुतिस्मृतीप्रणीत धर्मास अनुसरून संन्यासाश्रम घेतला असता मनुष्य मोक्षास अधिकारी होऊन 'तत्त्वमसि' 'अहं ब्रह्माऽस्मि' या महत्त्वाक्यांत प्रथिम केलेल्या

तत्त्वांचा अनुभव त्यास प्राप्त होतो, हा सिद्धांत आचार्यांनी स्थापित केला. परिणामतः बौद्धधर्म अस्तित्त्वात येण्यापूर्वी भरतखंडांत वैदिक धर्माची ज्या प्रमाणें सर्वत्र सत्ता नांदत होती त्याप्रमाणे त्या धर्माची सत्ता बौद्ध धर्माचा पाडाव होऊन जिकडे तिकडे पूर्ववत नांदू लागली. स्वतः आचार्यांनी संन्यास घेतल्या कारणांने व संन्यासावाचून मोक्षप्राप्ती नाही हे तत्त्व त्यांनी पुरस्कारिल्यामुळे बौद्ध व जैन भिक्षूंप्रमाणे संन्यासी लोक भरतखंडात जिकडे तिकडे दिसू लागले. शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे हे जे पुनरुत्थान भरतखंडात केले त्याचा पाया भक्कम करण्यास्तव भरतखंडाच्या चार दिशांस चार पीठें स्थापन करण्यांत येऊन आचार्याचे पद्मपाद हस्तामलक, तोटक आणि चित्सुख हे त्या पीठावर नियुक्त करण्यांत आले. या प्रमाणे आचार्यांनी आपल्या अवघ्या ३२ वर्षांचे आयुष्यांत बौद्ध धर्माचा पूर्णपणे पाडाव करून वैदिक धर्माची पुन:स्थापना सर्व भरतखंडांत केली. वेदकालापासून शके आठशे पावेतो धर्माची उपासनात्मक व तत्त्वज्ञानात्मक ही जी दोन प्रमुख अंगे त्यांची स्थित्यंतरे व त्यांचा विकास भारतीय समाजांत शंकराचार्यांचे अवतार समाप्ती पावेतो. कसकसा होत गेला त्याचा इतिहास स्थूलपणे आम्ही येथे दिला आहे.

२२. वेदकालापासून ते शक ८०० पावेतो भारतांतील राजकीय स्थित्यंतरे व सामान्य प्रजेची राजसत्ता विषयक भावना.

आता राजकारणदृष्ट्या भारतीय समाजांत कोणत्या प्रकारची स्थित्यंतरे वेदकालापासून शके ८०० पावेतो होत गेली याची पाहाणी वारकरी व रामदासी सांप्रदायांची उत्पत्ती व त्या सांप्रदायांची ध्येये यांच्या वास्तव मीमांसेच्या दृष्टीने करणे अवश्य असल्याकारणांने ती आता आम्ही करतो.

आर्य व आर्येतर वंशीय लोक यांच्या निकट सहवासामुळे निर्माण झालेला चातुर्वर्णी लोकसमाज भरतखंडात अस्तित्त्वात येण्यापूर्वी आर्यवंशीय लोकांच्या अनेक टोळ्या असत. प्रत्येक टोळीचा एक पुढारी असून त्या पुढाऱ्याच्या हातांत टोळीतील लोकांच्या परस्परांशी होणाऱ्या व्यवहाराचे व वर्तनाचे बाबतींत सर्व सत्ता असे. भरतखंडात आर्यांचा प्रवेश होऊन वसाहतकर्मानंतर अशा प्रकारची स्थिती होती व हेंच पुढारी त्या प्रदेशाचे राजे बनले. अशा प्रकारचे अनेक राजे भारतीय युद्धापुर्वी भरतखंडात अस्तित्त्वात असल्याचें महाभारतांतील वर्णनावरून

दिसून येते. अगदी प्रथम आर्यांमध्ये ब्राह्मण व क्षत्रिय असे दोन वर्ण असून यजन याजनादि धर्म कर्मे करण्याचें ब्राह्मणांचे व युद्ध करण्यांचे काम क्षत्रियांचे अशी विभागणी असल्याचें योगांने आर्य लोकांच्या टोळ्यांचे धुरीणत्व स्वाभाविकपणे युद्ध करणाऱ्या क्षत्रियवर्णी लोकांकडे जाऊन त्यांच्यातील लोकच राजे बनले. स्मृत्यादि ग्रंथात राजा क्षत्रियवर्णी असे जे सांगितले आहे, त्याची उपपत्ती आता दर्शविलेल्या स्वरूपाची आर्य लोकांत वर्णव्यवस्थेचे बीजारोपण वर दर्शविलेल्याप्रमाणे झाल्यानंतर वर्णाच्या ठिकाणी कालांतराने चातुर्वर्ण्य अस्तित्त्वात आले तरीदेखील पूर्वी अस्तित्त्वात असलेल्या प्रघातास अनुसरून युद्ध करण्याचे व प्रजेचे रक्षण करण्याचे काम क्षत्रियवर्णी लोकांचे हाती राहिले व यामुळे राजसत्तेचेंही तेच स्वामी बनले. हे राजसत्ता धारण करणारे लहान लहान प्रदेशाचे अनेक क्षत्रियवर्णी राजे श्रुतिस्मृतीप्रणित धर्मान्वये आपली सत्ता विद्वान व निरपेक्ष ब्राह्मणांचे सल्याने चालवीत असत. भरतखंडातील जमीन फार सुपिक असल्याकारणांने व आर्यांच्या लोकसंख्येचा विस्तार फार झपाट्याने झाल्याने, आर्य लोकांच्या लहान लहान टोळ्यांचे पुढारी अगर राजे यांच्या ताब्यांतील प्रदेशाचा विस्तार होत जाऊन मोठमोठ्या प्रदेशाचे राजे बनले. लहान राज्यांचा विस्तार होत चालल्या कारणाने राजसत्तेस अनियंत्रित स्वरूप प्राप्त होत चालले. महाभारतांतील राजपदाच्या उत्पत्ती संबंधीच्या माहितीवरून असे आढळते की, प्रजेनें आपल्या प्राप्तीचा काही भाग राजास द्यावा व राजानें न्यायास अनुसरून प्रजेचे पालन करण्याचे करून राजपद स्वीकारावे. महाभारतांत दुसरी एक अशी कल्पना आढळून येते की राजा निर्माण करण्यापूर्वी परमेश्वराने दंड निर्माण केला व त्या दंडास असनुरून प्रजेचे पालन करण्याकरिता त्यांने राजा निर्मिला. या दंडास मनुस्मृतिमध्ये वर्णन खाली लिहिल्याप्रमाणे केले आहे. 'वस्तुतः दंडच राजा आहे. तोच कार्यकर्ता व उदाहरण घालून देणारा आहे व तोच चारीही वर्णांच्या लोकांच्या धर्माचा जामीन आहे, दंडच सर्व प्रजांस आज्ञा करितों व तोच त्यांचे रक्षण करितो. यास्तव या धर्महेतू दंडासच ज्ञानी धर्म म्हणतात. अशा या दंडाचा योग्य उपयोग करणाऱ्या राजांचे धर्म अर्थ व काम वृद्धी पावतात. पण विषयाभिलाषी क्रोधी छळ करणारा जो राजा असतो त्याचा या दंडानेच आत्मा इत्यादिकांच्याद्वारा नाश होतो. या वर्णनावरून दंडाची सत्ता ही सर्व श्रेष्ठ असल्याचे व राजसत्ता ही दुय्यम प्रतीची व दंडसत्तेच्या पूर्णपणे अंकित असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. दंडाचे वरील प्रकारचें वर्णन ज्या

मनुस्मृतीत करण्यात आले आहे त्याच राजाचें दुसऱ्याही पकारचे वर्णन आढळून येते त्याचें ही आम्ही येथे दिग्दर्शन करितो. 'राजा हा ईश्वरी अंश असून इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरुण, चंद्र यांचे सारभूत असे अंग काढून प्रभूनें राजास बनविले आहे. मागे दर्शविल्याप्रमाणे लहान लहान राज्यांचा विस्तार झाल्यामुळे राजसत्तेवरील दाब कमी होऊन ती बळावल्यावर राजा हा ईश्वरी अंश आहे ही मनुस्मृतितील वर दर्शविलेली कल्पना अस्तित्त्वात आली असावी असा ग्रह झाल्याखेरीज राहात नाही. कालांतराने राजाच्या ईश्वरी अंशत्वाविषयीची कल्पना भरतखंडातील लोकांच्या मनांत दृढावत जाऊन ती हाडीमासी खिळून गेली. या कल्पनेचा विकास मनुस्मृतिरचना कालापूर्वी म्हणजे  ख्रिस्तीशक १०० अगर २०० वर्षांपूर्वी झाला असला पाहिजे. अलेक्झांडर दि ग्रेट यांने भरतखंडावर केलेल्या स्वाऱ्यांचे जे इतिहास हल्ली उपलब्ध आहेत या इतिहासावरून भरतखंडात त्या काळी राजसत्ताक पद्धतीप्रमाणे प्रजासत्ताक, अल्पजनसत्ताक, प्रजा प्रतिनिधीसत्ताक राज्ये लहान मोठी अस्तित्त्वात असल्याचा उल्लेख आहे. परंतु अशा प्रकारची जी थोडीफार राज्यें अस्तित्त्वात होती ती अलेक्झांडरच्या स्वारीनंतर लयास जाऊन चंद्रगुप्ताचे कालापासून साम्राज्यसत्ताक राज्यें अस्त्विात येण्यास सुरुवात झाली. सुमारे दोन हजार वर्षापूर्वी अशा प्रकाराची राज्ये अस्तित्त्वात येण्याचा जो मनू सुरू झाला तो अद्याप पावेतो कायम आहे. राजा हा ईश्वरी अंश आहे या कल्पनेचा भरतखंडात इतका काही अतिरेक झाला की, मुसलमान धर्मी मोगल बादशहा हस्तिनापुराचे तक्तावर अधिष्ठित झाल्यानंतर हिंदू प्रजेस राजदर्शन सुलभ रीतीनें होण्याकरिता राजवाड्याच्या एका खिडकीत दररोज प्रातःकाळी बसून हिंदी प्रजेस दर्शन लाभ द्यावयाचा प्रघात मोगलं बादशहानी सुरू केला. दिल्लीतील हजारो हिंदू लोक याप्रमाणे बादशहाचे दर्शन नित्य घेत असत. राजवाड्याच्या खिडकीस 'दर्शन की बारी' ही संज्ञा असून हिंदुस्थानचे बादशाह म्हणून पंचम जार्ज हे ज्या वेळी हिंदुस्थानांत आले होते तेंव्हा त्यांनी या खिडकीत बसून राजदर्शन घेणाऱ्या हिंदी प्रजेचे कोड मोगल बादशहाप्रमाणे पुरविले होते असे त्या वेळच्या प्रसिद्ध झालेल्या हकिगतीवरून सर्घश्रुत आहे. लहान लहान राज्याचा विकास होत जाऊन मोठमोठी व साम्राज्ये अस्तित्त्वात येऊन राजा हा ईश्वरी अंश आहे ही कल्पना हिंदी लोकांच्या हाडीमासी खिळली होती व राजावर कोणत्याच प्रकारचा दाब ठेवण्याची आर्यलोकांच्या पद्धतीत जरी तरतूद नव्हती तरी क्षत्रियवर्णी राजे हे निरकुश, स्वेच्छाचारी, प्रजेस गांजणारे व तिचेवर

जुलुम करणारे होते असे मात्र दिसून येत नाही. अष्टप्रधान संस्था ही राजाच्या सत्तेवर योग्य प्रकारचा दाब ठेवणारी अशी एक आर्य राजपद्धतीत योजना आहे. स्मृत्यादि ग्रंथात व नीतिग्रंथात प्रधानांच्या जागेवर ज्या माणसांची नेमणूक करावयाची त्यांचे ठिकाणी अवश्य असणारे गुण व त्यांनी आपली कामे ज्या पद्धतीने करावयाची ती पद्धत या विषयीचे विवेचन वाचले असता राजावर अष्टप्रधानांचा योग्य प्रकारचा दाब राहून प्रजेवर जुलूम करण्यास राजास वाव मिळत नसे असे दिसून येते. राजा हा क्षत्रियवर्णी असावा अशी जरी स्मृत्यादि ग्रंथातून वचनें आहेत तथापि भरतखंडात इ.स.८०० पूर्वीपासून ते इ.स. १००० पावेतो बहुवंशी क्षत्रियवर्णी क्वचितच इतर वर्णाचे असे शेकडो राजे भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात आपली राजसत्ता चालवीत असल्याकारणाने व राजा ईश्वरी अंश मानला जात असल्याने भारतीय समाजांतील लोकांत राजनिष्ठा या भावनेची चांगली जोपासना होऊन ती त्यांचे ठिकाणी दृढ होऊन बसली. यामुळे इंग्लंड वगैरसारख्या पाश्चात्त्य देशांत दृष्टीस पडणाऱ्या देशाभिमानासारख्या भावनेचे बीजारोपण भारतीय समाजांत होऊन तिची वाढ होण्यास बिलकूल वाव सापडली नाही. भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशांवरचे हे अनेक राजे परस्परांशी स्पर्धा करण्यांत व परस्परांच्या मुलखाचे हरण करण्यांत गुंतलेले असत. त्यामुळें त्यांच्या पदरी मोठे सैन्य बाळगून ते सज्ज ठेवणे त्यांस भाग पडत असे. एका राजाने दुसऱ्या राजावर सार्वभौमत्व स्थापित करून त्यांस अंकित करणे हे त्या काळी क्षत्रिय राजांचे श्रेष्ठ प्रकारचे ध्येय समजले जात असे. महाभारतांत वर्णन केलेल्या युधिष्ठिराच्या दिग्विजयासारखे दिग्विजय संपादन करण्याची आकांक्षा बलिष्ठ राजे बाळगीत असत. त्या आकांक्षामुळे भरतखंडात कोणत्या ना कोणत्या तरी प्रदेशात युद्ध सुरू असे व त्यासाठी सामर्थ्यवान राजांस आपले पदरी हजारो शूर सैनिक बाळगावे लागत. या कारणामुळें हजारों लोकांचा शिपाईगिरी हो पेशाच होऊन बसला. पुरातन काळच्या उपलब्ध असलेल्या इतिहासावरून लढवय्ये लोकांचे भरतखंडात मोठमोठे संघ असत असे दिसून येते. जो कोणी राजा पोटास देईल त्याचे पदरी राहून शत्रू राजाच्या पदरी असलेल्या पण समानवंशी व समानधर्मी अशा सैनिकाबरोबर लढण्यात युद्धोपजीवी संघातील सैनिकांनी कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध वाटत नसे. भरतखंडातील लढवय्ये लोकांच्या अंगची ही मनोरचना इतकी दृढ होऊल गेली की, परवंशी, परधर्मी अगर परदेशी अशा कोणत्याही राजाचे पदरी सैनिक या नात्यानें राहून स्वजनाबरोबर युद्ध

करणे व त्यांचा वध करणे यात कोणत्याही प्रकारचा विपरितपणा आहे असे वाटेनासे झाले. भरतखंडावर स्वाऱ्या करणारे मुसलमान धर्मी मोंगल, अफगाण, तार्तर, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज इत्यादी लोकांचे पदरी भरतखंडातील लोक सैनिक या नात्यानें राहुन स्वधर्मी स्वदेशबांधवांवर लढाईचे प्रंसगी हत्यार उपसण्यास कसे तयार होतात याचा विदेशी लोकांस अचंबा वाटतो. पांडवांचे काळापासून तो शालिवाहनाच्या दहाव्या शतकापावेतों भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशात शेकडो राजे व राजघराणीं उदयास येऊन अस्तंगत झाली. या राज घराण्यांच्या उलथापालथी होत. त्यांचा विशेष परिणाम त्या घराण्यावरच जो काही व्हावयाचा तो होत असे. देशांत जी असंख्य खेडी असत अगर अनेक खेडी मिळून झालेला जो प्रांत असे त्याच्या अंतर्व्यवस्थेत अगर त्यांत राहणाऱ्या लोकांच्या मनोरचनेत राजघराण्यांच्या उलथापालथीमुळे कोणत्याही प्रकारचा फरक होत नसे. एक राजा व त्याचे घराणे अस्तंगत पावलें व नवा राजा व नवें राजघराणे अस्तित्त्वात आले म्हणजे खेड्यांचे व प्रांताचे वंशपरंपरागत अधिकारी नवीन राजाचे अमलास राजी होऊन आपल्या वंशपरंपरागत अधिकारास चिकटून राहात व नवीन राजघराण्याशी राजनिष्ठेने वागू लागत. फार प्राचीन काळापासून शक दहाशे पावेतो भरतखंडातील होऊन गेलेल्या राजघराण्यांच्या सत्तेच्या आयुर्मर्यादेचा विचार केला असता, सर्वसाधारणपणे प्रत्येक राजघराण्याची आयुर्मर्यादा २०० पासून २५० वर्षे पावेतो असल्याचे दिसते. या पेक्षा अधिक काळ पावितो कोणत्याही राजघराण्याची सत्ता टिकल्याचे आढळत नाही. राज्याच्या उलथापालथी दोन अडीचशे वर्षाचे अंतराने हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतात होत असल्यामुळे ही गोष्ट हिंदुस्थानच्या लोकांचे अंगवळणी पडून गेली असून त्यात त्यांना विशेष असे काही वाटेनासे झाले. सामान्य जनतेचा राजकारणाशी विशेष संबंध केव्हांच नसल्याकारणाने जो कोणी राजा असेल त्यास निमूटपणे कर देऊन आपापले शेतकी व्यापार इत्यादी व्यवसाय निमूटपणे करीत राहाणे हेच समाजातील सामान्य प्रजेचें ध्येय असे. भरतखंडांत होणाऱ्या राजकीय उलथापालथीशी सामान्यपणे दोन वर्णांच्या लोकांचा विशेष संबंध येत असे. हे दोन वर्णाचे लोक म्हटले म्हणजे ब्राह्मण व क्षत्रिय हे होत. भरतखंडातील कोणत्याही राज्याचा राजशकट या दोन वर्णाच्या लोकांच्या सहकारितेनें व मदतीने चालविला असे. ब्राह्मण लोकांचा संबंध राज्यकारभारासंबंधीच्या बौद्धिक भागाशी प्रामुख्याने येत असे. क्षत्रिय लोकांचा संबंध युद्धकर्म करून प्रजारक्षण हे जे राजकारणाचे दुसरें

प्रमुख अंग त्याच्याशी येत असे. अनेक शतकांपासून वर वर्णन केल्याप्रमाणे ब्राह्मण व क्षत्रिय लोकांचा संबंध भरतखंडातील कोणत्या ना कोणत्या राजाशी अगर राजघराण्याशी सतत घडत गेल्या कारणाने वर दर्शविलेली कर्मे करणे हा त्या त्या वरील वर्णातील लोकांचा स्वभाव बनून गेला. वैश्य व शूद्र वर्णाच्या लोकांचा राज्ययंत्राशी विशेष संबंध येत असल्याचे इतिहासावरून आढळून येत नाही. यामुळे राजकीय उलथापालथी झाल्यास या वर्णाचे लोक देशाच्या राजकीय स्थितीबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. राजकारणादृष्ट्या भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतांतील प्रजेची सर्वसाधारण स्थिती कशा प्रकारची होती व निरनिराळ्या वर्णाच्या लोकांचा संबंध विद्यमान राजयंत्राशी कितपत व कोणत्या प्रकारचा येत असे याचे स्थूल विवेचन येथे पावेतो केले आहे. वारकरी व रामदासी सांप्रदाय यांच्या निर्मितीच्या व ध्येयाच्या स्वरूपाविषयी विचार करतेवेळी राजकारणदृष्ट्या भारतीय समाजांतील निरनिराळ्या वर्णाच्या लोकांचा वर दर्शविलेला स्वभाव लक्षात ठेवणे अवश्य आहे.

२३. वारकरी व रामदासी संप्रदाय येथे उगम पावले त्या महाराष्ट्रांतील धार्मिक तत्त्वज्ञान, राजकीय परिस्थिती व समाज घटना.

आता वारकरी व रामदासी सांप्रदाय जेथे निर्माण झाले त्या महाराष्ट्र देशांतील समाजाविषयी आपणांस विचार करावयाचा आहे, त्याच्या निरीक्षणाकडे आपण वळूं. येथे पावेतो हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशातील लोकसमाजाचे स्थूलदृष्ट्या निरीक्षण करून त्या समाजाच्या घटनेविषयी, त्याच्या विशिष्ट प्रकारच्या घटनेमुळे त्यातील निरनिराळ्या घटकावयवांच्या संस्कृतीभेदाविषयी, त्याचप्रमाणे त्या समाजांतील धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व राजकीय स्थित्यंतराविषयी, आम्ही काढलेले सर्वसाधारण सिद्धांत महाराष्ट्रातील समाजास लागू आहेत हे निर्विवाद आहे. या प्रदेशातील विशिष्ट प्रकारच्या आर्येतर जाती त्यांच्या धर्मसमजुती, त्यांचे रिवाज व या प्रदेशांत उदयास आलेले विविध धर्मपंथ, आणि त्यांच्या मतांचे महाराष्ट्रातील जनतेवर झालेले विशिष्ट परिणाम तसेच या प्रदेशांतील विशिष्ट प्रकारची राजकीय परिस्थिती यांचे समालोचन करणे क्रमप्राप्त आहे. भरतखंडाच्या उत्तर प्रदेशांत आर्यांच्या वसाहती होऊन बराच काळा लोटल्यावर व आर्यवर्णीय लोकसंख्येची वाढ होत गेल्यावर भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रदेशांत आर्यांच्या वसाहती होण्यास प्रवृत्तीस सुरुवात झाली. महाराष्ट्रात वसाहत

करण्याकरीता आर्यलोक भरतखंडाच्या उत्तर प्रांतातून आले त्या काळी त्यांची संस्कृती बऱ्याच श्रेष्ठ दर्जाची बनलेली होती. दक्षिण प्रदेशांत आर्यांच्या तुरळक वसाहती लंकेवर रामाची स्वारी होण्यापूर्वी ठिकठिकाणी झाल्या होत्या, असे रामायणांतील उल्लेखावरून दिसून येते. हल्लीच्या महाराष्ट्र प्रदेशास पूर्वी दंडकारण्य असे म्हणत असत. रामायणांतील उल्लेखावरून या प्रदेशांत राक्षस, भिल्ल, वानर इत्यादी लोक राहात होते. रामाच्या काळापूर्वी आर्यांच्या ज्या तुरळक वसाहती या प्रदेशांत झाल्या होत्या त्या वसाहतीच्या ऋषिपुढाऱ्यांचा व त्यांच्या आश्रमांतील लोकांचा हे राक्षस लोक नाना प्रकारचा छळ करीत. हे राक्षस लोक अत्यंत क्रूर, नरमांस भक्षक, मद्यपि शरीराने धिप्पाड व दिसण्यांत कुरूप असे होते. दंडकारण्यांत राक्षस वंशीय लोकच फक्त होते असे नाही. भिल्ल, कोळी, रामोशी, वारली, कातकरी, वैदू, मांगगारोडी, पारधी वगैरे निरनिराळ या जातींचे जे लोक प्रस्तुत काळी महाराष्ट्रांत आढळतात त्यांचेही पूर्वज या प्रदेशांत राहात असावेत असे अनुमान करणे गैरवाजवी होणार नाही. महाराष्ट्रातील ग्रामनामाच्या परीक्षणावरून जवळजवळ असे सिद्ध झाले आहे की, ही सर्व ग्राम नामे संस्कृत शब्दापासून निर्माण झाली असून आर्य लोकांनी या प्रदेशांत वसाहती केल्यानंतर त्यांनी दिलेली आहेत. आर्येतर वंशीय मूळच्या रहिवाशांच्या भाषेवरून कोणत्याही ग्रामास नाव प्राप्त झाल्याचा संशय घेण्याइतपत पुरावाही पुढे आलेला नाही असे या विषयाच्या चर्चेवरून निष्पन्न झाले आहे.* या वरून ही गोष्ट निर्विवाद ठरते की, दंडकारण्यांत एक तर कोणत्याच प्रकारचे मनुष्य समाज नसले पाहिजेत अगर जर कोणत्या मानव वंशाचे लोक या प्रदेशांत वसाहत काळी राहत असले, तर त्यांची संस्कृती इतकी हीन प्रकारची असावी की, ग्रामस्थापना करण्याची व त्यांचे नामकरण करण्याची कलाही त्यास अवगत नसली पाहिजे.

परंतु ज्याअर्थी रामायणांतील उल्लेखावरून राक्षस लोक दंडकारण्यात असल्याचे दिसतें त्याअर्थी त्यांची संस्कृती अत्यंत शूद्र प्रकारची होती असे अनुमान करणे प्राप्त आहे. अशा प्रकारच्या लोकांनी व अरण्यांनी व्याप्त असलेल्या प्रदेशांत उत्तरेकडील वसाहत करण्याकरता आलेल्या श्रेष्ठ संस्कृतीच्या आर्य लोकांचा मुख्य

* कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेला 'महाराष्ट्राचा वसाहत काल' हा प्रबंध पहा.

व्यवसाय कृषी हा असल्याने, या प्रदेशांतील अरण्याची तोड होऊन झाडीने व्याप्त असलेला प्रदेश हळूहळू कमी होत गेला व कृषिकर्मास उपयुक्त अशा प्रदेशाचा विस्तार वाढत चालला. शेतीचा व्यवसाय करणाऱ्या अनेक आर्यकुटुंबाचे संघ बनून लहान लहान ग्रामे महाराष्ट्रांत अस्तित्त्वात येऊ लागली. हा सर्व प्रदेश अरण्यमय असल्याने वरील प्रकारच्या ग्रामांची जरी बरीच वाढ होत चालली, तथापि दळणवळणाच्या सोयी या प्रदेशांत निर्माण करण्याचे काम बिकट असल्याकारणाने, प्रत्येक ग्रामांतील लोकसमहुास त्याच्या व्यवसायाच्या दृष्टीने भासणाऱ्या गरजा व अडचणी बाबत स्वावलंबी असणे जरुरीचे झाले. महाराष्ट्राच्या ग्रामांतील लोकसमुहाची रचना भरतखंडाच्या इतर प्रांतांच्या ग्रामांतील लोकसमुहाच्या सर्वसाधारण धर्तीवर झालेली असून, शिवाय या लोक समूहाच्या रचनेस व्यवसायात्मकदृष्ट्या अवश्य अशा विशिष्ट स्वरूपाच्या रचनेची जोड प्राप्त झालेली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार प्रमुख वर्णाच्या व या वर्णाच्या मिश्रणांने उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या जातींच्या आर्येतर वंशीय महार,मांग, भिल्ल, कोळी, रामोशी इत्यादी लोकांच्या मिलाफाने प्रत्येक महाराष्ट्रीय ग्रामातील लोकसमाज बनला आहे. व्यवसायात्मकदृष्टच्या प्रत्येक ग्रामांतील बहुसंख्य लोक शेतीचा व्यवसाय करून आपली उपजीविका करतात. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने हा समाज बद्ध असल्यानें या समाजातील लोकांचे लग्न, अंत्यविधी इत्यादी कर्मे करण्याकरता ब्राह्मण वर्णीय उपाध्याची जरूर लागे. ही कर्मे करण्याकरता नेमलेल्या ब्राह्मणांस जोशी, अगर ग्राम उपाध्याय असे म्हणत. ग्रामासंबंधी लेखनाचे कामही जोशांकडेच असे व या कामगिरीबद्दल ग्रामातून कृषिचा व्यवसाय करणाऱ्या लोकांकडून जमिनीतील उत्पन्नापैकी अल्पसा हिस्सा जोश्यास मिळत असे. ग्रामांतील लोकसमाजाची धर्मपरंपरा कायम राखण्याकरता एखाद्या देवतेचें सार्वजनिक देऊळ प्रत्येक ग्रामात असे. महाराष्ट्रातील ही देवता म्हणजे 'शंकर' ही होय. या देवतेचे देवालय महाराष्ट्रातील प्रत्येक गावात आढळते. या देवतेची पूजाअर्जा करण्याचे काम गुरुवाकडे असे. ग्रामातील लोकांस बेल देणे, लग्नकार्यप्रसंगी वाजंत्र वाजविणे व सामुदायिक भोजनप्रसंगी लागणाऱ्या द्रोण-पत्रावळी पुरविण्याचे काम गुरुवाकडे असे. याचप्रमाणे सुतार, लोहार, चांभार, महार अथवा वेसकर, कुंभार, न्हावी, धोबी, भाट, इत्यादी ग्रामसमाजोपयोगी कर्मे करणारे लोक प्रत्येक ग्रामात अस्तित्त्वात येऊन ग्रामातील लोकांकडून जमिनीचे उत्पन्नापैकी अल्पसा अंश मोबदल्या दाखल

या लोकांना मिळत असे. या लोकांसच वृत्तिवंत अथवा वतनदार म्हणण्याचा प्रघात अस्तित्त्वात येऊन वरील कर्मे करण्याचा व त्याबद्दल मोबदला घेण्याचा प्रवास परंपरेने या लोकांत सुरू झाला. महाराष्ट्रभर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन त्यांची राजकीय सत्ता स्थापन झाल्यानंतर ग्रामोपयोगी कर्मे करणाऱ्या वरील लोकांत मुल्ला याचा समावेश होऊ लागला. वरील वतनदारांखेरीज ग्रामसंस्थेचा मुख्य जो ग्रामधिकारी पाटील, तो ग्रामसंस्था स्थापनेच्या सुरुवातीपासूनच मुख्य वतनदार समजला गेला. ग्रामधिकारी या नात्याने पाटलासही महत्त्वाचे हक्क व मानपान पूर्वपरंपरेने चालत आलेले आहेत. महाराष्ट्राती जी लोकसंख्या आहे त्यापैकी बराच मोठा भाग हजारो ग्रामांत वस्ती करणारा आहे. अशा या ग्रामांत वस्ती करणाऱ्या लोकसमाजाची रचना कशाप्रकारे बनली आहे याचे अल्प दिग्दर्शन येथपर्यंत आम्ही केले आहे. आता महाराष्ट्रात वेळोवेळी अस्तित्त्वात आलेल्या राजसत्ता व ग्रामसमाज यांचा परस्पराशी संबंध कोणत्या स्वरूपाचा असे याचेही या ठिकाणी परीक्षण करणे अवश्य आहे. अनेक ग्रामांचा समुदाय देशमुख व देशपांडे या दोन वतनदारांच्या ताब्यात असे. देखमुख वतनदारांकडे त्याच्या ताब्यांतल्या ग्रामांतील जमिनींच्या सरकार देण्याच्या वसुलांचे काम असें व देशपांड्याकडे त्याचा हिशेब ठेवण्याचे काम असे. वरील वतदारांचे अधिकार वंश-परंपरा एकाच घराण्याकडे चालत असत. या वतनदारांच्या दर्जास व जबाबदारीस साजेसे हक्क व मानपान त्यांना मिळत असत. पुरातन काळापासून महाराष्ट्रातील देशमुख वतनदारास राजा या संज्ञेने संबोधिण्याचा प्रघात असल्याचे दिसून येते. यावरून देशमुख वतनदारीच्या ग्रामावर त्याची सत्ता जवळजवळ एखाद्या राजाप्रमाणे असे. अशा प्रकाराचे अनेक राजे सगळ्या महाराष्ट्र देशभर पसरलेले होते. देमशुख हा वृत्तिवंत बहुशः महाराष्ट्रताील क्षत्रियांपैकी असे व देशपांडे हा बहुशः ब्राह्मणवर्णापेकी असे. देशमुखाप्रमाणेच देशपांड्याचेही वजन त्यांच्या ताब्यातील ग्रामांतील लोकांवर चांगले असे. प्रचलित राजसत्ता व महाराष्ट्रातील ग्रामसमाजातील लोक यांच्या दरम्यानचे दुवे म्हणजे देशमुख व देशपांडे वतनदार हे होत. महाराष्ट्रांत राजकीय सत्ता स्थापन करण्याची जो कोणी आकांक्षा बाळगी त्याला या वतनदारांस राजीखुशीने अगर वचकानें आपल्या बाजूस वळवून घ्यावे लागत असे. या दोन वृत्तिवंतास वश करून घेतले म्हणजे प्रचलित राजसत्ता दृढ होऊन त्याला बळकटी येत असे. फार प्राचीन काळापासून महाराष्ट्रातच काय परंतु सर्व भरतखंडातील कोणत्याही

राजसत्ताधिकारी व्यक्तीच्या उत्पन्नाचा मुख्य भाग जमीन महसुलाचा असे व या उत्पन्नाची महाराष्ट्र देशांतील सर्व सूत्रें देशमुख-देशपांडे वतनदारांचे हाती असत. यामुळे कोणत्याही राजसत्ताधारी व्यक्तींने महाराष्ट्रातील या दोन वतनदारास गोडीगुलाबीन अगर जबरदस्तीने अंकित करून घेऊन आपल्या बाजुस खेचून आणले म्हणजे महाराष्ट्रांतील लोकसमाजावरील राजकीय सत्ता त्या व्यक्तीचे हातात आल्यासारखी होत असे. देशमुख-देशपांडे वतनदारांचे सर्वस्व त्यांचे हातात असलेल्या कार्याच्या स्वरूपामुळे त्यांना प्राप्त झाले होते हे उघड आहे.

महाराष्ट्र देशांत मुसलमानांची सत्ता स्थापित होईपर्यंत ज्या राजकीय उलाढाली होत त्यांचा परिणाम महाराष्ट्रातील ग्रामांतून वस्ती करणाऱ्या बहुसंख्य लोकांवर म्हणण्यासारखा होत नसे. राजसत्तेच्या उलथापालथीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामांतील लोक समाजाचे व्यवसाय, त्यांच्या आकांक्षा, त्यांची राहणी व त्यांचे देवधर्म यांच्यावर म्हणण्यासारखा कोणत्याही प्रकारचा परिणाम घडत नसे. मुसलमानांचा दक्षिणेत प्रवेश होईतोपर्यंत वैदिक धर्मानुयायी एका क्षत्रिय राजाचें राज्य नाहीसे होऊन दुसऱ्या वैदिक धर्मानुयायी क्षत्रिय राजाचें राज्य येई. या नवीन राजाचें ध्येय राज्य स्मृतिधर्मास अनुसरून चालविण्याचे व प्रजेकडून जमिनीचा सारा वसूल करावयाचा व खेरीज दुसरे कोणत्याही प्रकारचे नसल्यानें नवीन आलेल्या राजघराण्याबद्दल महाराष्ट्रातील बहुसंख्य ग्रामसमाजातील प्रजेस विशेष असंतोष बाळगण्याचें कारण उरत नसे. नष्ट झालेल्या राज घराण्यावर प्रेम करणाऱ्या कांही थोड्या लोकांचे अस्तित्त्व एकच बाब प्रजेच्या मनाचा क्षोम करण्यास कारणीभूत होण्याचा संभव असे. एक कारण वगळ्यास राजसत्तेच्या उलथापालथींमुळे महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनता नव्यानें आलेल्या राजघराण्यांशी राजनिष्ठेने थोडक्याच काळांत वागू लागे. सर्वसाधारण मनुष्य स्वभाव लक्षात घेता एखादा विशिष्ट राजघराण्यासंबंधी सामान्य जनतेस प्रेम वाटत असे तरी तें अढळ टिकून राहते अशांतला काही भाग नाही. आईबापासारख्या प्रत्यक्ष जन्म देऊन प्रेमाने पालनपोषण करणाऱ्या व्यक्ति मृत्यू पावल्या असता कालांतराने त्यांचा विसर पडून जो मनुष्य सुखासमाधानाने आपल्या संसाराचा गाडा चालवितो तो मनुष्यप्राणी अस्तात गेलेल्या राजघराण्याविषयी निरंतर प्रेम बाळगून सतत कष्टी राहील हे असंभाव्य आहे. बहुसंख्य महाराष्ट्र प्रजेच्या मनोरजनेचे स्वरूप जरी या प्रकारचे असे तथापि अस्त पावलेल्या राजघराण्याचे सरदार आश्रित, नातेवाईक यांचे राजसत्तेच्या

उलथापालथीच्या योगाने भयंकर नुकसान होत असे. अशा लोकांचा राजघराण्याच्या उलथापालथीमुळे समूळ नाश होई अगर त्यांना देशांतर करणे भाग पडे. तसेच ज्यांच्यावर अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव असे असा दुसरा एक वर्ग म्हणजे वर नमूद केलेल्या देशमुख-देशपांडे या वतनदारांचा होय. एका राजघराण्याची सत्ता नष्ट झाल्यामुळे त्याच्या आश्रित वर्गावर जशा प्रकारचा परिणाम होत असे तसा परिणाम या वतनदारांवर सहसा होत असे. महाराष्ट्रातील कोणत्याही राजसत्तेला या वृत्तिवंतांशी नमूनच वागावे लागे. इतकेच नव्हे, तर प्रत्येक राजकीय क्रांतीच्या वेळी नूतन राजसत्ता स्थापन करणाऱ्या व्यक्तीला स्वतःची सत्ता दृढ करण्याकरता ज्या अनेक उपायांची योजना करावी लागे त्यापैकी खालील दोन उपायांचा या वतनदारांच्या बाबतीत आश्रय करावा लागे. हे दोन उपाय म्हणजे या वतनदारांस लालुच दाखवून आपल्या पक्षात सामील करून घेणे अगर शक्तीच्या जोरावर त्यांना पादाक्रांत करून निर्बल करणे हे होत. एक राजघराणे नष्ट होऊन त्याच्या ठिकाणी आलेल्या राजघराण्याच्या सत्तेची घडी एकदा नीट बसली म्हणजे देशमुख-देशपांडे वतनदार स्वार्थासाठी नव्या राजसत्तेशी राजनिष्ठेचे धोरण स्वीकारीत व सुखासमाधानाने आपल्या पूर्व परंपरागत वृत्तीचा उपयोग घेऊ लागत. महाराष्ट्रातील लोकसमाजाची राजकीय स्थिती शिवाजी महाराजांचा उदय होईतोपवितो वर दर्शविलेल्या स्वरूपाची होती. अशा प्रकारच्या राजकीय वातावरणात वैयक्तिक राजा अगर राजघराणे अगर देशमुख-देशपांड्यांसारखे सत्ताधारी वतनदार यांच्याविषयी निष्ठा व पूज्यभाव महाराष्ट्रातील सामान्य जनतेत वसत असे. उपलब्ध झालेल्या इतिहास साधनावरून इसवीसनापूर्वी कांही काळ महाराष्ट्र देश अशोकाच्या साम्राज्य सत्तेखाली होता. ते साम्राज्य लयास गेल्यानंतर महाराष्ट्रांवर शातवाहन राजघराण्याचे राजकीय वर्चस्व स्थापन झाले. ते इसवीसनाचे पश्चात सव्वादोनशे वर्षेपर्यंत कायम होते. शातवाहनांचे पश्चात महाराष्ट्रभर कोणत्या घराण्याची राजकीय सत्ता आली हे निश्चितपणे समजण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. शातवाहनांची राजसत्ता नष्ट झाल्यानंतर खानदेश, नाशिक वगैरे महाराष्ट्राच्या काही भागावर अभीर.. नावांचे राजे राज्य करीत असत असे दिसते. शातवाहनांच्या पूर्वी भोज, महाभोज रट्ट, राष्ट्रीक, महाराष्ट्रिक या नावांने प्रसिद्ध असलेल्या राजघराण्यांची राजकीय सत्ता महाराष्ट्राच्या निरनिराळ्या प्रदेशावर होती व या घराण्यांना पादाक्रांत करून शातवाहनांनी आपली सत्ता महाराष्ट्रावर स्थापन केली होती. शातवाहन

राजघराण्यांच्या सत्तेस जसजशी उतरती कळा लागल चालली तसतशी महाभोज महाराष्ट्रीक यांची घराणी पुढें सरसावूं लागली. शातवाहनानंतर राष्ट्रकुट, चालुक्य, यादव यांचे हातात महाराष्ट्राची राज्यसूत्रे आळीपाळीने होती. महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश होऊन त्यांची सत्ता स्थापन होण्यापूर्वी, देवगिरी ऊर्फ दौलताबाद एथील यादव घराण्याचे हाती महाराष्ट्राची राजसत्ता असून ती यादव घराण्यातला शेवटचा पुरुष रामदेवराव जाधव याच्या हातातून अल्लाउद्दिन खिलजीने तेराव्या शतकात हिरावून घेऊन महाराष्ट्र देशावर मुसलमानी राजकीय सत्ता स्थापन केली. महाराष्ट्रीय समाजात भागवत धर्म ऊर्फ वारकरी सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी राजकीय उलाढाली, कोणत्या प्रकारच्या व कशा पद्धतीने झाल्या होत्या यांचे योगाने महाराष्ट्रातील जनतेची सर्वसाधारण राजकीय मनोरचना कशा प्रकारची बनली होती हे आम्ही आतापावेतो केलेल्या विवेचनांत स्पष्ट करून दाखविले आहे. कोणत्याही समाजात अस्तित्त्वात येणाऱ्या नूतन पंथाचे अगर सांप्रदायांचे सत्यस्वरूप कळण्याकरिता ज्या तीन बाबींच्या ज्ञानाची आवश्यकता असल्याचे आम्ही या भागाचे सुरुवातीस नमूद केले आहे त्यापैकी दोन बाबींचे स्पष्टीकरण येथे पावेतो झाले आहे. ज्या तिसऱ्या बाबीच्या ज्ञानाची जरूर असल्याचे आम्ही सुरुवातीस म्हटले आहे. ती म्हणजे ज्या सांप्रदायाच्या निर्मितीचा विचार कर्तव्य आहे. तो सांप्रदाय ज्या काळी उदयास आला त्या काळच्या त्या समाजाच्या विविध परिस्थितीचे ज्ञान ही होय. विषय विवेचनाच्या सोयीच्या दृष्टीने वारकारी संप्रदायाच्या निर्मितीची मीमांस करतांना या संबंधाचे दिग्दर्शन करणे उचित असल्याकारणाने ते पुढील प्रकरणात करण्याचे ठरवून हे बरेच लांबलेले प्रकरण आम्ही एथे पुरे करितो.

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

# प्रकरण २ रे

# भागवतधर्म ऊर्फ वारकरी सांप्रदाय

**१. महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाचा उगम व तत्कालीन परिस्थिती.**

वारकरी सांप्रदाय ऊर्फ भागवतधर्म कोणत्या कारणामुळे उदयास आला व त्याचे ध्येय कोणत्या प्रकारचे होते याची यथार्थ कल्पना येण्यास या सांप्रदायाच्या उदयकाली महाराष्ट्रीय समाजाची सामाजिक व धार्मिक परिस्थिती कशा प्रकारची होती हे विचारात घेणे अवश्य असल्याचे मागील भागाच्या शेवटी आम्ही नमूद केले आहे. प्रस्तुत या सांप्रदायाच्या निर्मितीविषयी जो पुरावा आपणास उपलब्ध झाला आहे. त्यावरून हा सांप्रदाय तेराव्या शतकाचे सुमारास अस्तित्त्वात आला असे दिसून येते. या पूर्वी शे-दोनशे वर्षे अगोदर म्हणजे अकराव्या व बाराव्या शतकात महाराष्ट्रीय समाजाची राजकीय व सामाजिक व धार्मिकदृष्ट्या कोणत्या प्रकारची स्थिती होती व या समाजातील लोकांच्या ध्येयाचे स्वरूप वैयक्तिकदृष्ट्या कोणत्या प्रकारचे होते हे प्रथम स्पष्ट करतो. हे करण्यापूर्वी महाराष्ट्रांतील भक्तिप्रधान धाम्रिकम सांप्रदायाचा उदय ज्या तेराव्या शतकांत झाला तत्पूर्वी भरतखंडात भक्तिप्रधान धार्मिक सांप्रदाय अन्यत्र कोठे उदयास आले होते की कसे हे पाहाणे अगत्याचे आहे. कै.राजवाडे यांनी फार वर्षांपूर्वी या मुद्याची चर्चा व विवेचन केलेला एक महत्त्वाचा लेख 'महाराष्ट्र सरस्वतीमंदिर' या नावाच्या मासिकांत सिद्ध केला होता. त्यांत उत्तर हिंदुस्थानांत उदयास आलेल्या भक्तिसांप्रदायी संतांची चरित्रे वर्णन करणाऱ्या नाभाजीच्या भक्तमाला ग्रंथाविषयी खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

नाभाजीने उत्तर हिंदुस्थानातल्या संतांची जी यादी दिली आहे त्यात सुमारे १०० संतांची नावे आहेत. ती शके १२०० पासून १६०० पर्यंतची आहेत. त्यात माहुलीचा बिल्वमंगल पैठणचा ज्ञानदेव व पंढरपूरचा नामदेव या तीन महाराष्ट्रीय संतांचा उल्लेख केलेला आहे. नाभाजीचें समकालीन जे तुकाराम, रामदास, वामन वगैरे महाराष्ट्रीय संत त्यांचा निर्देश नाभाजीनें केलेला नाही.

या उताऱ्यावरून ज्ञानेश्वरांच्या उदयापूर्वी दोनशे वर्षे उत्तर हिंदुस्थानात भक्तिप्रधान

धार्मिक सांप्रदायाचे अनेक संत होऊन गेल्याचे दिसते. ही गोष्ट लक्षात घेतली असता महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरकालापासून भक्तिसांप्रदाय उदयास येण्यास जी विशिष्ट प्रकारची कारणे झाली त्याशिवाय उत्तर हिंदुस्थानांत हा सांप्रदाय उदयास येण्यास कोणत्या विशेष प्रकारची कारणे झाली हे पाहणे जरूर आहे. बुद्धधर्माची पीछेहाट होऊन श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची पुनर्स्थापना क्रमाक्रमाने जरी उत्तर हिंदुस्थानांत होत होती तथापि ज्या संस्कृत भाषेंत श्रुतिस्मृत्युक्त धर्माचे ज्ञानभांडार साठविलेले होतें तिची पीछेहाट होऊन मागधी, शौरसेनी पैशाची या भारतीय समाजांतील बहुजनांच्या प्राकृत बोलभाषांचा उत्तरोत्तर विकास होत चालला. विकासाबरोबर या भाषा बोलणाऱ्या जनतेचे महत्त्वही वाढत चालले. श्रुतिस्मृत्युक्त वर्णाश्रमधर्माच्या आचारांचे पालन सामान्य जनतेकडून होणे दुर्घट होते. या शिवाय उपनिषदादि ग्रंथांत या धर्मांचे जे तत्त्वज्ञान ग्रथित केलेले आहे. हे ग्रहण करण्याची बुद्धिमत्ता या लोकांचे ठिकाणी फार अल्प होती. असे स्थितीत परमेश्वर प्राप्तीचा अत्यंत सुलभ व बिनभानगडीचा व या जनतेस सहजगत्या आचरण्यासारखा मार्ग म्हणजे भक्तिमार्ग हा होय. श्रीराम, श्रीकृष्ण इतर दैवतांचे पूजन या लोकांत प्रचलित होते. यामुळे भक्तिमार्गाचे द्वारें या दैवतांचे भजन पूजन इत्यादि भक्तिमार्गांतर्गत बाबींचा उपदेश करणारे अनेक संत उदयास येऊन त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार उत्तर हिंदुस्थानांत केला. उत्तर हिंदुस्थानात भक्तिमार्ग उदयास येण्याची कारणे ही आहेत असें आम्हास वाटते.

येथेपावेतो उत्तर हिंदुस्थानांत भक्तिप्रधान धार्मिक सांप्रदाय उदयास येण्याची कारणे दर्शविल्यावर महाराष्ट्रांत हा सांप्रदाय उदयास येण्यास कोणती विशिष्ट प्रकारची कारणे झाली याचे आम्ही विवेचन करतो.

बाराव्या शतकांत महाराष्ट्र देशाचा महत्त्वाचा भाग म्हणजे गोदावरी नदीकाठचा प्रदेश होय. या प्रदेशात राहणाऱ्या महाराष्ट्रीय समाजास त्या काळी महाराष्ट्राच्या इतर भागांतील लोक समाजापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. राजवैभव, विद्या, कलाकौशल्य इत्यादी विषयांत हा प्रांत व त्यांतील लोक श्रेष्ठ पदावर अधिष्ठित झाले होते. गोदातटाकाच्या उत्तर प्रदेशांतील देवगिरी नगर हे यादव राजघराण्याचे राजधानीचे ठिकाण असून त्याची सत्ता महाराष्ट्रात समाविष्ट होणाऱ्या बऱ्याच भागावर चालत होती. गोदातटाकाच्या दक्षिण प्रदेशांत कल्चुरी घराण्याची राजसत्ता नांदत असून त्या घराण्याची राजधानी कल्याणीनगर हे होते. महाराष्ट्रातील काही भाग व कर्नाटक प्रांताचा बराच मोठा भाग या घराण्यांच्या ताब्यांत होता. वरील

दोन्ही राजघराणी क्षत्रिय वर्णाची असून त्यांच्या राज्यांत सुबत्ता नांदत होती. यादव घराण्यांत सिंघण राजा हा महान पराक्रमी म्हणून नावाजला गेला होता. सिंघणाच्या पश्चात देवगिरीच्या गादीवर बसलेल्या रामदेवराव जाधवाच्या कारकीर्दीविषयी खाली नमूद केलेल्या उद्‌गार ज्ञानेश्वरांनी काढले आहेत -

ऐसें युगीं परि कळी । आणि महाराष्ट्र मंडळी ।
श्री गोदावरीच्या कुळी । दक्षिण लिंगी ।।
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्री महालया असे।।
तेथ यदुवंश विलास । जो सकळ कला निवास ।
न्यायाते पोषी क्षितीष । श्री रामचंद्र ।।

यादव घराण्यापैकी मुसलमानी स्वाऱ्यास बळी पडलेल्या रामदेवरावाच्या कारकिर्दीचे सकळ कलांचा निवास व न्यायानें पृथ्वीचे रक्षण करणारा असे वर्णन ज्या अर्थी ज्ञानेश्वरानी केले आहे, त्या अर्थी रामदेवरावापेक्षा शतपट अधिक पराक्रमी असा सिंघण व त्यानंतरचा कृष्ण देव यांच्या कारकिर्दी या स्वरूपाच्या असल्या पाहिजेत याची कल्पना करता येणें कठीण नाही. कोणत्याही समाजात सुबत्ता व श्रेष्ठ प्रकारची बुद्धिमत्ता यांचे योगानेच कलांचा उत्कर्ष होत असतो. हे लक्षांत घेतले असता वरील यादव राजांचे कारकिर्दीत महाराष्ट्रीय समाजाचे लोक बुद्धिमान, सुसंपन्न व समाधानी होते असे अनुमान करण्यास कांहीएक प्रत्यवाय नाही. अल्लाउद्दिन खिलजीनें रामदेवराव जाधवावर केलेल्या स्वारीतच त्याचा पराभव केला. या स्वारीचे अंती त्या उभयतांमध्ये जो तह झाला त्या तहाच्या अटीवरून रामदेवराव जाधवापांशी किती अपार संपत्ती होती याची कल्पना होते.*

* It was thorefore agreed that he should pay to Alla-ud-din 600 maunds of pearls, two of jewels 1000 of silver, 4000 pieces of silk, and other precion things, Early History of the Deeccani-by Dr.Ramkirhsan Gopal Bhandarkar. (II Edition)

अर्थ : त्या योगे असे इरले की रामदेवरावांने अल्लाउद्दिनास मोती ६ मण, जवाहिर २०० मण, चांदी १००० मण व रेशमी कापड ४००० ठाणे व मौल्यवान वस्तू द्याव्या.

"Allanddin Khillji a Study" असा एक लेख मि.अब्दुल रशिद या गृहस्थांनी जानेवारी १९२६ च्या हिंदुस्थान रिव्ह्यूच्या अंकात प्रसिद्ध केला आहे. या लेखाच्या २११ पानावर लेखकांने प्रदर्शित केलेले विचार आम्ही दर्शविलेल्या मतास पोषक असे आहेत.✽

रामदेवरावाची महाराष्ट्रीय प्रजा सुसंपन्न असल्याखेरीज एवढ्या अपार संपत्तीचा त्यांचे पाशी संचय होणें असंभवनीय आहे. गोदावरीच्या उत्तर भागाप्रमाणेच तिच्या दक्षिण भागाकडील कल्चुरी राजघराण्याच्या सत्तेखालील महाराष्ट्रीय समाज सुसंपन्न स्थितीत होता असे डॉ.भांडारकरांच्या इतिहासातील खालील उल्लेखावरून दिसून येते.

विक्रमादित्य हा त्याचें राज्यांतील प्रजेवर चांगल्या प्रकारे राज्य करीत असे आणि त्याची प्रजा सुखी होती. त्याच्या राज्यांत अशा प्रकारचे सुरक्षितता नांदत होती की, त्याच्या राज्यांतील लोक रात्रीदेखील आपल्या घराची दारे खुली ठेवून निजत असत आणि चोरांच्या ऐवजी चंद्राची किरणें त्यांच्या घरात प्रवेश करीत. तो

---

"The great accumulation of treasures of gold a precous stones found by the conqueneror in the possion of Rajes and prieste connot be wholly attorbution their thrifty holdings. Neither soverigns not pricecan acculate weath from a needy people. We no... therefore naturelly conclude that the population southern India had for generations been wealthy judging from the alology of History we may fattribute to a peaceful rule and devleped resour the foreign trade and gold mines the undoudbted tence of prospeity at the invastion of Milik Kafur.

these conclusions are futher arenglthed by rroboration we recievs from a very disinect account the condition of the Deccan from the pan of lbine Batuta a native of Tangier who travelled throgh the contry during the Mahamed Taghlak."

अर्थ : राजे आणि देवालयांचे पुजारी यांचेपाशी मुसलमान स्वाऱ्या करणाऱ्यांना जवाहीर इत्यादी जो अपार खजिना साकळलेला सापडत असे त्या खजिन्याचा संचय सर्वस्वी त्या राजांनी अगर पुजाऱ्यांनी मालमत्तेचा काटकसरीने केल्यामुळेच होत असे असे म्हणता येणार नाही. ज्या लोकांस खाण्याची ददात आहे अशा लोकांपासून त्यांचेवर राज्य करणारे राजे अगर देवालयाचे पुजारी यांना अपार संपत्ती मिळणे शक्य नाही. यावरून स्वाभाविक

अत्यंत उदार आणि गरिबांस अपार दान देणारा होता. तो विद्वतेचा मोठा भोक्ता असून त्याचे कारकिर्दीत बिल्हण आणि याज्ञवल्क्य स्मृतीवर मिताक्षरा नावांची टीका लिहिणारा विज्ञानेश्वर अशा प्रकारच्या विद्वानांस त्याचा आश्रय होता.

विक्रमादित्याच्या कारकिर्दीचे हे वर्णन डॉ.भांडारकर यांनी त्या काळचे शिलालेख, तांम्रपत्रे, राजप्रशस्त्या इत्यादिकांचे आधारे केलेले आहे. महाराष्ट्रीय समाजांतील लोकांच्या वर वर्णन केलेल्या स्थितीवरून हे उघड होत आहे की, अकराव्या व बाराव्या शतकांत महाराष्ट्रातील लोकांची सांपत्तिक स्थिती सुखासमाधानाची असून त्यांच्यावर राज्य करणाऱ्या राजघराण्याशी महाराष्ट्रांतील लोक राजनिष्ठेने वागत असत. ही गोष्ट लक्षात घेता त्या काळच्या महाराष्ट्रीय समाजांतील लोकांचे विशिष्ट स्वरूपाचे असे काही एक राजकीय ध्येय असावे असे दिसत नाही. परंतु सामाजिक समतेच्या दृष्टीने विचार केला असता या समाजांतील लोकांची वृत्ती समाधानाची होती असे म्हणवत नाही. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी शके ७०० ते ८०० चे दरम्यान श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची भरतखंडात पुनर्स्थापना केल्यापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र इत्यादि प्रमुख वर्णाचे लोक व या प्रमुख वर्णात समाविष्ट होणाऱ्या अनेक पोटजातीचे लोक श्रुतिस्मृतीप्रणीत आचारधर्मान्वयें आचरण करू लागले होते.

**महानुभाव व लिंगाईत सांप्रदायांचा उद्‌गम व त्यांची पार्श्वभूमी.**

तीन चारशे वर्षाच्या या धर्माच्या सतत आचरणामुळे महाराष्ट्रीय समाजांतील वैश्य व शूद्र वर्णातील लोकांच्या ठायी ब्राह्मण व क्षेत्रिय वर्णातील लोकांच्या श्रेष्ठत्वाविषयी विषाद उत्पन्न होऊन त्यांची मने असंतुष्ट झाली होती. श्रेष्ठ व हीन संस्कृतीच्या लोकांच्या निकट सहवासामुळे बनलेल्या समाजांत कनिष्ठ वर्णाच्या लोकांची वरील

अनुमान असे निघते की, दक्षिण हिंदुस्थानांतील लोक पिढीजात संपत्तीमान पाहिजेत. इतर देशाच्या इतिहासावरून राज्यांत नांदणारी शांतता, देशात उत्पन्नाच्या बाबींची जोपासना व वाढ, परदेशाच्या व्यापारापासून होणारी किफायत इत्यादी कारणांमुळे त्या देशांच्या अपार संपत्तीचा संचय मालिकाकाफरने दक्षिण स्वारी केली त्या काळी झाला असला पाहिजे असें स्वाभाविक अनुमान निघते. काढीलेल्या या अनुमानास महंमद तुघलचे कारकिर्दीत ताजियारचा रहिवासी इब्ब-इ-बतूता या प्रवाशाने दक्षिण हिंदुस्तानचे जे वर्णन दिले आहे त्याचे उत्तम प्रकारची बळकटी येत आहे.

प्रकारची मनोरचना श्रेष्ठ वर्णाच्या लोकांचा दर्जा त्यास प्राप्त होईतोपर्यंत अस्तित्त्वात राहणे अपरिहार्य असते. त्या नियमास अनुसरून त्याकाळी महाराष्ट्रीय समाजांतील कनिष्ठ वर्णाच्या लोकांची मनोरचना वर दर्शविलेल्या स्वरूपाची बनली असली पाहिजे हे उघड आहे. या पेक्षाही महाराष्ट्रातील ब्राह्मण व क्षेत्रिय वर्णाच्या लोकांशिवाय अन्य वर्णाच्या लोकांची मने असुंष्ट होण्यास दुसरे एक बलवत्तर कारण त्या काळी उत्पन्न होऊन जोरावर चालले होते. हे दुसरे कारण धार्मिक स्वरूपाचे होतें. धर्मदृष्ट्या त्या काळच्या महाराष्ट्रातील लोकसमुदायाच्या मनोरचनेचा विचार केला असता या कारणाची यथायोग्य कल्पना वाचकास होणार आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी ब्राह्मण वर्णांत जन्म व संन्यासाश्रमाचा स्वीकार याखेरीज मोक्षप्राप्ती नाही असा सिद्धांत स्थापित केला होता. याचा अर्थ ब्राह्मणाव्यतिरिक्त इतर वर्णास मोक्षप्राप्ती नाही. याचे योगाने ब्राह्मणास भलतेच श्रेष्ठत्व प्राप्त होऊन त्या वर्णाच्या विद्वान मंडळीत इतर वर्णाच्या लोकविषयी एक प्रकारची तुच्छता उत्पन्न झाली. यामुळे ब्राह्मणाविषयी वैश्य, शूद्र इत्यादी वर्णाच्या लोकांत मत्सरभाव उत्पन्न झाला. कोणत्याही थोड्या बहुत सुसंस्कृत माणसास मग तो कोणत्याही जातीचा असो त्यास मोक्षप्राप्तीचे ध्येय व मार्ग खुला असावा असे स्वाभाविकपणे वाटणार व या मुभेच्या आड जर कोणी कृत्रिम बंधने निर्माण केली तर ती त्यास सहन होणार नाहीत हे उघड आहे.

आचार्याच्या सिद्धांताच्या योगानें ब्राह्मणांखेरीज अन्य वर्णांच्या लोकांची धर्मकारणदृष्ट्या मनोवृत्ती असंतुष्ट बनली होती. खुद्द ब्राह्मणांपैकीही कित्येक विद्वान विचारी लोकांचे मनांत मनुष्याच्या मोक्षबंधनास कारणीभूत होणारे जें मन त्याची शुद्धी होण्याची शक्यता श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माच्या निव्वळ आचारविषयक विधिनिषेध रूपी आज्ञात कितपत आहे असे विषयी शंका उत्पन्न होऊ लागली होती. या मुळे व वैश्य शूद्रादि कनिष्ट वर्णातील लोकांचे ठायी उदयास आलेल्या मोक्षप्राप्तीविषयक आकांक्षामुळे श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माविरुद्ध बंड उभारून याच्याशी स्पर्धा करणारे दोन नूतन पंथ महाराष्ट्रांत त्या काळी उदयास आले, हे पंथ म्हटले म्हणजे मानभाव व लिंगाईत हे होत. या दोन पंथांचे उत्पादक कोण होते, त्यांनी उपदेशलेली तत्त्वे कोणत्या प्रकारची होती व त्यांच्या तत्त्वाच्या प्रसाराच्या योगाने महाराष्ट्रीय समाजातील जनतेवर कोणत्या प्रकारचा परिणाम घडला इत्यादी मुद्द्यांचे दिग्दर्शन व विवेचन प्रस्तुत स्थळी करणे अवश्य आहे.

मानभाव पंथानुयायी व मानभावेतर यांचे या पंथाच्या उत्पती कालाविषयी त्याचप्रमाणे या पंथाच्या संस्थापकांविषयी एकमत नाही. मानभाव पंथाची उत्पती, त्याची तत्त्वे, त्याचे वाङ्‌मय इत्यादी विषयां+संबंधी महाराष्ट्रीय समाजांत बराच काळपावेतो अज्ञान नांदत होते. प्रथम १८९९ सालच्या सुमारास कै.लोकमान्य टिळक यांनी या पंथासंबंधी माहिती श्री.विद्वांस अनुभवा यांच्याकडून मिळवून केसरी वर्तमानपत्रांत छापवून प्रसिद्ध केली. त्यानंतर या पंथाविषयी महाराष्ट्रात अनुकूल प्रतिकूल चर्चा काही दिवस पावेतो सुरू होती. याच सुमारास कै.डॉ.भांडारकर, कै.हरी नारायण आपटे, भिंगारकरबुवा, विष्णुबुवा जोग इत्यादिकांचे या पंथासंबंधाचे लेख प्रसिद्ध झाले. मानभावोत्पत्ति प्रथम भाग या मथळ्याखाली १९०७ साली छापलेल्या एका चोपड्यांत हे सर्व लेख प्रसिद्ध झाले आहेत. मानभवपंथ हा कृष्णंभट या नावाच्या एका मातंगकन्येशी व्यभिचार करणाऱ्या ब्राह्मणाने स्थापिला अशा प्रकारचा अस्तित्त्वात असलेला पुरातन प्रवाद चुकीचा आहे हे सिद्ध करण्याकरता वरील चोपडे प्रसिद्ध करण्यांत आलेले दिसते. या नंतर या पंथाची उत्पत्ती व मते या विषयींची चर्चा करण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रात गुप्त झाली, ती फिरून १९१९ साली जागृत झाली. या सालचे सुमारास कै.पुरातत्त्वभूषण विश्वनाथपंत राजवाडे यांनी मानभावाचे बरेच धार्मिक ग्रंथ हुडकून काढून त्या ग्रंथाच्या निरनिराळ्या सांकेतिक लिपीचा शोध लावून या पंथाची उत्पत्ती पंथाचे अद्यसंस्थापक व पंथाची तत्त्वे याविषयी बरेच लेख लिहून प्रसिद्ध केले. कै. राजवाड्यांच्या प्रमाणेच कै. गोविंद काशिनाथ चांदोरकर यांनी ही मानभाव पंथाच्या वाङ्‌मयाचा उत्तम प्रकारे अभ्यास करून मानभावपंथाविषयी अनेक लेख लिहून प्रसिद्ध केले.*

यानंतर अलीकडे कै.विनायकराव भावे आणि यवतमाळचे श्री.यशवंत खुशाल देशपांडे यांनी ही मानभाव पंथाविषयी अनेक लेख छापून प्रसिद्ध केले आहेत. महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेल्या मानभव पंथाविषयीच्या वरील लेखांचे परीक्षण केले असता मानभावपंथाच्या उत्पत्तीच्या कालाविषयी त्याचप्रमाणे या पंथाच्या आद्य

टीप : भारत इतिहास संशोधक मंडळाची वार्षिक इतिवृत्ते संमेलनवृत्ते त्याचप्रमाणे इतिहास आणि ऐतिहासिक मासिक या ग्रंथात हे लेख प्रसिद्ध झाले असून ते जिज्ञासू वाचकास पहावयास मिळतील.

संस्थापकांविषयी दोन निरनिराळी मते प्रतिपादन करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येते. चांदोरकर यांच्या या पंथाविषयींच्या प्रतिपादनाचा माथितार्थ असा आहे की, मानभावपंथाची स्थापना कृष्णंभट या नावांच्या मातंगकन्येशी रत होणाऱ्या ब्राह्मणाने केली व या पंथास पूज्य असलेले. चक्रधारादि पंचकृष्ण कृष्णंभटाचे मुलगे असून ज्ञानेश्वरांचे पश्चात् ५० वर्षांनी या पंथाची महाराष्ट्रात स्थापना झाली. चांदोरकरांनी, हे मत बनविताना मानभावपंथ आद्यप्रवर्तक चक्रधराच्या 'लीलांसवाद' नामक चरित्र ग्रंथात चक्रधर हा देवगिरीच्या कृष्ण, रामदेव, महादेव इत्यादी राजपुरुषांचा समकालीन होता असे विषयीचे उल्लेख मागाहून घुसडून दिले असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. कै. भावे व श्री.देशपांडे यांचे या पंथाच्या आद्यप्रवर्तकाविषयीचे व त्याच्या कालाविषयीचे मत निराळ्या प्रकारचे आहे. या पंथाचा आद्यप्रवर्तक कृष्णंभट नसून गुजराथेतील भडोचचा राजा हरपालदेव ज्यास पुढे चक्रधर ही संज्ञा प्राप्त झाली हा होता. तो देवगिरीच्या राजघराण्यातील सिंघण, कृष्ण, महादेव आणि रामदेव यांच्या कारकिर्दीत हयात असून त्यानें मानभावपंथ स्थापन करून त्याचा प्रसार केला, असे भावे यांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मानभावीपंथाचे पुरातन ग्रंथ जे अलीकडे उपलब्ध झाले आहेत त्यांत दिलेल्या शकावरून चक्रधराचा काल भाव्यांनी निश्चित केला आहे. चांदोरकरांनी भागवतपंथ ज्ञानेश्वरांचे पश्चात स्थापन करण्यांत आला असे विषयीची जी कारणे दिली आहेत ती सप्रमाण खोडून काढण्याचा रा. भावे यांनी काहींच प्रयत्न केलेला नाही. मानभावपंथाच्या उत्पत्ती कालाविषयी राजवाडे यांनी स्वतःचे निश्चित असे मत कोठेच प्रदर्शित केले नाही. खुद्द मानभावपंथाच्या प्रस्तुत काळच्या महंताचे असे म्हणणे आहे की, कृष्णंभटाने स्थापिलेला मातंगपट्ट ऊर्फ भटोमार्ग हा चक्रधराने स्थापिलेल्या मानभाव पंथाहून निराळा असून त्या पंथाच्या मानभाव पंथाशी काही एक संबंध नाही. वर दर्शविलेल्या वादग्रस्त मुद्यासंबंधी अनिश्चितपणा या स्वरूपाचा असल्याकारणाने तूर्त वरील मुद्याविषयी निश्चित स्वरूपाचे कोणतेच विधान स्वीकारता येणे दुरापास्त आहे. वारकरी सांप्रदाय उदयास येण्यापूर्वीच्या काळात महाराष्ट्रीय समाजात कोणते नवीन धार्मिक पंथ उदयास आले होते याचा विचार आम्हास कर्तव्य असल्याकारणाने सत्यासत्यतेच्या दृष्टीने वरील वादग्रस्त मुद्याचा कसाही निकाल लागला तरी त्याचे योगाने आमचे चर्चेस बाध येण्याचा संभव नाही. तेव्हा मानपंथ व मातंगपट्ट हे दोन स्वतंत्र सांप्रदाय होते असे गृहीत धरून या दोन्ही पंथांच्या

तत्त्वांचे व त्यांच्या योगाने महाराष्ट्रीय जनतेच्या मनोरचनेवर झालेल्या परिणामांचे परीक्षण करू. मानभाव पंथाचा आद्यप्रवर्तक राजा जो हरपाळ त्याची आयुर्मर्यादा फार दीर्घ म्हणजे ११९ वर्षांची होती. हरपालदेव ऊर्फ चक्रधराची पूर्व वयापैकी बरीच वर्षे राज्योपभोगात गेली. त्यास जुगाराचा फार नाद असे व त्याचे पायी त्याने बरीच संपत्ती गमाविली. त्याच्या स्वतःच्या जवळचे द्रव्य जुगारात खपल्यावर त्याने त्याची बायको कमलादेवी हिचे जवळील सर्व द्रव्य घेऊन त्याचा जुगारापायी फन्ना उडविला. अखेर कमलादेवीचे अंगावरील दागिने घेण्याचा हरपालदेवाने हट्ट धरल्यामुळे त्याचे व त्याच्या बायकोचे भांडण झाले. या भांडणाची मिटवामिटव झाल्यावर हरपाल देवाची वृत्ती उदास होऊन त्याने तीर्थाटनास जाण्याचा हट्ट धरिला. त्याच्या आईबापानी मोठ्या नाखुषीने त्याजला तसे करण्याची अनुमती दिल्यावर तो तीर्थाटनास निघाला. फिरता फिरता तो वऱ्हाडातील ऋद्धपूर येथे गेला. ते त्याची व त्याचे गुरू गोविंद प्रभू यांची गाठ पडली व त्यांनी त्यास उपदेश देऊन त्याचे नाव चक्रधर असे ठेविले. पुढे काही दिवसांनंतर चक्रधारानें औरंगल येथील ब्राह्मणाच्या मुलीशी विवाह करून तो संसार करू लागला. काही वर्षे संसार घालविल्यावर तो फिरून वैराग्याचे लाटेंत सांपडून संसाराचा त्याग करून फिरून त्याने तीर्थाटनास सुरुवात केली. फिरता फिरता तो इलिचपूर येथे आला व त्या ठिकाणी त्याची रामदेवराव दरणा या नावाच्या एका संस्थानिकाशी गाठ पडली. त्याचे आग्रहावरून चक्रधर हा त्याचे नगरीस गेला व त्याचे रूपवती कन्येशी रामदेवाच्या आग्रहावरून त्याने लग्न केले व तो फिरून संसारी बनला. याप्रमाणे काही वर्षे संसारोपभोगांत चक्रधराने घालविण्यावर तो फिरून वैराग्याचे लाटेत सापडला. याच सुमारास त्याच्या मृत्यूची खोटी वार्ता कानी पडून त्याची बायको मृत्यू पावली, यामुळे चक्रधरास वेड लागून तो धोंडे मारीत भटकू लागला. अशा स्थितीत चक्रधरास दत्तात्रयाचे दर्शन घडून त्यानें शके ११८५ मध्ये संन्यास घेतला. यानंतर एका नवीन पंथाची स्थापना करून त्या पंथाच्या तत्त्वांच्या प्रसारार्थ तो विंद्याद्रीपासून दक्षिण दिसेशी। कृष्णा नदीपासून उत्तरेशी । झाडीमंडळापासून पश्चिमेसी । कोकणपर्यंत । याप्रमाणे (ऋद्धपूरमहात्म या ग्रंथांत दर्शविलेल्या) विस्तृत प्रदेशांत संचार करू लागला. या उल्लेखावरून च्रकधराने स्थापिलेल्या नूतन पंथाची तत्त्वें त्या काळच्या सर्व महाराष्ट्र जनतेच्या कानावर आदळली जाऊन लोकांचे मनात खळबळ उडून गेली असली पाहिजे. चक्रधराच्या स्थूल चरित्रकथनानंतर त्यानें स्थापिलेल्या पंथाच्या तत्त्वांचे

थोडक्यात आम्ही दिग्दर्शन करितो. त्या पूर्वी त्या काळचा महाराष्ट्रीय समाजाचा जो श्रुतिस्मृतीप्रणीत धर्म त्यांतील कोणती तत्त्वे चक्रधरास अमान्य होती हे प्रथम नमूद करतो. श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मांतील खालील बाबी मानभावास असामान्य आहेत. १ वेद व षड्दर्शने, २. वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था (वर्णधर्म व आश्रमधर्म यात श्राद्धादि कर्मांचा अंतर्भाव होतो.) ३. ब्राह्मण वर्णाखेरीज इतर वर्णाच्या लोकांस संन्यास आश्रम व तदनुषंगिक भिक्षावृत्ती स्वीकारण्यास प्रतिबंध ४. अनेक देवतांची उपासना. ५. कुलधर्म व कुलाचार.

ज्या वरील बाबी श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माच्या जीव की प्राण समजण्यांत येतात त्या चक्रधरास अमान्य होत्या. मानभाव पंथाच्या तत्त्वांच्या अकरणात्मक भागाचे हे वर्णन झाले. परंतु या बरोबरच या पंथाचे करणात्मक वर्णन करणे जरूर आहे. चक्रधरानें महात्म्यांचे ठिकाणी खालील गुण अवश्य असले पाहिजेत असे सांगितले आहे. यावरून या पंथातील उदात्त तत्त्वांची कल्पना वाचकांस होईल, ''महात्मेनी प्रियवक्तेया हो आवे : महात्मे सत्यार्जवा होआवेः। हासताहि लटिके न बोलिजेः आपणें आपसि ज्ञाता विरक्ताचा संगू किजेः तुम्ही माहात्मेकी : तुम्ही चतुर्विध भूत ग्रामा अभयो देआवे की : राग क्रोध मद मत्सर यांचा त्यागू याची नावे संन्यासू की।। अहंतेचे मूळ सकंदी उपडावे नाई कांः येरव्ही अंकरू निगेतीः मग शांतीची रोपे लावावीः तुम्हा मारिता पूजिताः समानु हो आवा कीः मुक्तीची चाडूः तेणे मुंगिअे विसरून चिंतावे कीः समुद्रा पासौनि थिल्लरा पर्यंतूः देवता अभिमानु सारखाचिः परमेश्वरांची आर्ति होआवी : मार्गाची आर्ति हॉआवी : विषयांची निवृत्ती होआवी : देहावरी अनास्था हो आवीः''

मानभावपंथीयांच्या महात्मावर्गाच्या आचारधर्माचे सार वरील उताऱ्यात सर्वोत्कृष्ट रीतीने व्यक्त केले गेले आहे. मानभावपंथीयांनी भिक्षावृत्तीवर आपली उपजीविका भरावी अशी चक्रधराची आज्ञा आहे. परमेश्वरांचे रूपाविषयी अनेक आंधळ्यांनी हत्तीच्या निरनिराळ्या अवयवास स्पर्श करून हत्तीच्या केलेल्या वर्णनाचा दृष्टांत देऊन चक्रधरानें परमेश्वरांचे रूपाविषयी खालील उद्गार काढले आहेत -

''तैसे जेयांसी जे शक्ति प्रकाशली असे तो तिथे शक्तीने : परमेश्वरूः भणे : ज्ञानिया असे तो भणे हे ईश्वराची एकेकी शक्ति होयः परः परमेश्वर नोहे : ऐस शक्ती युक्त तो परमेश्वरू''

मानवी जिवाच्या तरणोपायाशी परमेश्वराचा कितपत संबंध आहे या विषयी चक्रधरांने आपले मत खालीलप्रमाणे दर्शविले आहे -

'सृष्टीमध्ये जेतुके : जीव : करी : तेतुकेनि काइसेन ही न मुंचे अेक वांचौनि : भणऔनि : सृष्टीमध्ये : परमेश्वर : अशेषां : जीवांते : जाणवी : परि : तयांची परमेश्वरो मोहरू नाही : भणऔनि : परमेश्वराते : कव्हणी चि नेनेति जीव : अज्ञाने अन्येथा ज्ञाने : परमेश्वर : दास्य : भणऔनि : जीव : जीवाचे दास्य : आन : जडा पार्थिवाचे दास्य करी : तेणे जीवांसी मोचक नव्हे :''

मानवी जिवाचा आणि परमेश्वराचा संबंध या प्रमाणे दर्शविल्यानंतर मानवी जिवाचा उद्धार कोणत्या प्रकारे व्हावयाचा याचे विवेचन खालील उताऱ्यात दर्शविल्याप्रमाणे चक्रधराने केले आहे.

कर्म भूमीचे देवो देवी, अष्ट देवयोनी। अंतरालीचे गण गंधर्व स्वर्गाचे इंद्रादि देव, कैलास वैकुंठीचे हरिहर, ब्रह्मा क्षीराब्धीची शेषशायी, अष्टभैरव माया ही दैवतें आहेत. परि परमेश्वरू नव्हति, परमेश्वरू रक्षता उद्धरिता एक चक्रधरूचि.

त्याचप्रमाणे दुसरें एके ठिकाणी :

''वेद हे अमोचक चक्रधर मोचक, वेद च्युतिमंत चक्रधर अच्युतपद याप्रमाणे मानवी जिवाचा उद्धार करणारा चक्रधराखेरीज दुसरा कोणी'' असे मानभावीपंथाचे मत आहे. मानभावपंथाच्या तत्त्वांचे स्थूल स्वरूप या प्रकारचे आहे.

आता चक्रधराने स्थापन केलेल्या या मानभावी पंथासंबंधी लक्षात ठेवण्यासारख्या दुसऱ्या एका मुद्याचा ऊहापोह प्रस्तुतस्थळी करणे जरूर आहे. तो मुद्दा म्हणजे मानभावीपंथाच्या धर्मग्रंथाच्या भाषेसंबंधाचा होय. कोणत्याही नवीन पंथाची अगर सांप्रदायाची भरतखंडात स्थापना करण्यांत आली म्हणजे त्या पंथाचे धर्मग्रंथ पूर्व परंपरेस अनुसरून संस्कृत भाषेत लिहावयाचे असा प्रघात पडला होता. चक्रधराने वेदांस जसे बाजूस सारले. त्याचप्रमाणे संस्कृत भाषेसही बाजूस सारून त्याच्या पंथाच्या ग्रंथाची भाषा त्याच्या शिष्यांनी मराठी पसंत करून त्या भाषेत या पंथाचे सर्व ग्रंथ लिहिले आहेत. संस्कृत भाषेत ग्रंथरचना न करता मराठी भाषेत ग्रंथरचना करणे श्रेयस्कर कां याचे कारण या पंथापैकी नागदेवाचार्यांने एके ठिकाणी खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

नको गाः केशव देया येणे माहिये स्वामीचा सामान्यु परिवारू नागवैल कीः परमश्वरे तरी जीवाचे या संकोचिता आन अनेक व्यसना अयोग्यता जाणोनी : आन काठिण्यता चुकवीनी सकलांसी अल्पयासे ब्रह्मविद्याचिये ठायें गिवसंता येवौनि परमेश्वर लाभुण्यामा वावू होआवाः म्हणौनिची महाराष्ट्रीये निरोपिले की गाः एरिव्ही सर्वज्ञा काई देववाणि निरोपू न लाहे की गाः भणौनि केशवः संस्कृत सूत्रबद्ध प्रकरण न करी तू की :

ब्रह्मविद्येचा लाभ सर्वास व्हावा यास्तव मराठी भाषेच्या आश्रय मानभावपंथाच्या अनुयायांनी मुद्दाम केला होता हे वरील उताऱ्यावरून उघड होत आहे. मानभाव पंथानुयायी लोकांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या पंथाच्या स्वरूपाचे वरीलप्रमाणे दर्शन घडविल्यावर मातंगपट्ट अथवा भटोमार्ग ज्यांशी मानभावपंथाचा काही एक संबंध नाही असे प्रस्तुत काळच्या मानभावपंथियांचे म्हणणे आहे त्याचे स्वरूप कशा प्रकारचे होते हे या ठिकाणी आम्ही थोडक्यात मांडतो.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तांत (पान १५०) नभोवोत्पत्ती कथा या मथळ्याखाली एक पुरातन लेख छापला आहे. हा लेख मानभावपंथेतर माणसांने लिहिला असल्याचे त्यातील लेखकाचे नावावरून व तो लेख ज्या परंपरेपैकी आहे त्यावरून दिसून येते. या लेखाच्या भाषेच्या लकबीवरून त्यांत उल्लेखिलेल्या सदानंदाच्या नावावरून हा लेख निदान दोन अडीचशे वर्षांचा जुना असल्याचे दिसून येते. या लेखांत मानभावपंथाच्या उत्पत्तीचा काळ, १२५५ असा दिला आहे. लेख लिहिणाऱ्यास ज्ञात असलेल्या माहितीच्या आधारे त्याने हा शक नमूद केला असला अस्तित्त्वात पाहिजे. या लेखाचा जुनेपणा लक्षात घेता त्याचप्रमाणे लेखाचा कर्ता मानभावेतर आहे हे लक्षांत घेता हा शक मुद्दाम खोटा नमूद केला आहे असे विधान करणे कठीण आहे. या शिवाय या पंथाच्या उपलब्ध झालेल्या पुरातन ग्रंथाच्या मराठी भाषेच्या रूपावरून मुसलमानी सत्तेचा व भाषेचा महाराष्ट्रास संसर्ग घडण्यापूर्वी हा पंथ अस्तित्त्वात आला असला पाहिजे असे अनुमान निघते. ग्रंथमाला मासिक पुस्तकात 'एक जुने मानभावी काव्य' या मथळ्याखाली कै.राजवाड्यांनी एक लेख प्रसिद्ध केला असून त्या काव्याविषयी त्या लेखात त्यांनी थोडीबहुत चर्चाही केली आहे. या लेखांत मानभाव पंथाच्या उत्पत्तीविषयी व या पंथाच्या संस्थापकाच्या कालाविषयी राजवाड्यांनी प्रदर्शित केलेले खालील

विचार लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

राजवाडे म्हणतात : श्रीमत् शंकराचार्यांनी पंचायतन पूजेचा प्रघात पाडून शैव, वैष्णव, शक्त वगैरे एकेक देवतेच्या उपासकांस इतर दैवतोपासकांशी स्पर्धा व द्वेष न करण्याचे शिकविले परंतु आचार्याच्या नंतर कांही शतकांनी केवळ शिवाचीच उपासना करणारा असा बसव ब्राह्मणप्रणीत लिंगायतपंथ निघाला. प्रारंभी या बासवीपंथात जातिभेद बिलकूल नव्हता त्यामुळे ब्राह्मणक्षत्रियेतर जातीतील अनेक लोक या पंथाचे अनुयायी झाले. शिवाय जातीहीन असे जैन, बौद्ध वगैरे लहान मोठे पंथ ब्राह्मणक्षत्रियेतर लोकांत प्रचलित होतेच. लिंगायत, जैन वगैरे पंथांनी महाराष्ट्रातील खालच्या प्रतीचे लोक आकर्षिलेले पाहून कृष्णोपासक व दत्तोपासक अशा कित्येक ब्राह्मणास स्वदैवतोपासनवर्धनार्थ जातीभेद विहीन असा एक नवीनच पंथ काढण्याची आवश्यक्ता भासली तोच हा महानुभाव अथवा मानभावपंथ होय. राजवाड्यांनी मानभावपंथाच्या उत्पत्ती विषयी याप्रमाणे मत दर्शविल्यानंतर या पंथाचे जे दोन प्रमुख आचार्य त्यांचा काळ त्यांच्या खाली दर्शविलेल्याप्रमाणे निश्चित केला आहे.

''काव्यांत चक्रधर व तत्शिष्य नागदेव भट्ट यांचा उल्लेख आहे. नागदेव भट्ट हा महानुभावाचा ब्राह्मण आचार्य शके ११५८ त जन्मला. हा पन्नास किंवा साठ वर्षे वाचला असे धरिले तरी त्यांची एकंदर हयात शके ११५८ पासून १२०८ किंवा १२१८ पर्यंत असावी असे दिसते. नागदेव भट्टाच्या पुतण्याची हयात दर पिढीस तीन वर्षाची धरली तर शके ११८८ पासून १२४८ पर्यंत असावी असे दिसते. अर्थात नागदेवभट्टाचा पुतण्या कवीश्वर शके १२१८ च्या सुमारास ग्रंथलेखनास लागला असावा.'' इत्यादि.

या प्रमाणे नागदेवभट्टाच्या कालाविषयी राजवाड्यांनी आपले मत प्रदर्शित केले आहे. काव्याच्या भाषेविषयी राजवाडे म्हणतात :

''सध्या प्रचलित नसणारे असे सुमारे एक हजार शब्द या काव्यात आहेत. नामे, अव्यये, क्रियापदे यांची रूपे, समासाची पद्धत वगैरे बरेच प्रकार विवेचनीय आहेत व इत्यादी उभयान्वयी अव्यये त्या प्रमाणे चतुर्थीचा ला प्रत्यय या काव्यांत नाही, ऊन प्रत्ययात धातुसाधितांची रूपे या काव्यात बरीच आहेत. एकंदरीत भाषेच्या जुनेपणाचा मासला या काव्यात सडकून सापडतो. मुसलमानाच्या संसर्गाने

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

भाषेवर काही परिणाम होण्यापूर्वीची भाषा या काव्यात दृष्टीस पडते.''

राजवाडे यांनी प्रदर्शित केलेल्या वरील मतावरून 'मानभावोत्पात्तीकथा' या लेखात मानभावपंथाच्या उत्पत्तीचा दिलेला शक बरोबर असला पाहिजे असे मानण्याची प्रवृत्ती होते. मानभाव सांप्रदाय ज्ञानेश्वरपूर्व कालीन का ज्ञानेश्वर उत्तरकालीन आहे या प्रश्नांच्या निश्चितीच्या दृष्टीने या सांप्रदायाच्या आद्य संस्थापकापैकी गुडमाचा काळ ऋधपूर माहात्म्य या नावाच्या शके १५८८ सालांत कृष्णामुनी या मानभावानें लिहिलेल्या ग्रंथातील खालील उल्लेख महत्त्वाचा आहे -

द्राविड देशी जाण । कृष्णशर्मा नामे ब्राह्मण ।
तेथ भविष्य पुराण । वाचिले देखा ।
तेथे निघाले ऐसे । जे कलियुगी परमेश्वर कृपावशे ।
अवतरैल मनुष्य वेशे । वैदर्भ देशी ।
शालिवाहण शके । सहस्त्र वर्षानंतर आइके ।
विश्वावश वत्सरी कैवल्य नायक । तिथे ऋद्धपुरी ।
कणव शाखे जाण । अनंत नायके ब्राह्मणे ।
नेमांबिकेच्या उदरी आपण । अवतरैल कैवल्यापति ।
गुंडिवेष्टण ऐसे धान । हे व्याकर्ण जाणावे ।
वेष्टण म्हणजे निम्रांत । व्यापकत्व तें संस्कृत ।।२७।।

वरील उताऱ्यावरून गुंडम हा ज्ञानेश्वरापूर्वी दीडशे वर्षे म्हणजे शके १०४७ मध्ये अवतरला असे दिसून येते. लिंगायत पंथाचा प्रवर्तक बसव हा कल्याणीच्या कलचुरी राजघराण्यातील विज्ज्वल राजाचा समकालिन होता. विज्जल हा इ.सन ११५७ ते ११६७ चे दरम्यान राज्यावर होता. अर्थात बसवाचा काल हाच असला पाहिजे ही गोष्ट लक्षात घेतली असता मानभावपंथाच्या उत्पत्तिविषयी राजवाड्यांनी वर दर्शविलेल्या विचारांत बराच तथ्यांश आहे असे दिसते. आता 'मानभावोत्पतिकथा' लेखातील मातंगभट्ट अथवा भटोमार्ग या पंथाच्या तत्त्वांचे जे प्रतिपादन करण्यात आले आहे त्यांचा वाचकांशी आम्ही थोडाबहुत परिचय करून देतो. या लेखात मानभावपंथीयांस श्रुतिस्मृतिशास्त्रदृष्ट्या कटू वाटण्यासारखी एकच बाब आहे. ती म्हणजे कृष्णंभट्टाचा मातंग कुमारींशी झालेला संबंध व त्यापासून झालेले पाच मुलगे म्हणजेच मानभावीपंथाचे पंचकृष्ण ही होय. ही बाब वगळली

असता भटोमार्ग अथवा मातंगभट्ट या पंथाची तत्त्वे हुबेहूब मानभावी पंथाच्या तत्त्वासारखी असून मानभावपंथनुयायांस पूज्य व वंदनीय जे पंचकृष्ण तेच कृष्णंभट्टच्या भटोमार्ग यास पुज्य व वंदनीय असल्याचे दिसून येते. चक्रधर, नागदेव, भट्ट इत्यादि मानभावपंथाच्या आद्यसंस्थापकाचे हयातीचे जे काळ राजवाडे व भावे यांनी दिले आहेत ते बरोबर धरले व मानभावोत्पत्ति प्रकरणात मानभावपंथाच्या उत्पत्तीचा जो काळ दिला आहे तो बरोबर धरला तर मातंगपंथाचा उत्पादक कृष्णंभट हा चक्रधारानंतर बरेच वर्षे मागाहून झाला असे दिसते. कृष्णभंट ज्या काळी झाला त्या काळात श्रुतिस्मृतिप्रणीत आचारधर्माचे विधिनिषेध रूपी नियम कडकडीत रीतीने पालन करण्यात येत असत. मनस्मृतीच्या अकराव्या अध्यायाच्या १७५ व्या श्लोकांत चांडाल व अंत्यज स्त्रियांशी अज्ञानतः गमन करणारा, त्यांचे अन्न खाणारा व त्यांच्यापासून प्रतिगृह घेणारा ब्राह्मण पतित होतो व हे प्रकार ज्ञानतः करणारा तो त्यांच्या जातीचा होतो असे नमूद केले आहे. चांडाळ, श्वपद (कुत्र्याचे मांस शिवजून खाणारे) क्षता, सूत, वैदेहिक, मागध व अयोग व सात अत्यंज होत. यांच्यापासून झालेल्या कन्या अंत्यजा होत. अशा प्रकारच्या स्त्रीशी ज्ञानतः गमन करणारास वरील प्रकारचे प्रायश्चित मनूने सांगितले असल्याकरणाने कृष्णंभटास त्या काळच्या पैठण क्षेत्रीच्या ब्राह्मणांनी ज्ञाती वेगळा व तो मांग ज्ञातींत समाविष्ट झाला. ब्राह्मणज्ञातीस लागू असलेल्या ज्या श्रुति स्मृती प्रणीत आचार धर्मान्वये कृष्णभटावर हा प्रसंग आला त्या धर्माविषयी त्यांचे मनात द्वेष उत्पन्न होऊन जातीविहीन अशा मानभावपथांत तो सामील झाला व त्याने मातंगपट्ट ऊर्फ भटोमार्ग या नावांचा मानभावपंथाचा एक पोटसांप्रदाय स्थापन केला असे या दोन्ही पंथाविषयी जी माहिती आजपावेतो प्रसिद्ध झाली आहे ती वरून अनुमान निघते, या पंथाच्या तत्त्वाचे प्रसाराचा महाराष्ट्रीय जनतेवर कोणत्या प्रकारचा परिणाम झाला याचे आम्ही थोडक्यात वर्णन करितो. मानभावोत्पत्ति कथा प्रकरणांतील या पंथाची तत्त्वे व श्रुतिस्मृति प्रणीत धर्माची तत्त्वे यांच्यात कोणत्या प्रकारचा विरोध आहे हे दर्शविणारा काही भाग आम्ही खाली देतोः-

येर ते अवघे ब्राह्मणासी नींदति ।  
मग कृष्णभट्टे भट्टमार्ग थापिला।  
हा भट्टमार्गु तेथुनि म्हणति ।  
वासुदेव वासना माया केली । वासना गोत्र ।

वासना शास्त्र प्रवीण केले ।
क्रियाधर्माचे नाव व्याजन ऐसे नाव ठेविले ।
मोक्षा सकळवर्णा मागा आदरललिनी ये झोळीचे नाव फुलरी ठेविले ।

येका क्षराचि लिप उफराटी केली लगोत म्हणति पुढे त्या कृष्णभट्टे विवादस्थल मांडिले त्या नागभट्टास विवादु माडिला होये ते न होते होय ऐसे म्हणो दड करी कवना न मानी वेदशास्त्र लटके म्हणो ब्राह्मणाची चेष्टा करी. षडदर्शनाची चेष्टा करी आपण थोर जे मांगवाडा देवपूजा थोर म्हणो ऐसे कृष्णभट्टाचे बोलणे येकून साकळीक विद्वांस व ब्राह्मण व सन्यासी व जोसी, जंगम सकळ दर्शन बैसोनि विवाद माडीला कृष्णभट्टांसी खंडीले.

शिष्याचि कुलदेवता, कुलधर्म सांडविती पितृश्राद्ध न करू देति । आपना गजविति । पंचपुत्र ते पंच कृष्णनाम उच्चारिति । मोक्षु उधारे बोलि(ति) ऐसे शिष्यांस उपदेशिति । मातांग वाडा (चि) पुजा वटकथा (?) ब्रह्मणा आधिकारू नाहि ऐसे शिष्य उपदे (शिति) अडरा पगडे यातिसी भीक्षासी उपदे (शिति) अठराहि जातीचि भीक्षा मागति षट्कर्मि ब्राह्मण अधिकारु नाहि ऐसे बोलति। षट्दर्शनाची निंदा करिति । सकळ सकाम निःकाम स्छापिति कर्म स्छापि (ति) सधर्म अनादिसी धरुणीया न मानिति । अनादि धरुणीचि करीति.

देवता साधन आपन करीति शिष्याचे बोलो नेदेति । जे देवता साधन मानति आपन देवताची अनक्रम करिति ये। तितुके कुड्यत म्हणती नामनिति पंचकृष्ण स्छापिति भक्तिभावो आचरित संपादिति शिष्याचे स्त्रियेशी प्रबोधिति पतिधर्मु साडविति कनिष्ठैकागनी मार्गु उपदेशिति । आपन तयासिंभग दरुशन घेति ।

भटोमार्गाच्या तत्त्वांचे स्वरूप वरील उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे. महाराष्ट्रीय समाजातील कोणते लोक या पंथाचे अनुयायी बनले या संबंधाचे वरील लेखांतील काही महत्त्वाचे उल्लेख आम्ही खाली देतो.

मठी बांधली त्याचे नाव डोंबतीर्थ ठेविले । तेथे शूद्र अनामिक शिष्य केले. पापे पीडिले कृष्णा आणि दत्ता हे दोघे मातापुरी राहिले । तिही कितीक शिष्य शूद्र अनामिक आणि खणदेशी । तिसरा चागा पुत्र रनाखटक संगमी तेथे तो आपण चांगदेव म्हणवी तेथे त्यांने शिष्य शुद्र, अनामिक केले शिष्य तेथे परसातो प्रतिष्ठनि

पंचाळेश्वरी राहिला परसातो प्रभु चक्रधर आपणाते म्हणवी त्यांने शिष्य अनामिक शूद्र शिष्य केले।

कृष्ण भट्टे मार्ग स्थापिला म्हणवु (नी) भट्टमार्गु हा म्हणती हा पाखांड मार्ग जाला.

वरील उताऱ्यावरून त्याकाळी महाराष्ट्रीय समाजाच्या खालील थरात या पंथाने कोणत्या प्रकारची खळबळ उडून गेली होती व श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माच्या कक्षेतून शूद्र व अतिशूद्र जातीचे शेकडो लोक कसे फुटून बाहेर पडत होते ते स्पष्ट होत आहे. कृष्णंभट्टाने स्थापिलेल्या भटोमार्गाचे अनुयायी महाराष्ट्रीय समाजापैकी शूद्र व अतिशूद्र लोकांपैकी ज्या प्रमाणे झाले त्याच प्रमाणे मानभावपंथाचे अनुयायी या समाजापैकी कोणर्तीया वर्णाचे लोक झाले ते सांगणे जरूर आहे. चक्रधराने मानभावपंथाची स्थापना केल्यानंतर त्याचे शिष्यत्व पत्करलेल्या लोकांपैकी जवळजवळ सर्वच ब्राह्मण होते असे भावे व देशपांडे यांच्या लेखांतील मानभावी वाङ्मय निर्माण करणाऱ्या शिष्यांच्या दिलेल्या हकीगतीवरून दिसून येते. चक्रधराने स्थापिलेल्या पंथाचा जसजसा प्रसार होत गेला तसतसे महाराष्ट्रीय समाजापैकी सर्व वर्णाचे लोक या पंथात समील होऊ लागले. चक्रधराच्या चरित्रवर्णनपर लीलाचरित्र नावाच्या ग्रंथातील देवगिरीच्या यादव राजघराण्यापैकी राजपुरुषांविषयीचे त्या ग्रंथांत आलेले उल्लेख प्रक्षिप्त नसून खरे आहेत असे मानिले तर या पंथाने राजसत्ताधिकारी क्षत्रिय वर्णांतील प्रमुख लोकांना आकर्षित करून घेतले होते व ते चक्रधराचे भजनी लागले होते असे ते दिसते. मानभवपंथ व कृष्णंभट्टाने स्थापन केलेला भटोमार्ग हे एकच असून शक्तिपंथाच्या काही आचारांचा अंतर्भाव करण्यात आलेली ही बौद्ध धर्माची ज्ञानेश्वर पश्चातकालीन पुनरावृत्ति आहे अशा प्रकारचा सिद्धांत चांदोरकर यांनी प्रस्थापित केलेला असून त्यांत बरेंच तथ्य असल्याचे आतापावेतो केलेल्या विवेचनावरून उघड होत आहे.

श्रीमत् आद्यशंकराचार्यांनी श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची संस्थापना करून मोक्षप्राप्तीचे मार्गाचे बाबतीत जो कडकडीत निर्बंध रूढ केला (ज्या विषयी साग्र व तपशीलवार विवेचन आम्ही पुढे करणार आहोत) त्याचे योगाने महाराष्ट्राच्या धर्मकारणात निर्माण झालेल्या प्रतिक्रियेच्या योगाने चक्रधराचा मानभावपंथ त्याचप्रमाणे कृष्णभटाचा भटोमार्ग अस्तित्त्वात आला असे त्या काळच्या महाराष्ट्राच्या

धार्मिक परिस्थितीचे निरीक्षण करणाराचे लक्षांत आल्यावाचून राहणार नाही.

एय पावेतो केलेल्या विवेचनावरून श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माच्या अभिमान्यास व हितचिंतकास वरील दोन पंथाच्या योगाने त्या धर्मावर आलेल्या संकटाचा प्रतिकार कशा रितीने करावयाचा या महत्त्वाच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रसंग त्या काळी आला असला पाहिजे असे दिसते भागवतधर्म ऊर्फ वारकरी सांप्रदायाचे संस्थापक जे ज्ञानेश्वर यांच्या अवतारापूर्वी महाराष्ट्रीय समाजाची धर्माकारणविषयक वर दर्शविलेली परिस्थिती लक्षात घेतल्याखेरीज वारकरी सांप्रदायाची उत्पत्ति व त्याची ध्येये यांची सत्य कल्पना करणार येणार नाही. हे नमूद करून त्या काळच्या महाराष्ट्राच्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या भागात शके ११०० ते १२०० चे दरम्यानचे काळांत धर्मकारणदृष्ट्या कोणत्या प्रकारच्या उलाढाली चालल्या होत्या याचे दिग्दर्शन करितो. महाराष्ट्र देशाचा त्या काळचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे कलचुरी राजघराण्याचे ताब्यातील प्रांत हा होय. त्या काळी देवगिरीच्या यादव घराण्याच्या योगाने गोदातटाकाच्या उत्तर बाजूस जसे महत्त्व प्राप्त झाले होते, त्याच प्रमाणें गोदा तटाकाच्या दक्षिण भागास कलचुरी घराण्याच्या योगाने महत्त्व प्राप्त झाले होते. कलचुरी घराण्याची राजधानी कल्याणी (हैदराबाद राज्य) नागरी ही होती. गोदावरीच्या उत्तर तटाकाचे प्रदेशांत चक्रधराने श्रुतिस्मृतिघर्माविरुद्ध ज्याप्रमाणे बंड उभारले त्याप्रमाणे गोदातटाकाच्या दक्षिण भागाचे प्रदेशांत श्रुतिस्मृतिधर्माविरुद्ध बंड उभारणारा बसन या नावांचा एक ब्राह्मण उदयास आला. बसव सांप्रदायाच्या ध्येयाची बरोबर कल्पना येण्याकरिता त्याच्या चरित्राची स्थूल रूपरेषा आम्ही इथे देतो.

मदिराज या नावाच्या आराध्य ब्राह्मणाच्या पोटी जन्मास आलेला बसव हा लिंगायत पंथाचा संस्थापक समजण्यांत येतो. तथापि बसवापूर्वी लिंगायत धर्मांत अंतर्भूत होणारी तत्त्वे प्रतिपादन करणारे आचार्य उदयास आले होते. बसवप्रणीत धर्माच्या उत्पत्तिविषयीची कथा पुराणांतरी खालीलप्रमाणे आढळते. नारदऋषि शिवाकडे गेले व पृथ्वीतलावर विष्णूची पूजा करणारे, यज्ञाची उपासना करणारे, जैन, बौद्ध, वगैरे अनेक देवतांचे भक्त आहेत परंतु आपली भक्ती करणारा कोणी नाही असे त्यांनी शिवास सांगितले. त्यावर शंकरांनी त्यांच्या भक्तीचा प्रसार करण्याकरिता व वीरशैवाच्या तत्त्वांना उत्तेजन देण्याकरिता पृथ्वीवर अवतार घेण्याची

नंदीस आज्ञा केली. या शंकराच्या आज्ञेस अनुसरून नंदीने जो अवतार घेतला तोच बसव होय अशी लिंगायतपंथी लोकांची समजून आहे. बसव मोठा झाल्यावर त्याचा उपनयन विधी करण्याचे त्याच्या आईबापांनी ठरविले. परंतु उपनयनविधीत गायत्री मंत्राचा उपदेश ग्रहण केल्याने त्यांचे दैवत शिव त्याचा द्रोह करण्यासारखे होईल असे त्यास वाटल्यामुळे उपनयनविधी करण्यात तो तयार नव्हता. तथापि त्याचे आईबापांनी त्याचा उपनयन विधी करण्याचा हट्ट सोडला नाही. उपनयन विधीचा समारंभ सुरू असता असता बसवाने तेथून पलायन केले. त्याचे बरोबर त्याची बहीण नागाम्माही पळून गेली. कल्याणी एथे बसवाचा मामा बलदेव हा तेथील राजाचा मंत्री होता. त्यावेकडे ही दोन्ही बहीण भावंडे पळून गेल्यावर त्याने त्या दोघांस ठेवून घेतले व त्यानें आपले मुलीचे बसवाशी लग्न लावून देऊन त्याला विज्वल राजाचे पदरी नोकरी लावून दिली. बसवाची बहीण नागाम्मा हिचा संबंध तेथील राजाशी जुळून आला व त्याचे योगाने बसवाला सेनापती आणि मुख्य सचिवपद प्राप्त झाले. बसवाच्या हाती या पदामुळे सत्ता आल्यानंतर त्यांने लिंगायत धर्मानुयायी लोकांस हरएक प्रकारे उत्तेजन देण्यास सुरुवात केली. बसवाच्या चरित्राविषयीची स्थूल कल्पना करून दिल्यानंतर या पंथाच्या तत्वांचा आम्ही थोडक्यात परिचय करून देतो. लिंगायत पंथाचे तत्त्वज्ञान विशिष्टाद्वैती पंथाचे असुन विशिष्ट प्रकारच्या नैतिक व आत्मिक आचरणाने शिवभक्ती केल्यास शिवाशी सामजस्य साध्य होते हे लिंगायत पंथाचे मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वानुसार शिवाखेरीज दुसऱ्या कोणत्याही देवतेची भक्ती अगर उपासना लिंगायत धर्मानुयायी लोकांस वर्ज्य आहे. श्रुतिस्मृतिप्रणीत वर्णव्यवस्था त्याचप्रमाणे वर्णधर्म व आश्रमधर्म व्यवस्था बसवास मान्य नसून लिंगायत पंथांत वाटेल त्या वर्णाच्या व जातीच्या व्यक्तीस समाविष्ट केले जाते. बसवाचे ब्राह्मणवर्णाप्रमाणेंच महार, चांभार इत्यादी अंत्यज जातीपैकी कित्येक शिष्य होते. मद्य व मांस सेवन ही लिंगायत धर्मानुयायी लोकांना वर्ज्य आहेत. स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची मुभा आहे. हिंदूजातींच्या लोकांप्रमाणे विटाळशीचा विटाळ लिंगायत धर्मानुयायी लोक मानीत नाहीत. लिंगायत पंथाच्या आचाराचे स्थूल स्वरूप या प्रकारचे आहे. श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मान्वये आचरण करण्याच्या त्या काळच्या सर्वसाधारण महाराष्ट्रीय जनतेच्या प्रवृत्तीशी विरोध करणारी बसवाची मते असल्याकारणाने ती त्या काळच्या बहुजनसमाजास मान्य नव्हती. एवढेच नाही परंतु या त्याच्या मतांचे योगानें सामान्य

जनतेंत त्याचा द्रोह करणारे बरचे लोक होते. एकदा बसवाच्या एका चांभार शिष्याच्या मुलीशी त्याच्या ब्राह्मण शिष्याच्या मुलाचे लग्न ठरविण्यात आले. ही गोष्ट जाहीर होताच समाजात जिकडे तिकडे खळबळ उडून जाऊन ते लग्न मोडण्याविषयी बसवाचे मन वळविण्याचा बराच प्रत्यन करण्यात आला. परंतु तो प्रयत्न फुकट जाऊन बसवाने आपला हट्ट सोडण्याचे नाकारले. तेव्हा विज्जलराजाने बसवास कैद करून अटकेत ठेवण्याचा विचार केला. ही गोष्ट कानी पडताच बसवाने कल्याणीहून पळ काढला. तेव्हा विज्जलाने स्वतःच्या सैन्यासह त्याचा पाठलाग करून त्याच्या बरोबर युद्ध केले. या युद्धात विज्जलाचा पराभव होऊन बसवाची पूर्वीच्या अधिकारावर नेमणूक करणे विज्जलास भाग पडले. यानंतर बसवाने विज्जलास विषप्रयोग करून ठार मारिले व त्यांचे राज्य हस्तगत केले. श्रुतिस्मृतिप्रणीतधर्म व लिंगायतपंथ यांच्यामधील संघर्षाची तीव्रता या हकीकतीवरून स्पष्ट होते. लिंगायतपंथाच्या तत्त्वज्ञानाचे सूक्ष्म विवेचन करण्याचे येथे प्रयोजन नाही. या पंथासंबंधी कै.डॉ.वर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी दर्शविलेले मत ज्या मुद्याची आम्ही चर्चा करीत आहोत, त्या मुद्याचे दृष्टीने महत्त्वाचे असल्याकारणाने तें आम्ही येथे नमूद करितो -

There is a traditional leagend among the lingyate that when Shiva brought Brahmadeo into existance he told him to Create the world. But Brahgmadeo said that he did not know how to do it. therefore Shiva created it himself in order that it might serve him as a model. And the Acharyas and Panchamas as detailed above with thire Gotras & Shakhas are that creation of Shiva. The true import of this legend is that the Lingayats set up a system for themselves as a rival to the Brahmanic system and the close resemblance between the two confirems this view. But a more copy was not their object, and they introduced several reforms espeically in the condition of woman as will have been seen from the above notice.

The impresion that this whole account creates in one is that Lingayatiem owes its orition to a spirt of jealousy of the power exercised by Brahmanism and of rivalry with the system. Such a spirt of jealousy and rivalry cannot be expected to have arisen in thoroghly depressed minds. The system therefore must have come into existence among the sprited members of the upper classes of non-Bramhmanic Hindus under the leadership of a body of men composed of Brahmanas known by the name of Aradhyas. It will thus be seen that all the Lingyats have not sprung up from the Sudra caste, but there is a mixture of the three highter orders among them. The claim that the two main classes of the sect put forward of their being Lingi Brahmanas i.e. Brahmanas wearing Ling seems to be founded on truth. The Acharya or Jangam class is said to have sprung from the five holy persons adored on the occassion of a religious ceremony, whose names end in the suffix Aradhya signficative of their being Brahmanas. We might therefore sefely take them to be of Brahmanic decent. As to the Panchmas they probably represent the Vaishya order of the Brahmanic sytem which followed the occupation of traders and cultivators and as the Vaishyas belong to the class of twice born, so also do the Panchamas and hence they are included in the Linga Brahmin gruop.'

Vaishnavism, Shaivim and minor religious system by Dr. Bhandarkar page 139-140.

**भाषांत्तर**

लिंगायत धर्मानुयायी लोकांमध्ये अशी एक दंतकथा आहे की शिवाने

ब्रह्मदेवतास निर्माण केल्यानंतर त्यास सृष्टी निर्माण करण्याविषयी सांगितले. परंतु सृष्टी कशी निर्माण करवी हे मला माहीत नाही असे ब्रह्मदेव शंकरास म्हणाला. तेव्हा शिवानें ब्रह्मदेवाला शिकविण्याकरिता स्वतः सृष्टी निर्माण करून दाखविली. शिवाने निर्माण केलेल्या या सृष्टीपैकी आचार्य व पंचम आणि त्यांच्या शाखा व गोत्रेही आहेत. या दंतकथेचा खरा अर्थ लिंगायतांनी ब्राह्मणांशी स्पर्धा करणारा असा एक नूतन सांप्रदाय निर्माण केला असा आहे. ब्राह्मणवर्ण आणि लिंगायत धर्मानुयायी लोक यांच्यातील साम्यावरून ही दंतकथा सत्य असल्याचे ठरते. परंतु निव्वळ ब्राह्मणाची नक्कल करण्याचे लिंगायताचे ध्येय नव्हते. त्यांनी आपल्या पंथात बऱ्याच नव्या सुधारणा विशेषकरून स्त्रियांच्या बाबतीत रूढ केल्या. ब्राह्मण जातीच्या अधिकाराविषयी मत्सर व त्यांच्याशी स्पर्धा करण्याची लालसा यापासून लिंगायत धर्माचा उदय झाला असल्याचे या पंथाच्या परीक्षणावरून मत होते. वर दर्शविलेली ब्राह्मणांविषयी मत्सरबुद्धी व त्यांच्याशी स्पर्धा करण्याची लालसा अत्यंत कनिष्ठ वर्णांचे लोकांच्या मनात उत्पन्न होणे शक्य नाही. आराध्य जातीच्या ब्राह्मणाच्या नेतृत्वाखाली सब्राह्मण वर्णापैकी ब्राह्मण वर्णाशी वाकून वागणाऱ्या श्रेष्ठ वर्णाच्या लोकांत हा पंथ उदयास आला असला पाहिजे. यावरून हे उघड होत आहे की लिंगायत धर्मानुयायी सर्व लोक शुद्रवर्णापैकी नसून त्यांच्यात ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या श्रेष्ठ वर्णापैकी बरेच लोकांचे मिश्रण आहे. लिंगायत पंथापैकी दोन प्रमुख वर्गाच्या लोकांचे ते लिंगीब्राह्मण म्हणजे लिंगधारण करणारे ब्राह्मण आहेत असे जे म्हणणे आहे ते सत्यावर आधारलेले आहे असे दिसते. ज्यांच्या नावाचे शेवटी ब्राह्मणत्व द्योतक आरोग्य उपपद लावण्यात येते अशा पांच पवित्र पुरुषांपासून आचार्य व जंगमवर्ग निर्माण झाला आहे. यावरून आचार्य व जंगमवर्ग हा ब्राह्मणवर्णापासून निर्माण झाला आहे असे अनुमान बिनधोक काढण्यास हरकत नाही. व्यापार आणि शेतीचा धंदा करणाऱ्या वैश्य वर्गापासून पंचमवर्ग निर्माण झाला असून वैश्य हे द्विज असल्याकारणाने त्यांचाही लिंगी ब्राह्मणांत समावेश झाला असला पाहिजे.

याप्रमाणे लिंगायत पंथाच्या उपपत्तीची सत्य मीमांसा भांडारकरांनी वरील उताऱ्यांत केली आहे. ब्राह्मणादि श्रेष्ठवर्णाचे लोकांपैकी कित्येकांनी लिंगायत पंथ त्या काळी जरी स्वीकारल्याचें दिसते तथापि या पंथाचा प्रसार मुख्यत्वेकरून त्याकाळी शुद्रवर्णाचे लोकांतच मोक्षप्राप्तीचे अधिकाराचे बाबतीत आद्यशंकराचार्यांनी

अस्तित्त्वात आणलेल्या कडक निर्बंधामुळे झाला असला पाहिजे हे उघड आहे. आतापावेतो केलेल्या विवेचनावरून वारकरी सांप्रदाय महाराष्ट्रात उदयास येण्यापूर्वी मानभाव व लिंगायत या पंथाच्या अनुयायाकडून श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माचा पाडाव करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सिद्ध होत आहे. श्रेष्ठ संस्कृतीचे ब्राह्मणक्षत्रियादी आर्य लोक व कनिष्ठ संस्कृतीचे शूद्रादि लोक यांच्या निकट वास्तव्यामुळे अस्तित्त्वात आलेल्या समाजातील भिन्नसंस्कृतीच्या लोकांच्या ध्येयाच्या आघात-प्रत्याघातामुळे वरील प्रकारचे नूतन सांप्रदाय उगम पावले असले पाहिजेत असे वरील विवेचन वाचणाऱ्या कोणत्याही विचारी माणसाच्या ध्यानात आल्यावाचून राहणार नाही. गौतमबुद्धाचे काळापासून आजतागायत भरतखंडातील समाजात श्रुतिस्मृत्युक्तवर्णाश्रमर्माविरुद्ध बंड उभारणारे नूतन सांप्रदाय अस्तित्त्वात येणे, त्यांचे योगाने तो धर्म रसातळास जातो की काय असा काही काळ भास होणे व तो पुनरपि उज्ज्वल होणे अशा प्रकारचा जो देखावा आळीपाळीने भारतीय समाजाच्या इतिहासाचे निरीक्षकास आढळून येतो त्या देखाव्यापैकीच महाराष्ट्रीय समाजांत उदयास आलेले वरील दोन सांप्रदाय होते व काही काळापावितो श्रृतिस्मृतिप्रणीत धर्मावर त्यांचे योगाने चांगलेच संकट उत्पन्न झाले होते ही गोष्ट निःसंशय आहे.

वारकरी सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मानुयायी ब्राह्मणवर्णापैकी विद्वान ब्राह्मणांची धर्मकारणदृष्ट्या मनोरचना कशाप्रकारची होती याचें समीक्षण करणे अवश्य आहे. वारकरी सांप्रदायाच्या उदयापूर्वीश्रुतिस्मृतिप्रणीत आचारधर्म कडकडीत रीतीने पालन करण्याची प्रवृत्ती ब्राह्मण क्षत्रियादी समाजात अस्तित्त्वात होती असे त्या काळी उदयास आलेल्या धार्मिक वाङ्मयाच्या विकासावरून दिसून येते. याज्ञवल्क्य स्मृतीवर कल्याणी येथील विक्रमादित्याच्या कारकिर्दीत ज्ञानेश्वरांनी मिताक्षरा या नावांची टीका रचिली. विक्रमादित्य हा विद्वांनाचा व विद्येचा मोठा भोक्ता व आश्रयदाता होता. मिताक्षरा टीका त्या काळापासून आजपावेतो महाराष्ट्रीय समाजांतील लोक आधारभूत मानीत आले आहेत. धारच्या भोजराजानें स्मृतीग्रंथावर टीका केल्याचें प्रसिद्ध आहे. उत्तर कोंकणाच्या शिलाहार राजघराण्यातील अपरार्क या नावांच्या राजानें याज्ञवल्क्य स्मृतीवर लिहिलेला ग्रंथ अपरार्क या नावाने प्रसिद्ध आहे. वरील टीकानंतर थोड्याच काळाने देवगिरीच्या यादव घराण्याच्या रामेदवराव राजाचे कारकिर्दीत त्याचा मुख्य प्रधान हेमाद्रि यानें धर्मशास्त्रावर फार मोठी ग्रंथरचना केली. हेमाद्रीचा प्रसिद्ध ग्रंथ

म्हणजे चतुर्वर्ग चिंतामणी हा होय. या ग्रंथाचे चार भाग आहेत. व्रतकांडामध्ये निरनिराळी व्रते आणि त्या संबंधाचे आचार, दानकांडात निरनिराळ्या दाने व त्यांचे धार्मिकदृष्ट्या महत्त्व, तीर्थकांडात निरनिराळ्या क्षेत्रांच्या यात्रा आणि मोक्षकांडात मोक्षप्राप्तीचे मार्ग या संबंधीची साग्र व तपशीलवार माहिती दिली आहे. या ग्रंथाचे एक पांचवे कांड असून त्यास परीशेषक कांड असे नाव आहे. या कांडाच्या चार भागात अनुक्रमे निरनिराळ्या देवता व त्यांची उपासना करण्याची पद्धती, श्राद्धे आणि पितरांस अर्पण करावयाचे पदार्थ, निरनिराळे धार्मिक विधी करावयास योग्य मुहूर्त आणि नाना प्रकारची प्रायश्चिते या संबंधाचे साग्र विवेचन केलेले आहे. धर्माच्या निरनिराळ्या अंगांविषयी विवेचन करणारे वाङ्मय किती मोठ्या प्रमाणात त्या काळी निर्माण झाले होते हे आतापावेतो केलेल्या धर्मवाङ्मयाच्या विकासाच्या वर्णनावरून स्पष्ट होत आहे. ज्या महाराष्ट्रीय समाजात हे वाङ्मय इतक्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाले त्या समाजातील लोकांच्या चारित्र्याशी या वाङ्मयात अंतर्भूत असलेल्या बाबींचा निकट संबंध असल्याविना हे वाङ्मय उदयास येणे संभवनीय नाही हे कोणासही कबूल करावे लागेल. या शिवाय त्या काळच्या उपलब्ध झालेल्या शेकडो ताम्रपत्रावरून त्या काळचे राजे वेदशास्त्र पारंगत व स्वधर्माचाराप्रमाणे कडकडीत आचरण करणाऱ्या ब्राह्मणास त्यांचा योगक्षेम चालविण्याकरता इनाम जमिनी व निरनिराळ्या प्रकारची दाने देत असत असे दिसून येते. या दोन्ही गोष्टींवरून त्या काळचा विद्वान ब्राह्मणवर्ग व त्यांचे अनुकरण करणारे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य वर्णाचे लोक श्रुतिस्मतिप्रणीत आचार धर्माचे कडकडीत पालन करणारे होते ही गोष्ट निश्चितपणे ग्राह्य धरण्यास हरकत नाही. निव्वळ श्रुतिस्मृतिप्रणीत आचारधर्म परिपालनाची वृत्ती मोक्ष प्राप्तीच्या दृष्टीने कितपत उपयुक्त आहे याचा विचार केल्यास मोक्षास कारणीभूत होणारी जी अंतःकरण शुद्धी ती निव्वळ आचारधर्म परिपालनापासून म्हणण्यासारखी निर्माण होत नाही. आचारधर्म परिपालनात हे न्यून असूनही श्रुतिस्मृतिधर्माभिमानी विद्वान ब्राह्मण ते कबूल करून आचारधर्मास अंतःकरण शुद्धी ज्याचे योगाने सिद्ध होईल अशा दुसऱ्या कोणत्याही मार्गाची जोड देण्यास निव्वळ दुराभिमानास बळी पडून तयार नव्हते. आम्ही हे जे विधान केले आहे त्यांत बराच तथ्यांश आहे, असे ज्ञानेश्वरांनी वेषधाऱ्यास उपदेशपर अशा केलेल्या काही अभंगावरून दिसते. ज्ञानेश्वरांचे हे अभंग फार थोडे आहेत हे खरें, परंतु वर दर्शविलेल्या मुद्याच्या दृष्टीने ते फार महत्त्वाचे आहेत. ज्ञानेशरांच्या या

अभंगात तीन प्रकारच्या वेषधाऱ्यांचा उल्लेख केलेला आढळतो. या तीन प्रकाराशिवाय अन्य कोणी त्यांच्या दृष्टिपथात असते. तर त्यांचा उल्लेख केल्याविना ते राहिले नसते. खालील अभंगात त्यांनी कर्मठाचे वर्णन केले असून मोक्ष प्राप्तीच्या दृष्टीने त्याचे ठिकाणी कोणते वैगुण्य असते हे दर्शविले आहे.

शरीर वरिवरि का दंडिसि जंव वारिले न करी तुझे मन । जळी नेत्र लाउनि ठोकती अविंशा लागोनि तैसे नको नको बकध्यान रया ।।१ ।। चित सुचित करी मन सुचित्त करी । न धरी तूं विषयाची सोय । वनीं असोनी वनिता चिंतिसि । तरि तपचि वाउगें जया रया ।। २ ।। त्रिकाळ स्नान करिसी तीर्थजळी परि नवजाती मनीचे मळ । तुझियानि दोषें तीर्थ कुश्चित जाली जैसी तया रजकाची शीळ रया ।। ३ ।। आतां करिसी तरी चोखटच करी त्यासी साक्ष तुझें मन । लटिकें न झकवसी तऱ्ही देव दुऱ्हा होसी बापरखुमादेविवरा विठ्ठलाची आण ।। ४ ।। (अ.गा.अ ४४२)

शास्त्रपारंगत विद्वानाचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी खालील अभंगात केला आहे.

मतमतांतरे रचुनिया ग्रंथु ज्ञानव्युत्पत्ति जवं झाली नाही आत्मप्रतीत । या लागी दंभ दर्प सकळ प्रतिष्ठादि भ्राति धनदारा विषयासक्ती । ऐसा अहंमते ज्ञातेपणाचेनि अहंकारे तेणे केवि होय आत्मप्राप्ति ।। (अ.गा.अ ४४३)

ज्ञानेश्वरांनी त्यांच्या काळी समाजांत दिसणाऱ्या संन्याशांचा खालील अंभगात समाचार घेतला आहे.

ताडे जाले संन्यासु । भोगावरी धावे हव्यासु ।। ते नेणती ब्रह्मरसु। वायां होती कासविसु (अ.गा. अ. ४४४)

विटंबुनि काया दंड धरी करी । हिंडे घराचारी नवल पाहें ।

असमाधानी विषयीं विव्हळ । तरी केवळ दंड काजा काई ।।
(अ.गा. अ ४४५)

वरील अभंगावरून आचार धर्मास त्या काळी किती महत्त्व देण्यात येत असे व आध्यात्मिक उन्नतीस अवश्य अशा गुणांची किंमत किती अल्प समजली जात असे हे दिसून येते. या शिवाय श्रुतिस्मृति धर्माचे ज्ञान महाराष्ट्रीय समाजांतील लोकांस होण्यास दुसरी एक अडचण त्या काळी उत्पन्न झाली होती, ती या ठिकाणी

दर्शविणे जरूर आहे. श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मवाङ्मय संस्कृत भाषेत असल्याचे सर्वात विदित आहे. वारकरी सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी महाराष्ट्रीय समाजांत प्रस्तुत काळापेक्षा संस्कृत भाषा जाणणाऱ्यांची संख्या ब्राह्मण क्षत्रिय इत्यादी वर्णाच्या लोकांत निः संशयपणे अधिक असली पाहिजे. परंतु त्या काळांतही संस्कृत भाषा जाणणारांचे प्रमाण ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य इत्यादी वर्णाच्या लोकांमध्ये बरेच कमी झालेले होते असा अंदाज आहे. मराठी भाषेचे आद्यग्रंथकार म्हणून समजले जाणारे जे मुकुंदराज कवी त्यांनी मराठीत व संस्कृतांत अध्यात्मविषयक ग्रंथ रचल्याचे अलीकडे त्यांच्या उपलब्ध झालेल्या ग्रंथावरून ज्ञान झाले आहे. यावरून संस्कृत भाषा जाणणारांची संख्या महाराष्ट्रीय समाजात कमी झाल्याकारणाने मराठी भाषेत ग्रंथरचना करण्याची आवश्यकता ब्राह्मण वर्णातील ज्ञात्या लोकांस भासू लागली असावी असे दिसते. त्या काळी संस्कृत भाषेत ग्रंथरचना करणें हा विद्वान ब्राह्मणांचा शिष्टसांप्रदाय होता. या शिष्टसांप्रदायास मान देऊन संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करणें महाराष्ट्रातील विद्वान ग्रंथकारास प्राप्त होई. परंतु संस्कृत भाषा जाणणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रीय समाजात कमी होत चालल्याकारणाने असंस्कृतज्ञ जनतेकरिता मराठी भाषेत ग्रंथरचना करण्याची आवश्यकता ही भासे. यामुळे दोन्ही भाषात ग्रंथरचना करण्याचा प्रघात त्या काळापासून सुरू झाला व तो पुढे बऱ्याच काळपावेतो अस्तित्त्वात राहिला. या प्रमाणे काळाच्या ओघापुढे महाराष्ट्रीय ब्राह्मणास मान वाकविणे जरी भाग पडले तथापि एकंदरीत प्राकृत भाषेत ग्रंथरचना करणे कमीपणाचें समजले जात असल्याकारणाने शूद्रादि लोकांस धर्मज्ञान करून देण्याचा त्याकाळी कोणताच मार्ग अस्तित्त्वात नव्हता हे दिसून येते. याशिवाय त्याकाळच्या विद्वान ब्राह्मणांच्या मनोरचनेतील दुसरी एक दृष्टोत्पत्तीस येणारी गोष्ट नमूद करणें जरूर आहे. महाराष्ट्रीय समाजापैकी बऱ्याच मोठ्या शुद्र वर्णातील लोकांच्या धर्मकारणदृष्टचा ज्या भावना होत्या त्याकडे महाराष्ट्रीय समाजांतील आचारधर्माभिमानी बहुसंख्याक विद्वान ब्राह्मणाचे दुर्लक्ष होते. ब्राह्मणवर्णात जन्म झाल्याखेरीज कोणतीही व्यक्ती मोक्षास अधिकारी व्हावयाची नाही असा श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माभिमानी ब्राह्मणवर्णांतील बऱ्याचशा ज्ञात्या लोकांचा समज होता. ब्राह्मणवर्णापैकी विद्वान ब्राह्मणाची मोक्षप्राप्तीविषयक ही मनोरचना इतर वर्णातील लोकांस रुजण्यासारखी नसून मोक्षप्राप्तीचा सुलभ असा अन्य मार्ग सापडल्यास तो त्यांना इष्टच होता. अशा प्रकाराच्या परिस्थितीत वैश्यशूद्रादि

वर्णातील लोकांच्या वर दर्शविलेल्या भावनांकडे चक्रधर, बसव यांच्यासारख्या अगदी तुरळक अशा ब्राह्मणांचे लक्ष वेधले गेले व त्यांनी स्वतंत्र सांप्रदायांची स्थापना करून मोक्ष प्राप्तीचा मार्ग सर्वत्रास खुला करून दिला. हा हेतू साध्य करण्याकरिता श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माचा पाडाव करण्याचे प्रयत्न करणे या सांप्रदायाच्या चालकांस प्राप्त झाले. महाराष्ट्रीय समाजाची त्या काळचे सुमारास ज्या प्रकारची परिस्थिती या भागाचे प्रारंभापासून आतापावेतो आम्ही चित्रित केली आहे त्या परिस्थितीशी बौद्धधर्म उदयास येण्यापूर्वीच्या भरतखंडातील लोक समाजाच्या स्थितीचे बरेच साम्य असल्याचें आढळून येते. बौद्धधर्म उदयास येण्यापूर्वी यज्ञयागादि कर्मे करणे हाच काय तो एक मोक्षप्राप्तीचा मार्ग असून त्या खेरीज अन्य मार्ग नाही, अशा प्रकारची दृढ भावना श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मानुयायी लोकांची झाली होती. मोक्षसिद्धीस्तव मानवी मनावर सुसंस्कार होणे अगर मनाची शुद्धी होणे अवश्य आहे ही गोष्ट त्या काळच्या जनतेस महत्त्वाची वाटत नसे. अशा प्रकारच्या परिस्थितीत या ग्रंथाच्या पहिल्या भागात वर्णिल्याप्रमाणे गौतमबुद्ध महावीर इत्यादिकांनी नीतीप्रधान असे बौद्ध व जैन सांप्रदाय स्थापन केले. वरील सांप्रदायांची स्थापना होण्यापूर्वी काही काळ वासुदेवधर्म, एकांतिक धर्म नारायणीय पंथ, या नावानी प्रसिद्ध असलेला सांप्रदाय भारतीय समाजात उदयास येऊन त्याच्या तत्त्वांचा प्रसार व समाजात होऊ लागला असल्याचे आम्ही मागील भागात दर्शविलेच आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असा एक सुप्रसिद्ध वाक्प्रचार आहे. या वाक्प्रचारास अनुसरून बौद्धधर्म उद्यास येण्यापूर्वी भारतीय लोकांची ज्या प्रकारची मनोरचना बनली होती तशाच प्रकारची मनोरचना महाराष्ट्रीय जनतेची शकाच्या अकराव्या-बाराव्या शतकाच्या सुमारास झाली होती. आद्य शंकराचार्यानी श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची पुनर्स्थापना भरतखंडात केल्यानंतर महाराष्ट्रातील लोकांची मने बौद्धधर्मापासून परावृत्त होऊन श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मावर जडली. परंतु शंकराचार्यांनी केलेल्या या महत्त्वाच्या कामगिरी बरोबरच मोक्षप्राप्तीचे अधिकाराचे बाबतीत त्यांनी प्रतिपादिलेल्या सिद्धांताचे योगाने मानभाव लिंगायत, पंथांच्या उदयाचे बीज पेरले गेले. श्रुतिस्मृतिप्रणीत आचार धर्माचे तंतोतंत पालन हेच एक मोक्ष प्राप्तीस कारण आहे अशा मनोभावनेमुळे आचारधर्म परिपालनास भलतेच महत्त्व त्या काळी प्राप्त झाले होते. काही काळ लोटल्यानंतर महाराष्ट्रीय जनतेची मने शंकराचार्यांच्या प्रतिपादनाविरुद्ध होऊन त्यांना आचार्यांचा सिद्धांत त्याज्य व

जाचक भासू लागला. यामुळे मोक्ष प्राप्तीचा अधिकार कसा प्राप्त होतो ही तीव्र आकांक्षा महाराष्ट्रातील ब्राह्मणाखेरीज इतर वर्गातील लोकात उदयास घेऊन ते मानभाव, लिंगायत या सांप्रदायाचा आश्रय करू लागले. अशा प्रकारच्या परिस्थितीत श्रुतिस्मृप्रणीत धर्माचे वर्चस्व कायम ठेवून त्या धर्माशी कोणत्याही प्रकारची स्पर्धा अगर विरोध न करता महाराष्ट्रीय समाजापैकी बहुसंख्याक वैश्य शूद्रादिक लोकांच्या धर्मदृष्ट्या मोक्ष प्राप्तीच्या अधिकारापैकी आकांक्षा कोणत्या मार्गाने तृप्त करावयाच्या हा त्या काळच्या ज्ञात्या व विचारी ब्राह्मणापुढे प्रश्न होता. या प्रश्नाच्या सोडवणुकीतच भागवतधर्म ऊर्फ वारकरी सांप्रदायाचा तत्कालीन उदय झाला आहे असे आम्ही पुढे केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षात येईल. बौद्धकालीन भारतीय समाजाच्या व शके ११००-१२०० कालीन महाराष्ट्रीय समाजाच्या परिस्थितीत ज्या प्रकारचे साम्य आता आम्ही नुकतेच दर्शविले आहे, तशाच प्रकारचे साम्य वरील दोन्ही काळातील परिस्थिती पालटण्यास कारणीभूत असल्याचे आढळून येते. बौद्धधर्माचा उदय होण्यापूर्वी वासुदेवधर्म या नावाने प्रसिद्ध असलेला सांप्रदाय उदयास येऊन त्या सांप्रदायाचा तत्त्वाचा प्रसार भारतीय समाजात झाला होता. या सांप्रदायाच्या योगानेच भारतीय समाजात यज्ञयागादि कर्माचे महत्त्व पार लयास जाऊन त्यांनी बौद्धधर्माच्या अहिंसा तत्त्वाचे ग्रहण केले. याच धर्माच्या योगाने बौद्धधर्माचा ऱ्हास होऊन श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची पूर्ववत स्थापना झाली. वासुदेवधर्माच्या तत्त्वांचे योगानें बौद्धधर्माची पीछेहाट झाली त्याच तत्त्वांचा प्रसार भागवतधर्म या नावाखाली महाराष्ट्रीय समाजात धर्मकारणी पुढाऱ्यांनी फिरून करून मानभाव लिंगाइत इत्यादी पंथापासून व मुसलमानी धर्मापासून महाराष्ट्रीय जनतेचा बचाव केला व श्रुतिस्मृत्युक्त धर्माचे वर्चस्व कायम राखिले, भागवत धर्मतत्त्वाचे प्रतिपादन भागवत या नावांने प्रसिद्ध असलेल्या संस्कृत ग्रंथात केलेले असून त्या तत्त्वांचा प्रसार महाराष्ट्रीय धर्मकारणी पुढाऱ्यांकडून शके १३०० ते १६०० पावेतो केला गेला.

भागवतधर्माची तत्त्वे प्रतिपादन करणारा भागवत ग्रंथ संस्कृत भाषेत असल्यामुळे महाराष्ट्रीय समाजांतील त्रैवर्णिक लोकांपैकी बरेच लोकांस व शूद्रवर्णापैकी सर्वांसच समजणे होणे दुरापास्त होते. असे स्थितीत या धर्माची तत्त्वे महाराष्ट्रीय समाजास अवगत असलेल्या प्राकृत अगर मराठी भाषेत मांडणे महाराष्ट्रीय हरिकथा निरूपणी पुढाऱ्यांस प्राप्त झाले. वारकरी सांप्रदाय उदयास येण्यापूर्वी अनेक शतके वासुदेवधर्माने

भारतीय समाजात ज्या प्रकारची कामगिरी केली, तशाच प्रकारची कामगिरी याच धर्माने, भागवतधर्म अथवा वारकरी सांप्रदाय या नूतन प्राप्त झालेल्या अभिमानाखाली वारकरी संप्रदायाच्या हरिकथा निरूपणी पुढाऱ्या करवी मराठी भाषेच्या साहाय्याने महाराष्ट्रीय समाजात केली असे आम्ही यापुढे विवेचन केले आहे यावरून वाचकांचे लक्षात येईल.

वारकरी सांप्रदायाच्या उपपत्तीची मीमांसा या प्रकारची आहे व ती आम्ही वाचकांपुढे शक्य तितकी साधार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात वारकरी सांप्रदाय उदयास येण्यास तात्कालिक कारणे कोणती झाली हे सांगितल्यावर त्याशिवाय वारकरी सांप्रदाय उदयास येण्यास कारणीभूत झालेल्या एका अन्य कारणाचाही प्रस्तुत स्थळी विचार करणे अगत्याचे आहे, तो आम्ही थोडक्यात मांडतो.

श्री  जगद्‌गुरू आद्य शंकराचार्यांनी बुद्धधर्माचा पाडाव करून श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची पुनर्स्थापना भरतखंडाच्या सर्व प्रांतांत इ.स.६०० ते ७०० च्या दरम्यानच्या काळात केली. याचे योगाने श्रुतिस्मृतिप्रणीत आचारधर्माचा कडकपणा  सर्व भरतखंडभर अस्तित्त्वात आला. हा कडकपणा पाच-सहाशे वर्षे भारतीय जनतेने अनुभवल्यावर तो तिजला असह्य वाटू लागून त्याचे विरुद्ध भारतीय जनतेत प्रतिक्रिया उदयास आली व तिचे पर्यवसान भक्तिमार्गाच्या उदयात झाले. भक्तिमार्गाचा उदय एकसमयावच्छेदेकरून उत्तर हिंदुस्थान, महाराष्ट्र, दक्षिण हिंदुस्थानांतील कर्नाटकप्रांत व त्यापलीकडील थेट रामेश्वरापर्यंतच्या प्रदेशांत झाला. इतिहासाचार्य राजवाडे यांनी नाभाजींने व महिपतीने वर्णिलेले हिंदुस्थानातील संत, या फार वर्षापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निबंधात या भक्तिमार्गाच्या उदयाविषयी विस्तृत व साधार अशी जी चर्चा केली आहे, त्या चर्चेतील महत्त्वाचा भाग खाली देतो.

''गोरख, मत्सेद्र वगैरे दहापाच संताचा स्थूलही काल वरील यादीत दिला नाही, कारण ते संत महाराष्ट्रबाह्य आहेत. गोरख, मत्स्येंद्र, गैनी वगैर मंडळी उत्तर हिंदुस्थानातली असल्यामुळे असे एक विधान करणें शक्य होते की यादवांच्या राज्यांत भक्तिमार्गाचा प्रसार नर्मदेच्या उत्तरेकडील संताच्या द्वारा झाला, आणि असाच प्रकार होणे त्या काळी संभाव्य होते कारण बौद्ध धर्माचा मोड व सनातन धर्माची प्रस्थापना करणाऱ्या आंध्रभृत्य, चालुक्य, राष्ट्रकुल, उत्तर चालुक्य व यादव

या पाच मराठा राजघराण्यांच्या बाराशे वर्षांच्या राजवटीत प्रपंचपराङमुख निवृत्तिपरायण भक्तिमार्गाचा उदय महाराष्ट्रातील लढवय्या लोकांच्या हातून होणे संभाव्य नव्हते. रामाजुन (शके १०४९) विष्णुस्वामी (११००) मध्वाचार्य (११६५) व निंबादित्य (११५०) ह्यांच्या हस्ते उत्तर हिंदुस्थानात भक्ती मार्गाची प्रस्थापना झाल्यावर नंतर शंभर वर्षांनी त्या मार्गाचा प्रवेश महाराष्ट्रात झाला. शालिवाहन शकाच्या प्रारंभापासून तो त्या शतकाच्या बाराव्या शतकाच्या मध्यापर्यंत महाराष्ट्रात झालेला एकही संत महिपतीने अगर दुसऱ्या कोणाही धर्मकाराने नमूद केलेला आढळत नाही. अगदी जुन्यात जुने असे महाराष्ट्रीय संताचे नवे म्हणजे पुंडलिकाचे होय. पुंडलिक ११५० चे सुमारास हयात असावा असे वाटते. त्याने विठोबाची स्थापना प्रथम पंढरीत केली. ही मूर्ती शालिवाहनाच्या पाचव्या शतकाच्या कारागिरीसारखी असून मथुरेहून पुंडलिकाने ११५० आणली व तिची स्थापना साध्या विटेवर पंढरीत केली. पुढे तीस-पस्तीस वर्षांनी विठोबाचे माहात्म्य इतके वाढले की रामदेवराव जाधवासारख्या राजांनी त्या देवाच्या पूजेअर्चेकरिता शके ११८० मध्ये देणग्या दिल्या. या देणगीवाल्यांत स्त्रिया, पुरुष, उदमी, व्यापारी, राजपुरुष व राजे वगैरे सर्व दर्जाच्या लोकांची नावे आलेली पंढरपूरच्या चौऱ्यांशी शिलालेखावर कोरून ठेवलेली आहेत हा शिलालेख ग्रंथमालेत प्रसिद्ध झालेला आहे. सारांश पंढरीस विठोबाची स्थापना पुडलिकाने केल्यापासून महाराष्ट्रात भक्तिमार्गाचा प्रवेश झाला. तत्पूर्वी शंभर-दोनशे वर्षे उत्तर हिंदुस्थानांत व विशेषतः मधुरा प्रांतात या मार्गाचा उदय झाल्यानंतर थोड्याच वर्षांनी मुसलमानांचे प्रस्थ त्या प्रांतांत माजले व म्लेंच्छ राज्यसत्तेचा अंमल उत्तर हिंदुस्थानात शंभर सवाशे वर्षे झाल्यानंतर, या दोहोंचा शिरकाव महाराष्ट्रात झाला. प्रथम ११५० मध्ये भक्तिमार्ग आला आणि त्याने आपले निवृत्तिचे काम बजावल्यावर ११९० पासून महाराष्ट्रावर म्लेच्छाचा अंमल बसण्यास सुरुवात झाली. ११९० मध्ये हेमाद्रीच्या आश्रयाने राहणारा जो बोपदेव त्यांने भागवताची एक आवृती काढली, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. प्रपंचाला सोडून देणारा संतांचा भक्तिमार्ग राष्ट्राच्या बळकटीला शालिवाहनाच्या बाराव्या शतकात घातक झाला हा सिद्धांत निर्विवाद आहे. तेव्हा या मार्गाच्या आश्रयाने राष्ट्राची नव्याने निर्मिती होणे सर्वथा दुर्घटच समजले पाहिजे. निवृत्तीचा अवलंब करून प्रवृत्तीची फळे भोगू इच्छिणे म्हणजे वंध्येपासून पुत्रप्राप्ती करून घेऊन संसार क्रमू जाण्याची इच्छा करण्यासारखे आहे.'' (सरस्वती मंदिर

वर्ष ६ वे अंक पहिला)

भक्तिमार्गाची लाट उत्तर हिंदुस्थानात उदयास घेऊन तिचा शिरकाव महाराष्ट्रात कसा झाला याची राजवाड्यांनी दिलेली उपपत्ती ग्राह्य होण्यासारखी आहे. वारकरी सांप्रदाय महाराष्ट्रात या लाटेमुळे उदयास येण्याचा संभव आहे.

राजवाड्यांच्या मताप्रमाणे उत्तर हिंदुस्थानात भक्तिमार्गाचा उदय होऊन त्याचा शिरकाव महाराष्ट्रात झाला याप्रमाणेच महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील त्यास लागून असलेल्या कर्नाटक प्रांतात त्याच सुमारास भक्तिप्रधान असा एक सांप्रदाय उदयास आला त्याचीही भर, वारकरी सांप्रदाय महाराष्ट्रात ज्या तात्कालिक कारणामुळे उदयास आला त्यात पडली असल्याचा संभव आहे. वारकरी सांप्रदायांतील कित्येक संतानी पंढरपूरच्या विठ्ठलास कानडा असे म्हटले आहे. या त्यांच्या विधानांत बराच सत्यांश असावा असे यापुढे कर्नाटकात उदयास आलेल्या एका सांप्रदायाविषयी जी साधार माहिती आम्ही देत आहोत त्यावरून दिसून येणार आहे.

कर्नाटकात शक तेराशेच्या उत्तरार्धात दासकूट या नावांचा एक सांप्रदाय उदयास आला. दासकूट हा कानडी शब्द असून त्याचा मराठी समानार्थवाचक शब्द भक्तिपंथ हा आहे. दास याचा अर्थ सेवक, कूट याचा अर्थ विशिष्ट हेतूने एकत्र झालेले लोक. या शब्दाचा मराठी समान शब्द मंडळ हा आहे. शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा पाडाव करणारे द्वैततत्त्वज्ञानी मध्याचार्य दक्षिण हिंदुस्थानात उदयास आले व त्यांनी या तत्त्वज्ञानाचा प्रसार दक्षिण हिंदुस्थानात करण्यात सुरुवात केली. या तत्त्वज्ञानाच्या प्रसाराबरोबर श्रीकृष्णाच्या भक्तीचाही प्रसार करण्यात आला. दासकूट सांप्रदायाची उभारणी या दोन तत्त्वांवर करण्यात आली आहे. या नश्वर जगातून संसृतीच्या फेऱ्यातून आपली सुटका करून घेण्यास्तव प्रत्येक मनुष्याने भक्तियुक्त अंतःकरणानें परमेश्वरास शरण जावे असे या पंथाचे मुख्य तत्त्व आहे. या पंथाच्या लोकांचे इष्ट दैवत पंढरपूरचा श्रीविठ्ठल हे आहे. कर्नाटक प्रातांत पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाचे अनेक उपासक आहेत. दासकूट सांप्रदायांत वरील तत्त्वज्ञाना शिवाय नीतितत्त्वांची त्याचप्रमाणे ज्ञानाची महती मान्य करण्यात आली आहे. या पंथाचा आद्य संस्थापक नरहरी तीर्थ हा होता व मध्वाचार्यांचे पश्चात तो त्यांचे पीठावर अधिष्ठित झाला. नरहरी तीर्थाचे पश्चात पुरंदर विठ्ठल या नावांचा या पंथाच्या शिकवणींचा उपदेशक व प्रसारक असा एक नामंकित संत होऊन गेला.

वारकरी सांप्रदायाप्रमाणे दासकूट या सांप्रदायात शके तेराशेपासून आजतागायत श्रीविठ्ठल भक्तीचा उपदेश करणारे अनेक संत होऊन गेले आहेत. या सांप्रदायातील सर्व संतांनी भक्ति, ज्ञान, नीती इत्यादी विषयावर बरेच विस्तृत वाङ्मय कानडी भाषेत निर्माण केले असून ते मराठी भाषेतील संत वाङ्मयांप्रमाणे सर्वसामान्य जनतेत फार लोकप्रिय झाले आहे. या वाङ्मयाशिवाय श्रीकृष्णाच्या चरित्रांतील अनेक कथा, त्याचप्रमाणे श्रीकृष्णाने गोपीसमवेत केलेल्या अनेक लीला, त्यांच्या वर्णनपर काव्ये कानडी भाषेत या सांप्रदायांतील संतांनी केली आहेत.✻

महाराष्ट्र व कर्नाटक हे दोन्ही प्रांत एकमेकास लागून असल्याने कर्नाटक प्रांतातील विठ्ठल भक्ती व दासकूटांची शिकवण वारकरी सांप्रदाय महाराष्ट्रात उदयास येण्यास कारणीभूत झाली असावी असे अनुमान करणे अयुक्त होणार नाही. महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या उद्याविषयीची चर्चा येथे समाप्त करून पुढील प्रकरणांत वारकरी सांप्रदायाचे ध्येय, तत्त्वे व कार्य यांचे विवेचन आम्ही केले आहे.

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

आर.बी. नरसिंव्हाचार्य यांनी कानडी भाषेत लिहिलेल्या कविचरित्र या नावाच्या ग्रंथाचे तीन भाग प्रसिद्ध केले आहेत. त्यांत दासकूट सांप्रदायात झालेल्या नामांकित संतांची काव्ये प्रसिद्ध केली आहेत. त्यावरून या पंथाच्या शिकवणीची कल्पना वर सांगितल्याप्रमाणे करता येते. धारवाड जिल्ह्यांतील हवेरी येथील हायस्कूलचे हेडमास्तर बेनगिरी यांनी या सांप्रदायांत झालेल्या अनेक संतांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाचा चांगला अभ्यास केला असून इंग्रजीत या सांप्रदायाविषयी लेखही लिहिले आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे वरील माहिती आम्ही दिली आहे.